रायगड, शुक्रवार, दि. ८ ऑगस्ट २०२५

# कृषीवल

किंमत ४ ₹

# पडताळणीमुळे होणार बहिणी अपात्र

प्रमोद जाधव
। अलिबाग ।

**आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी शासनाने गतवर्षी लाडकी बहीण योजना सुरु केली.योजनेस पात्र ठरणाऱ्या बहिणींच्या खात्यात दर महिन्याला दीड हजार रुपये जमा करण्यात आले. आता मात्र पात्र ठरलेल्या बहिणी अपात्र ठरण्याची शक्यता आहे. जिल्ह्यातील ६० हजार महिलांची पडताळणी केली जाणार आहे. त्यानुसार जिल्हा प्रशासन ॲक्शन मोडवर आले आहे. निकषात न बसणाऱ्या महिलांना या योजनेचा लाभ मिळणार नाही.**

- **जिल्हा प्रशासन ॲक्शन मोडवर, युद्धपातळीवर तपास सुरू**
- **साठ हजार महिलांच्या कागदपत्रांची होणार पडताळणी**

लाडकी बहीण योजना महिला व बालविकास विभागामार्फत चालविण्यात आली. २१ ते ६५ वर्षे पूर्ण असलेले, एका कुटुंबातील विवाहित व अविवाहित महिलांना लाभ देण्याचे निकष लावण्यात आले होते.



### अन्य व्यक्तींना माहिती देऊ नका

महिलांची पडताळणी सुरु केली आहे. अंगणवाडी सेविकांनाच हे काम दिले आहे. अन्य कोणीही व्यक्ती येऊन माहिती घेत असल्यास त्यांना ती माहिती देऊ नका. त्यामुळे महिलांनी सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

### अंगणवाडी सेविका भत्त्यापासून वंचित

सरकारने निवडणुकीपूर्वी गतवर्षी मुख्यमंत्री लाडकी बहिण योजना सुरु केली होती. या योजनेची अंमलबजावणी अंगणवाडी सेविकांनी केली. घरोघरी जाऊन अनेक महिलांचे अर्ज भरून घेतले होते. एक अर्जासाठी ५० रुपये भत्ता देण्याचे आश्वासन दिले होते. मात्र अद्यापर्यंत अंगणवाडी सेविकांना भत्ता देण्यात आला नसल्याची माहिती समोर येत आहे. मात्र महिला व बालविकास विभागाकडून निधी एकात्मिक विकास विभागाकडे पाठविण्यात आल्याची माहिती उपलब्ध झाली आहे.


अंगणवाडी सेविकांच्या मदतीने महिलांचे अर्ज भरून घेण्यात आले होते. शिधापत्रिका, आधारकार्ड आदी कागदपत्रे अपलोड करून अर्ज भरण्यात आले होते. या योजनेसाठी सहा लाख २५ हजार महिलांचे अर्ज प्राप्त झाले होते. त्यापैकी पाच लाख ७६ हजार महिलांचे अर्ज मंजूर करण्यात आले. पात्र ठरलेल्या महिलांच्या खात्यामध्ये गतवर्षी रक्षाबंधनाच्या दिवशी योजनेचे पैसे जमा करण्यात आले. तेव्हापासून या योजनेला सुरुवात झाली. दर महिन्याला दीड हजार रुपये खात्यात जमा होत असल्याने महिलांमध्येदेखील आनंद निर्माण झाला होता. मात्र पान २ वर

# महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत मोठा घोटाळा

## राहुल गांधी यांनी सादर केले पुरावे, मतदार यादीतील घोळ केला उघड

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी हे गेल्या काही दिवसांपासून सातत्याने निवडणूक आयोगाला टीकेचं लक्ष्य करत आहेत. एकीकडे बिहारमधील मतदार यादी पुनरीक्षणाच्या मुद्द्यावरून राहुल गांधी यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. तसेच महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीमध्येही मोठ्या प्रमाणावर घोटाळा झाल्याचा आरोप ते सातत्याने करत होते.




दरम्यान, आज राहुल गांधी यांनी पत्रकार परिषद घेत महाराष्ट्रातील मतदानामध्ये झालेल्या घोटाळ्याचे पुरावे सादर केले आहेत. पत्रकार परिषदेमधून महाराष्ट्रातील मतदानामध्ये झालेल्या घोटाळ्याच्या पुराव्यांचं सादरीकरण करताना राहुल गांधी म्हणाले की, महाराष्ट्रामधील विधानसभा निवडणुकीमध्ये चोरी झाली. महाराष्ट्रामध्ये आम्ही निवडणूक हरलो. महाराष्ट्रामध्ये सुमारे ४० लाख मतदार रहस्यमय आहेत. येथे पाच महिन्यांच्या कालावधीमध्ये अनेक नवे मतदार नोंदवले गेले. या मतदार यादीबाबत निवडणूक आयोगाने उत्तर दिलं पाहिजे. हे मतदार खरे आहेत की खोटे हे निवडणूक आयोगाने सांगितले पाहिजे.

राहुल गांधी म्हणाले की, निवडणूक आयोग पान २ वर

# पनवेलमध्ये अपघातात दोन ठार

**। पनवेल । वार्ताहर ।**

पनवेलमध्ये बुधवारी (दि.६) झालेल्या दोन वेगवेगळ्या अपघातांमध्ये दोघांनी प्राण गमावले. या दोन्ही घटनांची नोंद कळंबोली आणि पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. कळंबोली येथील अपघातामध्ये २९ वर्षीय तरुणाने प्राण गमावले. पनवेल तालुक्यामध्ये राज्य व राष्ट्रीय महामार्ग आणि सेवा रस्त्यांचे जाळे पसरले आहे. यंदाच्या वर्षी जानेवारी ते जून या दरम्यान आतापर्यंत ४० हून अधिक जणांचा पनवेलमध्ये अपघातामध्ये प्राण गेले आहेत.

पनवेल-मुंब्रा महामार्गावरील कळंबोली पोलीस ठाण्याशेजारील सेवा रस्त्यावर बुधवारी दुपारी तीन वाजता कळंबोली गावातील शर्मा बेकरीशेजारी राहणारा अनिकेत जाधव हा कामावर बीमा कॉम्प्लेक्स येथे स्कुटीवरून जात असताना मागून आलेल्या ट्रेलरने पान २ वर

# सीआरपीएफ जवानांचं वाहन दरीत कोसळलं

**। उधमपूर । वृत्तसंस्था ।**

**तिघांचा मृत्यू: १५ जखमीं**

जम्मू-काश्मीरच्या उधमपूरमध्ये मोठी दुर्घटना घडली आहे. केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या (सीआरपीएफ) जवानांना घेऊन जाणारं एक वाहन खोल दरीत कोसळलं आहे. या दुर्घटनेत तीन जवानांचा मृत्यू झाला असून १५ हून अधिक जवान जखमी झाले आहेत. जखमी जवानांना रुग्णालयात दाखल करण्यात आलं असून त्यांच्यावर उपचार चालू आहेत. दरम्यान, स्थानिक



लोक व पोलिसांनी बचावकार्य सुरू केलं आहे. पान २ वर






# गणेशोत्सवापूर्वी महामार्ग खड्डेमुक्त करणार

## सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांचे प्रतिपादन; पळस्पे ते कशेडी बोगदा रस्त्याची केली पाहणी

**। रायगड । प्रतिनिधी ।**

**गणेशोत्सवासाठी कोकणात जाणाऱ्या चाकरमान्यांना रस्त्यांवरील खड्ड्यांचा जो त्रास होतोय, तो त्रास होवू नये, यासाठी शासनाकडून सर्व प्रकारच्या उपाययोजना करण्यात येत आहेत. गणेशोत्सवापूर्वी मुंबई-गोवा महामार्ग खड्डेमुक्त करण्याचा आमचा मानस असल्याचे प्रतिपादन सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी केले.**

सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी आज मुंबई गोवा महामार्गावरील सुरू असलेल्या रस्त्याच्या कामांची पाहणी केली, त्यावेळी ते बोलत होते. मुंबई गोवा महामार्गावरील कामाची प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्र राजे भोसले रायगड आणि रत्नागिरी जिल्हा दौऱ्यावर आहेत. पनवेल येथील पळस्पे फाटा येथून या पाहणी दौऱ्यास सुरुवात झाली.



या पाहणी दौऱ्यावेळी त्यांच्या समवेत जिल्हाधिकारी किशन जावळे, मुख्य कार्यकारी नेहा भोसले, जिल्हा पोलीस अधीक्षक आचल दलाल, मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग एम.एन.राजभोज, अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ कोकण भवन सुषमा गायकवाड, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणचे प्रकल्प संचालक यशवंत घोटकर आदि उपस्थित होते.

महाड येथील शासकीय विश्रामगृहात आयोजित आढावा बैठकीत ते म्हणाले की, मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गाची कामे प्राधान्याने पूर्ण करावीत, प्रवास करताना नागरिकांना वाहतूक कोंडीचा त्रास होणार नाही याची खबरदारी घ्यावी अशा सूचना त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. मुंबई-गोवा महामार्गाचा पाहणी दौरा सुरु असून नागरिकांना आवश्यक सुविधांमध्ये सुधारणा करण्यावर राज्य शासनाकडून भर देण्यात येत असून महामार्गाचे काम दर्जेदार झाले पाहिजे आणि लवकर पूर्ण झाले पाहिजे यासाठी निश्चितच प्रयत्न केला जात आहे.

रस्त्याचे काम लवकरात लवकर पूर्ण होण्यासाठी तसेच खड्ड्यांवर कायमस्वरूपी उपाययोजना करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करण्यास सुरुवात केली आहे. या माध्यमातून मुंबई-गोवा महामार्ग खड्डेमुक्त करण्याचा तसेच उर्वरित काम लवकरात लवकर पूर्ण करण्याचा आमचा प्रयत्न आहे. इंदापूर व माणगाव बायपास पुलाच्या निविदा प्रक्रिया पूर्ण झाली असून या कामासाठी नवीन ठेकदारांची नेमणूक करण्यात आली असून हे काम पूर्ण होण्याकरिता किमान एक वर्षाचा कालावधी लागू शकतो असेही त्यांनी यावेळी सांगितले.

कोकणात जाणारे पर्यायीमार्ग सुस्थितीत करावेत. इंदापूर, माणगाव येथे जास्तीचा पोलिस बंदोबस्त लावावा. होमगार्डची मदत घ्यावी. मुरुड, अलिबाग जाणाऱ्या नागरिकांसाठी वडखळ अलिबाग रस्त्याची दुरुस्ती करून घ्यावी. गणेशोत्सव हा कोकणातील लोकांचा जिव्हाळ्याचा विषय असून त्यांना प्रवासात कोणत्याही अडचणी येऊ नयेत संबंधित अधिकारी यांना दिलेल्या सूचनांचे पालन करावे यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम करावे. गणेशोत्सव काळात मुंबई-गोवा महामार्गावर सुविधा केंद्र उभारुन त्या सुविधा केंद्रावर नागरिकांना जास्तीत जास्त सुविधा द्याव्यात. जिथे पुलांची कामे चालू आहेत तेथील सर्विस रोडवर वाहतुक सुरळीत राहतील यासाठी प्राधान्याने कामे पूर्ण करावीत. जिथे गरज आहे तिथे साईन बोर्ड, साईन व्हेजेस, रिफ्लेक्टर बसवावेत.

या पाहणी दौऱ्यात मंत्रीभोसले यांनी पळस्पे, जिते पेण, पेण रेल्वे स्टेशन, वाशीनाका, गडब, खारपाले, कोलेटी या विविध ठिकाणी सुरु असलेल्या कामांची पाहणी केली. यावेळी स्थानिक नागरिकांशी संवाद साधला. त्यांना येणाऱ्या समस्या जाणून घेतल्या. या समस्या सोडविण्यासाठी सहाय्य करण्यात येईल असेही त्यांनी यावेळी सांगितले.

# तांबाटी येथे सुसज्ज अंगणवाडीचे उद्घाटन



**। खोपोली । प्रतिनिधी ।**

खालापूर तालुक्यात तांबाटी ग्रामपंचायत हद्दीत गोदरेज एंटरप्राइझेस ग्रुपने स्थानिक सरकार आणि एकात्मिक बाल विकास सेवा (आयसीडीएस) यांच्यासोबत सहयोगाने तांबाटी येथे लहानग्यांना शैक्षणिक वाटचालीची आवड निर्माण व्हावी व भावी पिढी घडावी यासाठी गोदरेज कंपनीच्या सामाजिक दायित्व फंडातून मुलांना मनोरंजनासाठी उपयुक्त असणारे शैक्षणिक खेळणी असणाऱ्या अंगणवाडीचे उद्घाटन केले.

या अंगणवाडी मध्ये तांबाटी व परिसरातील गावांमधील स्थानिक आदिवासी समुदायांसह ६ वर्षांखालील मुलांना सुरक्षित, सर्वसमावेशक आणि सुसज्ज वातावरण प्रदान करण्यासाठी हे केंद्र उभारण्यात आले आहे.

या केंद्राचा दरवर्षी जवळपास ५ मुले, ३० गरोदर महिला, ५० हून अधिक स्तनपान करणाऱ्या माता आणि जवळपास १०० कुटुंबांना फायदा होणार आहे.

या अंगणवाडीचे उद्घाटन खालापूरचे नायब तहसीलदार सुधाकर राठोड यांनी मुलांसोबत फित कापली आणि मुलांमध्ये उज्ज्वल भविष्य घडवण्याप्रती आशेचा किरण जागृत केला.

याप्रसंगी गोदरेज एंटरप्रायझेस ग्रुपच्या सीएसआर अँड सस्टेनेबिलिटी रिपोर्टिंग प्रमुख अश्विनी देवदेशमुख तांबाटीचे सरपंच अविनाश आमले खालापुर पोलीस निरीक्षक सचिन पवार यांच्या उपस्थितीत नामफलकाचे अनावरण केले.

यावेळी गोदरेज कंपनीचे राजेंद्र पाशीलकर, रमेश भांडारकर, तानाजी चव्हाण ग्राम पंचायत सदस्य हरिभाऊ जाधव, संतोष दळवी, अरुणा सावंत, सुगंधा जाधव, ग्रामसेवक प्रशांत कदम यासह अन्य मान्यवर ग्रामस्थ पालक वर्ग उपस्थित होते.

या उद्घाटनानंतर शाश्वततेला प्रोत्साहन देण्यासाठी अंगणवाडीच्या परसबागेत वृक्षारोपण देखील करण्यात आले.



# आदिवासी विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप

**। रायगड । प्रतिनिधी ।**

सेवांगण फाउंडेशनच्या वतीने अलिबाग तालुक्यातील ठाकर, आदिवासी व विटभट्टीवर काम करणाऱ्या मजुरांची मुले अशा सुमारे ११० विद्यार्थ्यांना स्कूल बॅग्स आणि आवश्यक शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

या उपक्रमाचे संपूर्ण नियोजन संस्थेच्या संचालिका व अध्यक्षा मनिषा नाईक, सचिव विनायक नाईक आणि प्रकल्प समन्वयिका स्वप्नाली नाईक यांनी केले. या उपक्रमास डोनेट एड सोसायटी, पुणे यांचे मोलाचे सहकार्य लाभले. सेवांगण फाउंडेशन तालुक्यातील ठाकर, आदिवासी आणि विटभट्टीवर काम करणाऱ्या मजुरांच्या मुलांच्या शैक्षणिक, सामाजिक आणि सर्वांगीण विकासासाठी कार्यरत आहे. शिक्षणाच्या प्रवासात येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी संस्था वाड्यावस्त्यांमध्ये, आदिवासी पाड्यांमध्ये आणि अत्यंत दुर्गम भागांमध्ये प्रत्यक्ष काम करते.

या विद्यार्थ्यांना शिक्षणाची गोडी लागावी, ते शाळेत नियमितपणे जावेत आणि त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी सक्षम पाया तयार व्हावा, या उद्देशाने सेवांगण फाउंडेशन कार्य करीत आहे. शिक्षण व समावेशक विकासाच्या माध्यमातून ही मुले मुख्य प्रवाहात सहभागी होतील. या दिशेने सेवांगण फाउंडेशनचे कार्य सातत्याने सुरू आहे.

# 'हर घर तिरंगा' प्रभावीपणे अंमलबजावणी करा

**। रायगड । प्रतिनिधी ।**

'हर घर तिरंगा' ही मोहीम लोक चळवळ बनली असून यामध्ये नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग असतो. यंदा देखील हर घर तिरंगा अभियान उत्साहाने राबवून त्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करा, असे निर्देश जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी दिले.

हर घर तिरंगा अभियानंतर्गत पहिला टप्पा ८ ऑगस्टपर्यंत, दुसरा टप्पा ९ ते १२ ऑगस्ट आणि तिसरा टप्पा १३ ते १५ ऑगस्ट या तीन टप्प्यात करावयाच्या कार्यवाही बाबत शासनाकडून सूचना आलेल्या आहेत. हर घर तिरंगा या उपक्रमांतर्गत शहरी व ग्रामीण भागातील प्रत्येक घरावर तसेच शासकीय/निमशासकीय सहकारी/खासगी आस्थापना कार्यालयात, अमृत सरोवर, वारसा स्थळे या ठिकाणी राष्ट्रध्वज फडकवण्यात यावा. ग्रामपंचायत, नगरपरिषद, नगरपंचायत आणि जिल्हास्तरावर मोठ्या प्रमाणात विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. वारसा स्थळांच्या ठिकाणी रोषणाई करण्यात येणार आहे. शाळा, महाविद्यालयामध्ये विविध विषयांवर स्पर्धा तसेच, रॅली, प्रदर्शनाचे आयोजन करण्यात येणार आहे. याबरोबरच जिल्ह्यात विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात येणार आहेत. नागरिकांनीदेखील या मोहिमेत सहभागी असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.


### जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मौजे दहिवली तर्फे निड, ता. कर्जत, जि. रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेली बिनशेती प्लॉट मिळकत, सदर मिळकतीचे विद्यमान मालक आकृती बाबूलाल गुगालीया यांचेकडुन आम्ही विकत घेण्याचे ठरविले आहे. सदर जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे दहिवली तर्फे निड, ता. कर्जत, जि. रायगड येथील बिनशेती प्लॉट मिळकत**

| स.न. | प्लॉट नं. | क्षेत्र (आर.चौ.मी) | आकार |
|---|---|---|---|
| १७५ | २५ | ५.१६.०० | १०.३२ |

तरी सदर मिळकतींमध्ये इतर कोणाचा कोणत्याही प्रकारे हक्कहितसंबंध असल्यास व सदर व्यवहारास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यानिशी खालील पत्त्यावर हि नोटीस प्रसिद्ध झालेपासुन १४ (चौदा) दिवसांत नोंदवावी. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास व्यवहार पुर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचेवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

तारीख ८/०८/२०२५

खरेदीदारातर्फे,
**श्री. ऋषभ चंद्रकांत लाड,**
बी.ई.एल.एल.बी.
पत्ता:फ्लॅट नं २३, दुसरा माळा, रोसवूड बिल्डिंग,
ललानी रोड, दहिवली, ता. कर्जत,
जि. रायगड ४१०२०१ फोन नं-८६५७२२२९९९



### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकत त्यांच्या मालकांकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.

मौजे-वडविहिर, तालुका-खालापुर, जि.-रायगड येथील जमिन मिळकत

| मालकाचे नाव | सर्वे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|---|
| दिपक महादेव मोरें | ३३ | ४/ब/५९ | ०-१-८५ गुंठे क्षेत्र मिळकत | ०-०२ |

वर वर्णन केलेली जमिन मिळकतीच्या कोणत्याही व्यक्तींचा अगर संस्थाचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास आणि किंवा कोणत्याही व्यक्तींची अगर संस्थांची आमच्या अशिलांच्या वर वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत पुराव्यासोबत लेखी स्वरूपात हरकत कळवावी, वरील मूदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील जमिन मिळकतीशी कोणत्याही व्यक्तींचा अगर संस्थांचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, तसेच कोणत्याही व्यक्तीची अगर संस्थांची आमचे अशिलांच्या वर वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत नाही किंवा असल्यास ती हरकत त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेली आहे असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील मागाहून कोणीही हरकत घेतल्यास ती आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

दि. ०८/०८/२०२५

अधिवक्ता
**शैलेश दत्तात्रेय पवार**
पत्ता. घर क्र. ३, नेमीनाथ हाईट्स शेजारी,
मुद्रे बु.कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड,
मो. ९५९५२११८६७



### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,
मौजे नागाव, ता. अलिबाग, जि.रायगड येथील खालील नमूद जमिन मिळकत ही आमचे अशिल यांनी मिळकतीचे विद्यमान मालक श्री. राजेंद्र चक्रधर ढापरे यांचेकडून खरेदी घेण्याचे ठरविलेले आहे.

**मिळकतींचे वर्णन**

| गट क्रमांक | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|
| २०७ | ०-४२-६० पैकी द्विपक्षी यांचे मालकीचे ०-०७-७० गुंठे पो.ख.०-०१-३० पैकी ०-०२-० गुंठे मिळकत आणि सदर मिळकतीवर असलेले घर नं.१७२८ क्षेत्र ६५१ चौ.फुट (६०.५० चौ.मी.) | १.८१ |

वरील मिळकतीबाबत अन्य कोणाचाही कसलाही हक्क हितसंबंध बोजा, अथवा, गहाण, दान, लिज, पोटगी, बक्षिसपत्र, साठेकरार, भाडेपट्टाकरार, खरेदी, मेन्टेनस, मेहेर, कर्ज वगैरे बाबतचा कसलाही हक्क व हितसंबंध अथवा विक्री व्यवहारास हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकती लेखी स्वरुपात कागदोपत्री पुराव्यासह आपल्या हरकती खाली सही करणार यांच्याकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांचे आत आणून द्यावी. सदर मुदतीत हरकत न आल्यास सदरचा व्यवहार आमचे अशिल पूर्ण करतील व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही हे सर्वांना कळावे.

अलिबाग
तारीख : ०८-०८-२०२५

**ॲड.रेखा किरण वाघ**
**अलिबाग रायगड**



### जाहीर सूचना

तमाम जनतेस या जाहीर नोटिसीने कळवण्यात येते की, आमचे आशिलांनी खालील अनुसूचीमध्ये वर्णन केलेली मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक १. मालती रघुनाथ गुंजाळ, २. अंकिता संजय पटवा, ३. दिशा हरिष लखचौरा, ४. ज्योत्स्ना उमेश पाटील, ५. मितेश किरण ठाकूर, ७. भावेश किरण ठाकूर, ८. संगीता दत्ताराम म्हात्रे, ९. दर्शना दशरत पाटील यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या संदर्भात आम्ही विद्यमान मालकांचे मालकी हक्क तपासत आहोत.

सदर मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध मालकीहक्काची व प्रत्यक्ष वहिवाटीतील असून ती विकण्याचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा त्यांनी आमच्या आशिलांना दिलेला आहे. मात्र, तरी देखील कोणत्याही व्यक्ती/संस्था सदर मालमत्ता किंवा त्यावरील कोणत्याही भागाच्या संदर्भामध्ये/विरुद्ध कोणताही हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेप जसे की, विक्री, अदलाबदल, भाडेपट्टा, कुळवहिवाट, परवाना, विश्वस्त, धारणाधिकार, निर्वाह, सुविधाधिकार, वारसाहक्क, ताबा, जप्ती, गहाण, प्रभार, बक्षीस, प्रलंबित वाद, एफएसआय वापर किंवा अन्यकाही दावे असल्यास त्यांनी तसे सदरच्या लिखित सुचनेसह झुंजारराव आणि कं., वकील आणि सॉलिसिटर्स, ४ था मजला, जलाराम ज्योत, जन्मभुमी मार्ग, फोर्ट, मुंबई ४००००१ येथे तसे हक्क, मालकी हक, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेपाच्या कागदपत्रांच्या प्रमाणित सत्य प्रतींसह या सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत कळवाव्यात.

वरील मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे असे गृहीत धरून आमचे आशील सदरचा खरेदी विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळवण्यात येते.

**अनुसूची**
**(मालमत्तेचे वर्णन)**

नोंदणीकृत जिल्हा व उप-जिल्हा रायगड यांचे कार्यक्षेत्र मधील गाव-परहुर, तालुका-अलिबाग, जिल्हा-रायगड येथे स्थित भूमापन क्रमांक व उपविभाग ३४, एकूण क्षेत्र ००-२४-८० ( हे.आर.चौ.मी.) आकार रु. पै.५.३१/-.

ठिकाण : अलिबाग
दिनांक : ०८/०८/२०२५
झुंजारराव आणि कं. करीता
सही/-
विक्रांत झुंजारराव



### जाहीर सूचना

तमाम जनतेस या जाहीर नोटिसीने कळवण्यात येते की, आमचे आशिलांनी खालील अनुसूचीमध्ये वर्णन केलेली मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक १. लीलावती घन:श्याम मोरे, २. जयश्री धोंडीबा शेळके, ३. शुभांगी सुभाष पालांडे, ४. प्रविण घन:श्याम मोरे, ५. गणेश घन:श्याम मोरे, ७ .विनायक घन:श्याम मोरे, ८.शैलेश घन:श्याम मोरे, ९.प्रगती प्रमोद बेलोसे यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या संदर्भात आम्ही विद्यमान मालकांचे मालकी हक्क तपासत आहोत.

सदर मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध मालकीहक्काची व प्रत्यक्ष वहिवाटीतील असून ती विकण्याचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा त्यांनी आमच्या आशिलांना दिलेला आहे. मात्र, तरी देखील कोणत्याही व्यक्ती/संस्था सदर मालमत्ता किंवा त्यावरील कोणत्याही भागाच्या संदर्भामध्ये/विरुद्ध कोणताही हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेप जसे की, विक्री, अदलाबदल, भाडेपट्टा, कुळवहिवाट, परवाना, विश्वस्त, धारणाधिकार, निर्वाह, सुविधाधिकार, वारसाहक्क, ताबा, जप्ती, गहाण, प्रभार, बक्षीस, प्रलंबित वाद, एफएसआय वापर किंवा अन्यकाही दावे असल्यास त्यांनी तसे सदरच्या लिखित सुचनेसह झुंजारराव आणि कं., वकील आणि सॉलिसिटर्स, ४ था मजला, जलाराम ज्योत, जन्मभुमी मार्ग, फोर्ट, मुंबई ४००००१ येथे तसे हक्क, मालकी हक, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेपाच्या कागदपत्रांच्या प्रमाणित सत्य प्रतींसह या सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत कळवाव्यात.

वरील मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे असे गृहीत धरून आमचे आशील सदरचा खरेदी विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळवण्यात येते.

**अनुसूची**
**(मालमत्तेचे वर्णन)**

नोंदणीकृत जिल्हा व उप-जिल्हा रायगड यांचे कार्यक्षेत्र मधील गाव-परहुर, तालुका-अलिबाग, जिल्हा-रायगड येथे स्थित भूमापन क्रमांक व उपविभाग ४४, एकूण क्षेत्र ००-१५-४० ( हे.आर.चौ.मी.) आकार रु. पै.३.८१/-

ठिकाण : अलिबाग
दिनांक : ०८/०८/२०२५
झुंजारराव आणि कं. करीता
सही/-
विक्रांत झुंजारराव



### जाहीर सावधान नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

१. मौजे वायशेत, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथील भुमापन क्रमांक व उपविभाग १४/२/३, एकूण क्षेत्रफळ ०-३०-०० हे. आर. या मिळकतीपैकी ०-०८-०० हे.आर. क्षेत्रफळ असलेली मिळकत आमचे अशिल श्री. राजाराम मोतीराम डबरी, पत्ता : संजीवनी अपार्टमेंट, तळमजला, एम.आय.डी. सी. ऑफीस समोर, चेंढरे, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड, ४०२२०१ यांनी त्या मिळकतीचे मालक श्री. अशोक रघुनाथ अधिकारी यांचेकडून सन १९९६ साली खरेदी केलेली होती व आहे. सदर मिळकतीची संपुर्ण मोबदला रक्कम आमचे अशिलांनी श्री. अशोक रघुनाथ अधिकारी यांना त्यांचे हयातीत अदा केलेली होती व आहे.

२. तेंव्हापासून सदर ०-०८-०० हे. आर. क्षेत्रफळ असलेली मिळकत आमचे अशिलांचे ताबेकब्जा वहीवाटीत मालकी हक्काने आहे. सदर ०-०८-०० हे. आर. मिळकतीमध्ये आमचे अशिलांनी गट ग्रामपंचायत थळ यांचेकडून योग्य ती परवानगी घेवून घर मिळकतीचे व विहीरीचे बांधकाम केलेले आहे. सदर घर मिळकत सुध्दा आमचे अशिलांचे ताबेकब्जा वहीवाटीत मालकी हक्काने आहे.

३. अशोक रघुनाथ अधिकारी यांनी त्यांचे हयातीत आमचे अशिलांचे सदर मिळकतमधील शांततामय ताबेकब्जास कधीही वा कोणतीही हरकत घेतलेली नव्हती व नाही.

४. अशोक रघुनाथ अधिकारी यांचे अलिकडेच निधन झाले असून त्यांचे मृत्युपश्चात त्यांची पत्नी श्रीमती आशा अशोक अधिकारी हया सदर भुमापन क्रमांक १४/२/३ ही संपुर्ण मिळकत अन्य त्रयस्थ व्यक्तींस विक्री करण्याच्या प्रयत्नात असल्याची खात्रीलायक माहिती आमचे अशिलांना प्राप्त झालेली आहे. सदर मिळकतींपैकी ०-०८-०० हे. आर. क्षेत्रफळ असलेल्या मिळकतीमध्ये आमचे अशिलांचा कायदेशीर हक्क व अधिकार असल्यामुळे आमचे अशिलांची प्रस्तावित विक्री व्यवहाराला सक्त हरकत आहे.

५. तरी वर वर्णन केलेल्या मौजे वायशेत येथील भुमापन क्रमांक व उपविभाग १४/२/३ ह्या मिळकतीबाबत कोणीही कोणत्याही प्रकारचा खरेदी-विक्री व्यवहार करू नये. त्यास आमचे अशिलांची कडक हरकत आहे. याउप्परही आमचे अशिलांची हरकत डावलून बेकायदेशीर मार्गाचा अवलंब करून जर कोणी वर नमुद केलेल्या मिळकतीसंदर्भात विक्री अथवा तत्सम प्रकारचा व्यवहार केल्यास तो आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही व त्याबाबत अलहिदा संबंधीतांवर दिवाणी व फौजदारी स्वरूपाची कायदेशीर कोर्ट कारवाई करण्यात येईल, याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक ८/०८/२०२५

सही/-
**ॲड. अनिकेत एच. गुरव**
पत्ता : ओमकार, श्रीबाग नं. २,
ता. अलिबाग, जि. रायगड ४०२२०१
ऑफीस : डॉ. केळकर क्लिनीक शेजारी, शिवाजी चौक, ता. अलिबाग, जि. रायगड
फोन नं. : ९८५०४०२०५०


## पान १ वरून

### बहिणी अपात्र

लाडक्या बहिणी संशयाच्या भोवऱ्यात सापडल्या आहेत. योजनेसाठी पात्र ठरलेल्या काही महिलांची पुन्हा पडताळणी करण्यासाठी प्रशासन ॲक्शन मोडवर आले आहे. साठ हजार महिलांची यादी तयार करण्यात आली आहे.ही यादी अंगणवाडी सेविकांकडे देण्यात आली आहे.

अनेकांनी २१ वर्षे नसताना, २१ वर्षे पूर्ण झाल्याचे दाखवून अर्ज भरले आहेत. त्यामुळे वयोमर्यादेत बसत नसताना त्यांनी लाभ घेतला आहे.एकाच कुटुंबातील तीन ते चार महिलांनी या योजेचा लाभ घेतला आहे. काही महिला अन्य योजनेचा लाभ घेत आहेत. सरकारी कर्मचारी आहेत, की नाही, याची या सर्व बाबीची पडताळणी ग्रामपातळीवर केली जाणार आहे. योजनेचे निकष पूर्ण न करणाऱ्या महिलांना अपात्र ठरवण्यात येणार आहे. जिल्ह्यातील अंगणवाडी सेविकांच्या मदतीने पडताळणी केली जाणार आहे. अंगणवाडी सेविका घरोघरी जाऊन सर्वेक्षण करणार आहेत. अर्जदारांच्या कागदपत्रांची तपासणी केली जाणार आहे. परिणामी निकषात न बसलेल्या महिलांना योजनेचा लाभ मिळणार नाही. आठ दिवसांत हा सर्वे केले जाणार असून त्याची यादी जिल्हा स्तरावरून शासनाकडे पाठविली जाणार आहे.

### महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत मोठा घोटाळा

आम्हाला इलेक्ट्रॉनिक डेटा का देत नाही. आम्ही निवडणूक आयोगाकडे वारंवार आकडेवारीची मागणी केली आहे. मात्र आम्हाला ती दिली गेली नाही. एवढंच नाही तर निवडणूक आयोगाने आम्हाला उत्तर देण्यास नकार दिला आहे, असा आरोपही राहुल गांधी यांनी केला. ते पुढे म्हणाले की, देशामध्ये बनावट मतदान होत आहे. आम्हाला ही चोरी पकडण्यात बराच काळ लागला. या मतदार यादीमध्ये अनेक लोकांच्या वडिलांच्या नावासमोर काहीही लिहिण्यात आलेलं आहे. मतदार यादीत अनेक घरांचा पत्ता शून्य आहे. डुप्लिकेट मतदारांची संख्या खूप अधिक आहे. ११ हजार संशयित असे आहेत, ज्यांनी तीन तीन वेळा मतदान केलं आहे. हे लोक कुठून येत आहेत. एकाच पत्त्यावर ४६ मतदार असल्याचं समोर आलं आहे.

**२४ तासांत स्वाक्षरीसह शपथपत्र देण्याचे आदेश**

गेल्या काही दिवसांपासून निवडणूक आयोगाला सातत्याने लक्ष्य करत असलेले काँग्रेसचे ज्येष्ठ नेते राहुल गांधी यांनी निवडणुकीत झालेल्या घोटाळ्याचे पुरावे पत्रकार परिषदेमधून प्रसारमाध्यमांसमोर सादर केले. राहुल गांधी यांनी महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीसोबतच कर्नाटकमध्ये लोकसभा निवडणुकीत फेरफार झाल्याचा दावा केला होता. दरम्यान, या दाव्यानंतर कर्नाटक निवडणूक आयोगाने राहुल गांधी यांना महत्त्वपूर्ण सूचना दिली आहे.मतदार यादीत अपात्र मतदारांचा समावेश आणि पात्र मतदारांना हटवण्याबाबत केलेल्या आरोपांबाबत सहीनिशी शपथपत्र सादर करण्याचे आदेश कर्नाटक निवडणूक आयोगाच्या आयुक्तांनी दिले आहेत. त्यासाठी निवडणूक आयोगाने राहुल गांधी यांना शुक्रवारी दुपारी ३ वाजेपर्यंतची मुदत दिली आहे.दरम्यान, महाराष्ट्रात मतांची चोरी झाल्याचा आरोप करणाऱ्या राहुल गांधी यांनी कर्नाटकमधील लोकसभा निवडणुकीत घोटाळा झाल्याचा आरोप केला आहे. ते म्हणाले की, महाराष्ट्राप्रमाणेच कर्नाटकमध्येही मतांचा घोटाळा झाला आहे.

### सीआरपीएफ जवानांचं वाहन दरीत कोसळलं

केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या १८७ व्या बटालियनची बस उधमपूर जिल्ह्यातील कदवा येथील बसंत गढाचा घाट चढत असताना २०० फूट खोल दरीत कोसळली. या अपघातात तीन जवानांचा मृत्यू झाला असून १५ हून अधिक जवान जखमी झाले आहेत. सर्व जखमी जवानांना एअरलिफ्ट करून उधमपूरमधील भारतीय लष्कराच्या रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. दरम्यान, या दुर्घटनेचं कारण अद्याप समोर आलेलं नाही.

केंद्रीय मंत्री डॉ. जितेंद्र सिंह यांनी याबाबत एक्सवर एक पोस्ट केली आहे. या पोस्टमध्ये त्यांनी म्हटलं आहे की कंदवा-बसंतगड परिसरात सीआरपीएफच्या वाहनाचा अपघात झाला आहे. या दुर्गटनेत काही जवानांनी आपला जीव गमावला आहे. हे वृत्त ऐकून मी खूप व्यथित झालो आहे. या वाहनातून सीआरपीएफचे शूर जवान प्रवास करत होते. मी आत्ताच पोलीस उपायुक्त सलोनी राय यांच्याशी बातचीत केली आहे. सलोनी वैयक्तिकरित्या या घटनेवर लक्ष ठेवून आहेत आणि वरचेवर मला माहिती देत आहेत. पोलिसांनी तातडीने बचावकार्य सुरू केलं आहे. तसेच स्थानिक लोक स्वतःहून मदत करण्यासाठी पुढे आले आहेत. आम्ही शक्य तितकी सर्व प्रकारची मदत पुरवत आहोत.

### पनवेलमध्ये अपघातात दोन ठार

अनिकेतच्या स्कूटीला धडक दिली. रस्त्यावर कोसळलेल्या अनिकेतच्या अंगावरून ट्रेलरचे चाक गेल्याने अनिकेत जागीच ठार झाला. याबाबत कळंबोली पोलीस ठाण्यात २३ वर्षीय ट्रेलर चालक शिवप्रकाश वर्मा याच्यावर हलगर्जीपणाने ट्रेलर चालविल्यामुळे गुन्हा नोंद करण्यात आला असून सहाय्यक पोलीस निरीक्षक तृप्ती शेळके या अधिक तपास करीत आहेत. दुसऱ्या घटनेत सकाळी साडेनऊ वाजता कसळखंड गावच्या समोरील रसायनी रस्त्यावरून दुचाकीने ४७ वर्षीय वसंत लबडे हे कामानिमित्त दुचाकीवरून जात असताना त्यांना आयशर टेम्पोने धडक दिल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला. पनवेलमध्ये अनेक महामार्ग व अंतर्गत रस्त्यांवर खड्डे पडले आहेत. खड्डे चुकविण्यासाठी तसेच खड्ड्यात दुचाकींचे चाक रुतल्याने होणारे अपघातांसोबत बेशीस्त वाहन चालविण्यामुळे अनेकदा अपघात घडत आहेत. याच खड्ड्यांमुळे वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणात होत असल्याने गणेशोत्सवापूर्वी विविध राज्य व राष्ट्रीय महामार्गांवर खड्डे बुजवून घेणे गरजेचे आहे.

# निवडक

## आदिवासी कार्यकर्त्यांचा आत्मदहनाचा इशारा

**नेरळ :** माथेरान डोंगरात असलेल्या आदिवासी वाड्यांना जोडणारा रस्ता वन खात्याच्या लाल फितीत अडकला आहे. जानेवारी २०२४ मध्ये या रस्त्याच्या कामाचे भूमिपूजन राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले होते; मात्र, त्या १३ किलोमीटर रस्त्याचे काम अद्याप सुरू झाले नाही. त्यामुळे रस्त्याच्या कामासाठी आदिवासी कार्यकर्ते जैतू पारधी आणि गणेश पारधी यांनी आत्मदहनाचा इशारा दिला आहे. माथेरानच्या डोंगर भागात असणाऱ्या १३ आदिवासी वाड्यांना अजूनही रस्ता नाही. शासनाच्या मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून रस्त्याचे काम मंजूर आहे. किरवली ते माणगाव तर्फे वरेडी ग्रामपंचायत मधील धनगर वाड्यांना जोडणाऱ्या या रस्त्याला निधी मंजूर असूनही वन विभागाच्या परवानग्या मिळत नसल्याने काम बंद आहे. काही दिवस माथेरान डोंगरात जोरदार पाऊस सुरू असल्याने नाल्यामधून वाहणाऱ्या पाण्यामुळे पायवाट रस्ता बंद आहे. जानेवारी २०२४ मध्ये राज्याचे तात्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी भूमिपूजन झालेल्या रस्ता अद्याप झाला नाही. परिणामी या आदिवासी वाडयातील जेष्ठ नागरिक, गर्भावती महिला तरुण यांना आजारपणाच्या वेळी झोळीचा खडतर प्रवास करावा लागत आहे. तर, यापूर्वी स्थानिक अनेक लोकांना रस्ता नसल्याने काही आदिवासींना आपले प्राण गमवावे लागले होते. या रस्त्यासाठी वन विभाग जागा देत नसल्याने आदिवासींचा रस्ता पुढे जात नाही. शासनाने या पत्राची नोंद घेतली नसल्याने आदिवासी समाज संतप्त झाला आहे. रायगड जिल्हाधिकारी यांना पत्र दिल्यानंतर कोणत्याही प्रकारची कार्यवाही झालेली नाही. त्यामुळे आदिवासी कार्यकर्ते जैतू पारधी आणि गणेश पारधी यांनी १५ ऑगस्ट रोजी माथेरान नाक्यावरील हुतात्मा चौक येथे आत्मदहन करण्याचा निर्णय घेतला आहे.



## आरपीआयकडून आंदोलनाचा इशारा

**नेरळ :** कर्जत येथील पत्रकार प्रथमेश कुडेकर यांना झालेल्या हल्ल्याप्रकरणी दोषींवर कारवाई करावी, या मागणीसाठी कर्जत आरपीआय आठवले पक्षाच्यावतीने निवेदन देऊन हल्लेखोरांना तात्काळ अटक करण्याची मागणी करण्यात आली आहे. प्रथमेश कुडेकर यांच्यावर १ ऑगस्ट रोजी कर्जत-चौक मार्गावर कृषी संशोधन केंद्राच्या समोर अज्ञात हल्लेखोरांकडून भ्याड हल्ला करण्यात आला होता. त्यात त्यांना गंभीर इजा झाली. या घटनेच्या निषेधार्थ आज कर्जत आरपीआयच्यावतीने निषेध नोंदवण्यात आला असून या हल्ल्यातील आरोपींना लवकरात लवकर पकडून कठोर कारवाई करण्यात यावी. नाहीतर कर्जत पोलीस स्टेशन समोर तीव्र स्वरूपात आंदोलन केले जाईल, असा इशारा देणारे निवेदन कर्जत पोलिसांना देण्यात आले आहे. हे निवेदन कर्जतचे पोलीस उपनिरीक्षक किरण नवले यांनी स्वीकारले.



## मुंबई-गोवा महामार्गाबाबत निवेदन

**अलिबाग :** मुंबई-गोवा महामार्ग आज देखील सुखकर प्रवासासाठी योग्य नसल्यामुळे त्याचा त्रास सर्वसामान्य जनतेला बसत आहे. त्यामुळे येत्या गणेशोत्सवापूर्वी मार्ग वाहतुकीस सुखकर न केल्यास शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाकडून चक्का जाम केला जाईल, असा इशारा निवेदनाच्या माध्यमातून दिला आहे. मुंबई-गोवा महामार्गाचे काम गेल्या अनेक वर्षांपासून रडत खडत सुरू आहे. आज देखील नागोठणे, वडखळ व लोणेरे या ठिकाणी तसेच पुढे चिपळूण दरम्यान रस्त्याचे काम संथ गतीने सुरू आहे. झालेला काँक्रीट मार्ग देखील उंच सखल आणि खाज खळग्यांचा झाला असल्याने रस्त्यावरून वाहने चालवताना वाहनांचे नुकसान होत आहे. त्याचप्रमाणे वाहनांचे टायर देखील गरम होतात. अशा प्रकारच्या तक्रारी वाहन चालकांकडून येत आहेत. नागोठणे, लोणेरे, कोलाड या ठिकाणी देण्यात आलेल्या पर्यायी मार्गावर देखील खड्डेच खड्डे पडले आहेत. तसेच, पुलांची कामे देखील अपूर्ण आहेत. या सर्व कामांचा आणि निकृष्ट दर्जाच्या महामार्गाचा त्रास गणेशोत्सवात येणाऱ्या चाकरमान्यांना बसतो. त्यामुळे महाड मधील शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाच्या कार्यकर्त्यांनी आणि वाहतूक सेनेच्या पदाधिकाऱ्यांनी महान प्रांताधिकारी यांना मुंबई-गोवा महामार्गाबाबत निवेदन सादर केले आहे.

# अमानवी हातरिक्षांवर ‘सर्वोच्च’ बंदी

## • पर्यावरण पूरक ई-रिक्षा चालवल्या जाणार





**| नेरळ | प्रतिनिधी |**

**आगामी सहा महिन्यांत माथेरानमधील हात रिक्षा ओढण्याची अमानवीय पद्धत बंद करून ई-रिक्षा सुरू करण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. त्यामुळे माथेरानमधील सर्व ९४ हातरिक्षा चालकांच्या हाती इ-रिक्षा येण्याची शक्यता निर्माण झाली आहे.**

देशाच्या स्वातंत्र्याच्या ७८ वर्षांनंतरही हाताने ओढणाऱ्या रिक्षांचा वापर सुरू असल्याबद्दल बुधवारी (दि.६) सर्वोच्च न्यायालयाने तीव्र नाराजी व्यक्त केली. तसेच, माथेरानमधील ही ‘अमानवी’ प्रवासी सेवा सहा महिन्यांत बंद करण्याचे आणि त्याऐवजी ई-रिक्षा सुरू करण्याचे आदेश न्यायालयाने महाराष्ट्र सरकारला दिले आहेत. भारतासारख्या विकसनशील देशात मानवी प्रतिष्ठेच्या मूलभूत संकल्पनेविरुद्ध असलेल्या अशा प्रथेला परवानगी देणे सामाजिक आणि आर्थिक न्यायाच्या घटनात्मक आश्वासनांचा अनादर आहे, असे सरन्यायाधीश बी. आर. गवई, न्यायमूर्ती के. विनोद चंद्रन आणि न्यायमूर्ती एन. व्ही. अंजारिया यांच्या खंडपीठाने म्हटले आहे. यासोबतच खंडपीठाने माथेरान मधील हातरिक्षा पद्धत पूर्णपणे बंद करण्याचे आदेश दिले आहेत. गुजरातच्या केवडिया येथील सरदार पटेल यांच्या सर्वात उंच पुतळ्याच्या परिसरात स्थानिकांना ई-रिक्षा देण्यात आल्या आहेत. त्याप्रमाणे माथेरानमधील स्थानिकांना ई-रिक्षा उपलब्ध करून देण्याची शक्यता तपासण्याचे निर्देश राज्य सरकारला देण्यात आले आहेत.

स्वातंत्र्याच्या ७८ वर्षांनंतर आणि राज्यघटना लागू झाल्यानंतर ७५ वर्षांनंतर आणि नागरिकांना सामाजिक आणि आर्थिक न्याय देण्याचे आश्वासन दिल्यानंतर देखील अशी मानवी प्रथा चालू ठेवणे हे भारतातील लोकांनी स्वतःला दिलेल्या वचनाचा विश्वासघात असेल, असे सर्वोच्च न्यायालयाने आपल्या आदेशात म्हटले आहे. आपल्या आदेशात खंडपीठाने ‘आझाद रिक्षाचालक संघटना विरुद्ध पंजाब राज्य’ या खटल्यातील रस्त्यांवर आणि व्यापारी मार्गावर कोणतेही पेव्हर ब्लॉक टाकू नयेत. त्यात रायगड जिल्हाधिकाऱ्यांची समिती प्रत्यक्ष स्थिती लक्षात घेऊन आवश्यक असलेल्या ई-रिक्षांची संख्या ठरवेल. उर्वरित ई-रिक्षा माथेरानमधील आदिवासी महिला आणि इतर व्यक्तींना स्थिर उदरनिर्वाहासाठी वाटप करता येतील, असे म्हटले आहे.

४५ वर्षे जुन्या निकालाचा संदर्भ दिला असून सायकल रिक्षा पद्धत राज्य घटनेतील प्रस्तावनेच्या सामाजिक न्यायाच्या प्रतिज्ञेशी विसंगत असल्याचे म्हटले होते. आझाद रिक्षाचालक संघटना प्रकरणात या न्यायालयाने केलेल्या निरीक्षणाच्या ४५ वर्षांनंतर देखील एका माणसाने दुसऱ्या माणसाला ओढण्याची प्रथा माथेरान शहरात अजूनही प्रचलित असणे खरोखरच दुर्दैवी आहे, अशा शब्दात सरन्यायाधीशांनी नाराजी व्यक्त केली.आपण जर स्वतःला विचारले की, ही प्रथा सामाजिक आणि आर्थिक समानता आणि सामाजिक आणि आर्थिक न्यायाच्या संविधानिक वचनानुसार आहे का? तर, दुर्दैवाने याचे उत्तर नकारार्थीच द्यावे लागेल. दारिद्र्य अनेकदा लोकांना अशा कामासाठी भाग पाडते, असेही खंडपीठ स्पष्ट केले आहे.

### काय आहे न्यायालयाचा आदेश?

**अगामी सहा महिन्यांत हातरिक्षा टप्प्याटप्प्याने बंद करण्यात याव्यात. दस्तुरी नाका ते शिवाजी पुतळ्यापर्यंत पेव्हर ब्लॉक टाकण्यात यावेत. त्याचबरोबर डोंगराळ शहरातील अंतर्गत पर्यावरण पूरक ई-रिक्षा चालवल्या गेल्या पाहिजेत.**

# नगरपरिषदेचे अनधिकृत बांधकामांना अभय

## • बाजारपेठेला रिक्षा स्टँड, पार्किंगचे ग्रहण



**| श्रीवर्धन | प्रतिनिधी |**

काही वर्षांपूर्वी श्रीवर्धन नगरपरिषदेने कोपरी मार्ग नाल्यावर काँक्रीटचा रस्ता तयार करून या ठिकाणाहून दुचाकी वाहनांसह पादचारी जातील अशा प्रकारची सोय उपलब्ध करून दिली. परंतु, या रस्त्याच्या दुतर्फा अनधिकृत गाळे बांधण्यात आले आहे. त्यामुळे हा रस्ता अरूंद झाला आहे. त्यातच या रस्त्याला अनधिकृत पार्किंग आणि रिक्षा स्टँडचे ग्रहण लागले आहे. त्यामुळे या मार्गावरून जाताना पादचाऱ्यांना प्रचंड प्रमाणात त्रास सहन करावा लागत आहे. तसेच, येथील अनधिकृत बांधकामांना नगरपरिषदेने अभय दिल्याचे देखील स्थानिकांमधून बोलले जात आहे.

श्रीवर्धन पेशवे आळी येथून श्रीवर्धन बाजारपेठेकडे जाण्याच्या कोपरी मार्ग या नाल्यावर श्रीवर्धन नगरपरिषदेने काँक्रीटचा रस्ता बनवला. हा काँक्रीट रस्ता दुचाकी व पादचाऱ्यांसाठी असला तरीही या मार्गावरून तीन आसनी रिक्षा, त्याचप्रमाणे काही चारचाकी वाहने देखील नियमितपणे जात असतात. तसेच, या मार्गाच्या दुतर्फा काही बांधकाम व्यवसायिकांनी अनधिकृत दुकान गाळे बांधले आहेत. त्यामुळे रस्त्याची रुंदी देखील कमी झाली आहे. त्याचप्रमाणे या ठिकाणी अनधिकृतपणे अनेक दुचाकी वाहने पार्किंग केलेली पाहायला मिळतात. तसेच, या मार्गावरती न्यू आपला बाजार हे सुपर मार्केट असून त्याच्यासमोर अनधिकृत रिक्षा स्टॅन्ड तयार झालेला आहे. या मार्गावर सतत वाहतुकीची वर्दळ वाढल्यामुळे या ठिकाणी टाकलेला स्लॅब देखील उखडून निघाला आहे. हा सर्व प्रकार नगरपरिषद प्रशासनाच्या समोर सुरू असून नगरपरिषद प्रशासनाकडून या अनधिकृत बांधकामांना अभय मिळत असल्याची चर्चा स्थानिकांमध्ये आहे.

# पूलावरून धोकादायक प्रवास



**| पाली | प्रतिनिधी |**

सुधागड तालुक्यातील घोटवडे येथील अंबानदी पुल जीर्ण व धोकादायक झाला आहे. घोटवडे व इतर गाव तसेच आदिवासी वाड्यावस्त्यांना जोडणाऱ्या वाहतूक व दळणवळणाच्या दृष्टीने महत्वपूर्ण असलेला या पुलावरून होणाऱ्या अवजड वाहतुकीमुळे चिंता वाढली आहे. शेजारीच सुरु असलेल्या नव्या पुलाचे बांधकाम खोळंबले आहे. त्यामुळे नवीन पूल वाहतुकीस सुरु होईपर्यंत ग्रामस्थ व वाहनांना सध्या या जीर्ण पुलावरूनच धोकादायकपणे प्रवास करावा लागत आहे. रायगड जिल्हा परिषद बांधकाम विभागाच्या अखत्यारीत असलेल्या ४५ मीटर लांबी व ५ मीटर रुंदीच्या घोटवडे पुलाचे काम सार्वजनिक बांधकाम विभाग पाली सुधागडच्या माध्यमातून १९९१ साली करण्यात आले होते. तालुक्यातील इतर गावांसह आदिवासीवाड्यांना जोडणारा हा पुल वाहतुकीच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा आहे. मात्र, हा पूल अखेरची घटका मोजत आहे.

# जनरल अरुणकुमार वैद्य यांचा स्मृतीदिन

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

पंजाब प्रश्न नष्ट होण्यासाठी सुवर्ण मंदिरात सैन्य घुसविल्यामुळे शहिद झालेले भारताचे माजी लष्करप्रमुख, जनरल अरुणकुमार वैद्य यांचा ३९ वा स्मृतीदिन अलिबागमध्ये साजरा करण्यात येणार आहे. हा कार्यक्रम शहरातील सरखेल आंग्रेवाड्यासमोरील अलिबाग तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या शिशुविहार प्राथमिक शाळेमध्ये रविवारी (दि.१०) सकाळी १० वाजता होणार आहे.



जनरल अरुणकुमार वैद्य हे अलिबागमधील इंडस्ट्रीयल हायस्कूलचे माजी विद्यार्थी होते. भारतीय सैन्य दलात लष्करप्रमुख असताना २९ सप्टेंबर १९८५ मध्ये त्यांनी या हायस्कूलला सदिच्छा भेट दिली होती. लष्करप्रमुख पदावरून सेवानिवृत्त होताच त्यांचे शासकीय संरक्षण काढण्यात आले. पूणे येथे आयुष्याची सायंकाळ समाधानाने घालवीत असताना शीख आतिरेक्यांकडून १० ऑगस्ट १९८६ रोजी ते शहिद झाले. शहिद अरुणकुमार वैद्य यांच्या कार्याची माहिती चिरकाल राहण्यासाठी इंडस्ट्रियल हायस्कूलला माजी लष्कर प्रमुख जनरल अरूणकुमार वैद्य असे नाव को.ए. सो. या शिक्षण संस्थेने दिले. अरुणकुमार वैद्य यांचा स्मृतीदिन अलिबाग येथे शासकीय इतमामाने साजरी होण्यासाठी ज्येष्ठ पत्रकार बळवंत वालेकर यांनी जिल्हाधिकारी रायगड यांच्या शिफारशीसह प्रकरण मंत्रालय मुबई येथे पाठविले आहे.



**अलिबाग बंदरात मासेमारीला सुरुवात झाली असून मच्छिमारांच्या जाळ्यात शेकडो टन मांदेली सापडली आहे. ही मांदेली जाळीतून सोडवण्यात मच्छिमार व्यस्त होते. त्यामुळे स्थानिकांसह पर्यटक खवय्यांना चांगली मेजवानी मिळणार आहे. (छायाचित्रः समीर मालोदे)**

## स्मार्ट मीटरच्या बिलांचा धक्का

**सुतारवाडी :** परिसरामध्ये स्मार्ट मीटर बसविण्यात आले आहेत. या स्मार्ट मीटरने परिसरातील नागरिकांची झोप उडवली आहे. गेल्या अनेक महिन्यांपासून सामान्य माणूस चार अंकी बिल भरून हैरान झाला आहे. याबाबत अनेकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली असून यापूर्वी अनेकांनी असे स्मार्ट मीटर बसवण्यास विरोध केला असताना सुद्धा जबरदस्तीने हे मीटर बसविण्यात आलेले आहेत. भरमसाठ येणारी बिलं गणपती सण येण्यापूर्वी कमी करून मिळावीत, अशी नागरिकांची मागणी आहे.

# ज्येष्ठांनी घेतला वर्षा सहलीचा आनंद





**| अलिबाग | प्रतिनिधी|**

अलिबाग तालुक्यातील शहाबाज येथील ज्येष्ठ नागरिक संघटनेच्यावतीने वर्षा सहलीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी वेगवेगळ्या धार्मिक स्थळांना भेटी देत ज्येष्ठांनी सहलीचा आनंद लुटला. खालापूर तालुक्यातील नढाळ येथील श्रीक्षेत्र पंचायतन मंदिर येथे एक दिवसीय सहलीचे आयोजन करण्यात आले होते. या ठिकाणी पाच मंदिरांचा समूह आहे. श्रीसाईबाबा, श्रीगणपती, श्रीहनुमान, श्रीनढाळेश्वर आणि भवानी माता या देवतांची मंदिरे आहेत. पर्यटकांसाठी सुंदर आणि शांत ठिकाण आहे. सकाळी महडच्या वरद विनायकाचे दर्शन घेऊन सहलीची सुरुवात झाली. परतीच्या प्रवासात खोपोलीच्या गगनगिरी महाराजांच्या आश्रमाला भेट दिल्यानंतर सहलीची यशस्वी सांगता झाली.

# वाकण-खोपोली मार्गावर जीवघेणे खड्डे



**| सुधागड-पाली | वार्ताहर |**

अवघ्या दोन तीन वर्षांपूर्वी रुंदीकरण पूर्ण झालेल्या वाकण-खोपोली राज्य महामार्गावर जीवघेणे खड्डे पडले आहेत. खड्ड्यात आदळून अनेक अपघात होत आहेत. वाहनांचेही मोठे नुकसान होत आहे. त्यामुळे प्रवासी व नागरिकांचा संताप आता अनावर झाला आहे.

वाकण-खोपोली हा राज्य महामार्ग ३९ किलोमीटर लांबीचा आहे. या रस्त्याचे काम २०१६ पासून शासनाच्या महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या माध्यमातून सुरु करण्यात आले आणि दोन ते तीन वर्षांपूर्वी पूर्ण झाले. मात्र, इतके वर्षे काम सुरु असलेल्या या मार्गाच्या कामाच्या दर्जाच्या बाबत अनेकांनी प्रश्न निर्माण केला आहे. शासनाकडून सुमारे २०० कोटी रुपये खर्चून तयार करण्यात आलेल्या या मार्गाच्या दुरवस्थेमुळे प्रवासी व नागरिक संतप्त आहेत. या मार्गावरील खड्डे योग्य प्रकारे भरण्यासाठी स्थानिकांनी मागील दोन महिन्यात दोन वेळा आंदोलन केले. खड्ड्यामंध्ये झाडे लावून तसेच फलक दाखवून हे आंदोलन करण्यात आले. मात्र, अजुनपर्यंत कोणतीच ठोस उपाययोजना करण्यात आलेली नाही. मागील आठवड्यात तुकसई गावाजवळील खड्ड्यात दुचाकी आपटून एक तरुण गंभीर जखमी झाला होता.

> **एमएसआरडीसी अजून किती अपघातांची वाट बघणार आहे. रस्त्याची दुरवस्था व खड्ड्यांमुळे अनेक अपघात होत आहेत. अनेकांचा मृत्यू झाला अनेक जण गंभीर जखमी होत आहेत. या रस्त्याची लवकर लवकर दुरुस्ती करून खड्डे चांगल्या प्रकारे भरण्यात यावेत. अन्यथा मनसे स्टाईलने आंदोलन केले जाईल.**
> **– सुनील साठे, मनसे अध्यक्ष, सुधागड तालुका**

## राष्ट्रपती भवनाकडून अधिकृत आमंत्रण | मुरूड नगरपरिषदेतर्फे विशेष कौतुक

# विजय चौलकर दिल्लीच्या राजपथावर

**| आगरदांडा | प्रतिंनिधी |**

स्वातंत्र्य दिनानिमित्त राष्ट्रपती भवनात आयोजित विशेष समारंभासाठी मुरुड शहरातील प्रधानमंत्री आवास योजनेचे लाभार्थी विजय चौलकर यांची विशेष निमंत्रित म्हणून निवड करण्यात आली आहे. तसे त्यांना राष्ट्रपती भवनाकडून अधिकृत आमंत्रण पत्रिका आणि समारंभासाठीचा पास देण्यात आला आहे. संपूर्ण महाराष्ट्रातून केवळ एकमेव लाभार्थी म्हणून विजय चौलकर यांना विशेष निमंत्रित करण्यात असल्याने रायगड जिल्ह्याच्या दृष्टीने ही एक अत्यंत गौरवाची आणि अभिमानास्पद बाब ठरली आहे. मुरुड-जंजिरा नगरपरिषदेच्यावतीने गुरूवारी (दि.७) मुख्याधिकारी तथा प्रशासक सचिन बच्छाव यांच्याकडून विजय चौलकर यांचे विशेष कौतुक व अभिनंदन करण्यात आले.





यावेळी प्रशासकीय अधिकारी नंदकुमार आंबेतकर, कर निर्धारण अधिकारी अनिकेत जगदाळे, नगररचना सहाय्यक अनिकेत भोसले व शहर स्तरीय अभियंता जयकृष्ण भिसे आदिंसह मान्यवर उपस्थित होते.

मुरुड शहरातील गणेश आळीतील विजय चौलकर हे रंगकामाच्या व्यवसायावर आपला उदरनिर्वाह करतात. केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत त्यांना स्वप्नातील घर मिळाले. यावेळी बोलताना त्यांनी सांगितले की, या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीमुळे त्यांचे जीवनमान सुधारले. या योजनेच्या यशामागे मुरुड-जंजिरा नगरपरिषदेचे मुख्याधिकारी सचिन बच्छाव यांचे कुशल मार्गदर्शन, तसेच शहरस्तरीय अभियंता जयकृष्ण भिसे यांनी लाभार्थी निवड, कागदपत्रे सादर करणे आणि मंजुरीसाठी घेतलेली विशेष मेहनत याचा सिंहाचा वाटा आहे, अशी प्रतिक्रिया दिली.

राष्ट्रपती भवनात होणाऱ्या या समारंभात देशभरातून केवळ निवडक १० लाभार्थ्यांना आमंत्रित करण्यात आले आहे. यामध्ये महाराष्ट्राचे प्रतिनिधी म्हणून विजय चौलकर हे उपस्थित राहणार आहेत. या निवडीमुळे मुरुड शहरासह संपूर्ण रायगड जिल्ह्याचे नाव राष्ट्रीय पातळीवर झळकले असून, ही बाब मुरुडवासीयांसाठी अभिमानाची आहे.नगर परिषदेच्या या यशामुळे नागरिकांमध्ये प्रधानमंत्री आवास योजनेबाबत अधिक विश्वास निर्माण होणार आहे. शासनाच्या विविध योजनांचा लाभ सामान्य जनतेपर्यंत पोहोचवण्याच्या दृष्टिकोनातून मुरुड जंजिरा नगर परिषद कार्यतत्पर असते, अशी प्रतिक्रिया मुख्याधिकारी सचिन बच्छाव यांनी केले.

# हेच मोदींना सांगणार का?

राहुल गांधी यांनी कसे वागावे याचे सल्ले भाजपवाले त्यांना नेहमी देत असतात. आता सर्वोच्च न्यायालयाचीही त्यात भर पडली आहे. राहुल यांनी चिनी आक्रमणाबाबत काही सवाल केले होते. पण तुम्ही सच्चे भारतीय असाल तर असे प्रश्न करणार नाही असे सर्वोच्च न्यायालाचे न्यायमूर्ती दीपांकर दत्ता यांच्या खंडपीठाने त्यांना सुनावले. हा न्यायमूर्तींचा लेखी निर्णय नाही. वकिलांसोबत बोलताना त्यांनी मारलेला हा शेरा आहे. न्यायालयाचा पूर्ण आदर ठेवूनही असे म्हणावे लागेल की तो अतिशय गंभीर आहे. राहुल यांनी अधिक माहिती घेऊन वा जबाबदारीने बोलावे असे न्यायालय म्हणाले असते तर ते समजण्यासारखे होते. पण त्यांच्या देशभक्तीविषयीच शंका घेणे हा आक्षेपार्ह प्रकार आहे. राहुल गांधी किंवा विरोधक हे पाकिस्तानची भाषा बोलतात असा आरोप भाजपवाले सतत करीत असतात. हा आरोप अत्यंत खुनशीपणाचा व सर्व संकेत व सभ्यतांचा भंग करणारा आहे. त्याला बळ मिळेल अशा प्रकारचा शेरा सर्वोच्च न्यायालयाच्या ज्येष्ठ म्हणवणाऱ्या न्यायाधीशांनी मारावा हे अत्यंत दुर्दैवी आहे. न्यायालयांवरचा जनतेचा विश्वास आधीच कमी होऊ लागला आहे. त्यात असे शेरे मारले गेले तर न्याययंत्रणेची प्रतिष्ठा वेगाने कमी होऊ लागेल. चीनने लडाखच्या गलवान प्रांतात २०२० मध्ये जेव्हा अतिक्रमम केले तेव्हा झटापटीत वीस सैनिक मारले गेले होते. चीन भारताची सरहद्द ओलांडून आत आला व बराच काळ बऱ्याच प्रदेशात त्याने मुक्काम केला. नंतर तो माघारी गेला तरीही भारताचा सर्व प्रदेश त्याने मोकळा केला नाही. त्यामुळे पूर्वी आपले सैनिक टेहळणीसाठी सहज जेथे जाऊ शकत होते तेथे जाण्यासाठी चिनी सैन्य त्यांना परवानगी देत नाही. काही माजी सैन्याधिकारी, या भागाचे जाणकार व पत्रकार यांनी विविध पुराव्यांच्या आधारे ही गोष्ट वेळोवेळी मांडली आहे. भारत व चीन यांच्यात या घटनेनंतर वाटाघाटी झाल्या. त्यांच्या अखेरीला चिनी सैन्य माघारी गेल्याचे जाहीर करण्यात आले. चीनचे सैनिक आपल्या हद्दीत घुसून आले होते याचा हा पुरावाच होता.

## भाजपला आयते कोलीत

या संदर्भातील अत्यंत वाईट व आक्षेपार्ह बाब म्हणजे मोदी सरकारने या प्रकरणात प्रचंड दडपादडपी केली. खुद्द नरेंद्र मोदी यांनी भारतीय हद्दीत कोणीही आलेले नाही व कोणीही गेलेले नाही असे म्हटले. ते खोटे असल्याचे अनेक पत्रकारांनी दाखवले. तरीही सरकारतर्फे याबाबत अधिकृतरीत्या काहीही सांगण्यात आले नाही. मोदी तर पत्रकारांशी बोलत नाहीतच. पण संरक्षणमंत्री राजनाथ सिंग यांनीही याबाबत पत्रकार परिषद घेतली नाही. दरम्यानच्या काळात राहुल गांधी लडाखमध्ये गेले व त्यांनी स्थानिकांशी चर्चा केली. पूर्वी आपण आपली गुरे चरण्यासाठी जिथे जात होतो तेथे आता जाऊ शकत नाही व चीनने आपला बराच भाग घेतला आहे असे लडाखींनी राहुल यांना सांगितले. हा भाग डोंगराळ, कमी ऑक्सिजन असलेला अत्यंत उंचावरचा आहे. त्यामुळे इथे आखलेली सरहद्द नाही. पण वर्षानुवर्षे लडाखी नागरिक राहतात व त्यांना आपल्या हद्दी नेमक्या ठाऊक आहेत. त्यामुळे त्यांचे म्हणणे ग्राह्य मानायला हवे. राहुल यांनी हा मुद्दा उपस्थित केला. त्यावरही सरकारने काहीच खुलासा केला नाही. परिणामी भारत जोडो यात्रेमध्ये राहुल त्यावर सातत्याने बोलत राहिले. त्यात एका सभेमध्ये राहुल यांनी चीनने भारताचा दोन हजार चौरस किलोमीटर प्रदेश बळकावला असल्याचा आरोप केला. हा आरोप खोटा असेल तर सरकारने त्याला उत्तर द्यायला हवे होते. पण थेट ते उत्तर न देता भाजपवाल्यांनी एका माजी सेना अधिकाऱ्याला पुढे करून त्यांच्याविरुध्द मानहानीचा गुन्हा दाखल केला. त्याला राहुल यांनी सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले आहे. तेथेच त्यांना दीपांकर दत्ता यांच्याकडून हे शब्द ऐकून घ्यावे लागले. या प्रकरणातील सुनावणी चालू असून अंतिम निकाल बाकी आहे. मात्र न्यायमूर्तींच्या या उद्गारांना भाजपवाले आणि त्यांच्या कह्यातला गोदी मिडिया यांनी भरपूर प्रसिद्धी दिली. न्यायालयाने नकळतपणे व अप्रत्यक्षपणे या सर्व खेळाला बळ द्यावे हे दुःखदायक आहे.

## न्यायालयांचे कैसे बोलणे?

चीनच्या आक्रमणाबाबत मोदींनी आजतागायत स्पष्टपणे काहीही खुलासा केलेला नाही. पाकिस्तानवर सर्जिकल स्ट्राईकच्या बाता करणाऱ्या मोदी व भाजपवाल्यांची बोलती चीनचा मुद्दा निघाला की बंद होते. तिथे मग पुन्हा नेहरुंनी काय केले वगैरे भूतकाळाच्या गोष्टी बोलल्या जातात. लडाख आणि अरुणाचलमध्ये चीन आपल्याला सतत तणावात ठेवतो आहे हे उघड आहे. लडाखमध्ये त्याने थेट अतिक्रमण केले. अरुणाचलवर तो अजूनही हक्क सांगतो. लोकसभेतील विरोधी पक्षनेता म्हणून राहुल यांना याबाबत बोलण्याचा पूर्ण हक्क आहे. नव्हे त्यांची ती जबाबदारीच आहे. न्यायमूर्ती दत्ता त्यांना म्हणाले की, तुम्ही या गोष्टी संसदेत बोलाव्यात. हेच न्यायालय मोदींनी चीनबाबत संसदेत स्पष्ट खुलासा करावा असा आदेश, निदान तोंडी तरी, देईल काय? अर्थातच करणार नाही. तिथे राष्ट्रीय सुरक्षेच्या नावाखाली सर्व गोष्टी पडद्याआड ठेवल्या जातात. अलिकडेच ऑपरेशन सिंदूरमध्ये आपली काही विमाने पाडली गेल्याचे आपल्या सैन्याधिकाऱ्यांनी सूचित केले होते. याबाबत राहुल यांनी संसदेत प्रश्न उपस्थित करताच त्यांना लीडर ऑफ पाकिस्तान ठरवले गेले. सरकारने या विमानांबाबत आजपर्यंत स्पष्ट असा खुलासा केलेला नाही. आपला कोणीही पायलट जखमी वा मृत झालेला नाही इतकेच सरकार सांगते. युध्दात विमान पडणे हे स्वाभाविक आहे. पण तेही ज्या सरकारला दडवून ठेवावेसे वाटते त्याच्या इतर प्रत्येक गोष्टीविषयी शंका निर्माण होणे साहजिक आहे. राहुल त्यांच्या भाषणांमधून याच शंका मांडत असतात. त्याला योग्य ते उत्तर देण्याऐवजी त्यांचा आवाज बंद करण्याचा प्रयत्न होतो व त्याला सर्वोच्च न्यायालयाचे अभावित पाठबळ मिळते हे खेदकारक आहे. समोर आलेल्या खटल्यांचा कायद्यानुसार निवाडा करणे हे न्यायालयांचे काम आहे. कोणी कसे वागावे याचे सल्ले देणे किंवा सच्चे भारतीय कोण याची चिकित्सा करणे हे त्यांनी करणे अभिप्रेत नाही. अलिकडेच मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने मुंबईत पॅलेस्टिनींना पाठिंबा देण्यासाठी धरणे आंदोलन करायला परवानगी मागितली. त्यावर उच्च न्यायालयाने हजारो मैलांवरच्या प्रश्नांवर तुम्ही कशाला आंदोलन करता असे म्हणून ही परवानगी नाकारली व डाव्या पक्षांनी देशातले प्रदूषण, ट्रॅफिक, बेकारी इत्यादींवर आंदोलने करावीत असा सल्ला दिला. न्यायालयाचा हा निर्णय व ताशेरे घटनेच्या स्वातंत्र्यविषयक कलमांचे उल्लंघन करणारे आहे. न्यायालयाची बेअदबी होण्याच्या भीतीने अशा प्रकारांबाबत जाहीरपणे बोलण्याचे नागरिक टाळतात. पण न्यायालयांनी काय बोलावे व काय बोलू नये हे त्यांनी स्वतःहून जाणीवपूर्वक ठरवण्याची वेळ आली आहे. आपल्या बोलण्याचा राजकीय फायदा घेतला जात असतो एवढे तरी त्यांनी लक्षात घ्यायला हवे.

**विचार**

# ट्रम्पनीतीला सामोरे जाताना...

***अवघ्या अर्थनगरीवर गेला काही काळ ट्रम्प यांच्या विक्षिप्तपणामुळे दाटलेले ढग पहायला मिळाले. अर्थविश्वात काही काळ उलटसुलट चर्चा सुरु राहिली. मात्र ट्रम्प यांच्या इशाऱ्यानंतरही भारतातून होणाऱ्या ॲपलच्या निर्यातीत वाढ पहायला मिळाली. अर्थात विदेशी संस्थात्मक गुंतवणूकदारांची भारताकडे पाठ दिसून आली. दरम्यान, भारतात सहकारी तत्त्वावर टॅक्सी सेवा सुरू होणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले.***



**महेश देशपांडे**

अवघ्या अर्थनगरीवर गेला काही काळ ट्रम्प यांच्या विक्षिप्तपणामुळे दाटलेले ढग पहायला मिळाले. या निमित्ताने गेला काही काळ अनेक क्षेत्रांमध्ये उलटसुलट चर्चा सुरु राहिली. मात्र ट्रम्प यांच्या इशाऱ्यानंतरही भारतातून होणाऱ्या ॲपलच्या निर्यातीत वाढ पहायला मिळाली. अर्थात विदेशी संस्थात्मक गुंतवणूकदारांची भारताकडे पाठ दिसून आली. दरम्यान, भारतात सहकारी तत्त्वावर टॅक्सी सेवा सुरू होणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले.

अलिकडेच अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर २५ टक्के आयात शुल्क लादण्याचा निर्णय जाहीर केला. त्याशिवाय रशियाकडून शस्त्र आणि तेल खरेदी करत असल्याने दंड लावण्याचा इशारा दिला. ट्रम्प यांनी या टॅरिफच्या अंमलबजावणीला एक आठवड्याची मुदतवाढ दिली. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या धमक्यांनंतरही 'ॲपल'ने भारतातून सहा अब्ज डॉलर्स किमतीचे आयफोन निर्यात करण्याचा विक्रम केला. आयफोन निर्माता 'ॲपल'ने विक्रेत्यांद्वारे एप्रिल-जून २०२५ च्या तिमाहीमध्ये भारतातून सहा अब्ज डॉलर्स किमतीचे आयफोन निर्यात केले आहेत. ते गेल्या वर्षीच्या याच कालावधीतील विक्रीच्या तुलनेत ८२ टक्के जास्त आहे. विक्रेत्यांनी सरकारला शेअर केलेल्या डेटाचा हवाला पाहिल्यास 'ॲपल'मुळे भारताची स्मार्टफोन निर्यात वाढली आहे. गेल्या वर्षीच्या पहिल्या तिमाहीमध्ये भारताने फक्त ३.२ अब्ज डॉलर्स किमतीचे स्मार्टफोन निर्यात केले, तर या वर्षाच्या पहिल्या तिमाहीमध्ये 'ॲपल'ने रेकॉर्डब्रेक आयफोन निर्यात केले. भारतातून निर्यात केलेल्या स्मार्टफोनची ही आतापर्यंतची सर्वाधिक संख्या आहे. २०२५-२६ च्या पहिल्या तिमाहीमध्ये 'ॲपल'मुळे भारताची एकूण स्मार्टफोन निर्यात ५८ टक्क्यांनी वाढून ७.७२ अब्ज डॉलर्स झाली. गेल्या वर्षीच्या याच तिमाहीमध्ये ४.९ अब्ज डॉलर्सची निर्यात होती. या काळात भारताच्या एकूण इलेक्ट्रॉनिक्स निर्यातीतही प्रचंड वाढ झाली. २०२५-२६ च्या पहिल्या तिमाहीमध्ये ती १२.४ अब्ज डॉलर्सवर पोहोचली. गेल्या वर्षीच्या याच काळातील पहिल्या तिमाहीतील ८.४ अब्ज डॉलर्सच्या निर्यातीच्या तुलनेमध्ये ती ४८ टक्के जास्त आहे.

या तिमाहीमध्ये एकूण इलेक्ट्रॉनिक्स निर्यातीत स्मार्टफोनचा वाटा ६२ टक्के होता. गेल्या वर्षी हा वाटा ५८ टक्के होता. 'ॲपल'ची ही कामगिरी भारताच्या इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रासाठी मोठे यश आहे; परंतु ते किती काळ टिकेल यावर प्रश्नचिन्ह आहेत. अमेरिकन सरकार सध्या व्यापार विस्तार कायद्याच्या कलम २३२ ची चौकशी करत आहे. हे कलम तिथल्या अध्यक्षांना राष्ट्रीय सुरक्षेच्या आधारावर आयात शुल्क लादण्याची परवानगी देते. अमेरिकेत व्यापार विस्तार कायदा, १९६२ च्या कलम २३२ अंतर्गत अध्यक्षांना राष्ट्रीय सुरक्षेला धोका निर्माण करणाऱ्या उत्पादनांची आयात थांबवण्याचा अधिकार देण्यात आला आहे. चौकशी पूर्ण झाल्यानंतर, भारतातून अमेरिकेत पाठवल्या जाणाऱ्या आयफोनवर आयात शुल्क लावले जाण्याची शक्यता आहे. सध्या या तपासणीमुळे भारतातील स्मार्टफोन, लॅपटॉप आणि सर्व्हरसारखी उत्पादने २५ टक्के शुल्काशिवाय अमेरिकेत निर्यात केली जातील. विदेशी गुंतवणूकदारांनी भारतीय शेअर बाजारात जुलै महिन्यात जोरदार विक्री केली. जुलै महिन्यात विदेशी संस्थात्मक गुंतवणूकदारांनी १७ हजार ७४१ कोटी रुपयांच्या शेअर्सची विक्री केली. 'एनएसडीएल'वरील डेटानुसार तीन महिन्यांनंतर पुन्हा एकदा विदेशी गुंतवणूकदारांनी विक्री सुरू केली आहे. एप्रिल, मे आणि जून महिन्यांमध्ये विदेशी गुंतवणूकदारांनी भारतीय शेअर बाजारात खरेदी सुरू ठेवली होती. आता जुलै महिन्यात विदेशी गुंतवणूकदारांनी १७ हजार ७४१ कोटी रुपयांच्या शेअर्सची विक्री केली आहे.

विदेशी गुंतवणूकदारांनी भारतीय शेअर बाजारातील आपली भागीदारी २०२५ च्या पहिल्या तीन महिन्यांमध्ये विकली होती. जुलै महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात विदेशी गुंतवणूकदारांनी जोरदार विक्री केली. २८ जुलै ते १ ऑगस्ट या कालावधीत 'एफपीआय'ने जोरदार विक्री केली. विदेशी संस्थात्मक गुंतवणूकदारांनी जुलै महिन्यात १७ हजार ७४१ कोटी रुपयांची विक्री केली. २०२५ या वर्षाचा विचार केला असता विदेशी गुंतवणूकदारांनी पहिल्या सात महिन्यांमध्ये एकूण एक लाख एक हजार ७९५ कोटी रुपयांची विक्री केली. जानेवारी ते मार्च या तीन महिन्यांमध्ये विदेशी गुंतवणूकदारांनी जोरदार विक्री केली होती. २०२५ मध्ये विदेशी गुंतवणूकदारांनी मे महिन्यात सर्वाधिक गुंतवणूक केली होती. मे महिन्यात 'एएफपीआय'ने १९ हजार ८६० कोटी रुपयांची गुंतवणूक केली होती. जानेवारी महिन्यात सर्वाधिक ७८ हजार २७ कोटी रुपयांच्या शेअर्सची विक्री केली. जून महिन्यात विदेशी गुंतवणूकदारांनी भारतीय शेअर बाजारात १४ हजार ५९० कोटी रुपयांची गुंतवणूक केली. मार्च महिन्यात तीन हजार ९७३ कोटी रुपयांची विक्री 'एफपीआय'ने केली होती. विदेशी संस्थात्मक गुंतवणूकदारांनी फेब्रुवारी महिन्यात ३४ हजार ५७४ कोटी रुपयांची विक्री केली होती.

आता एक लक्षवेधी बातमी. भारताचे सहकारी क्षेत्र या वर्षाच्या अखेरीस 'भारत ब्रँड'अंतर्गत टॅक्सी सेवा सुरू करून ओला आणि उबेरसारख्या महाकाय कंपन्यांना आव्हान देण्यास सज्ज आहे. या सेवेचे अधिकृत भांडवल ३०० कोटी रुपये असून चार राज्यांमधील २०० चालक आधीच त्यात जोडले गेले आहेत. 'मल्टी-स्टेट कोऑपरेटिव्ह टॅक्सी लिमिटेड' ही आठ प्रमुख सहकारी संस्थांची संघटना आहे. त्यात राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळ (एनसीडीसी), 'इंडियन फार्मर्स फर्टिलायझर कोऑपरेटिव्ह लिमिटेड' (इफको) आणि 'गुजरात कोऑपरेटिव्ह मिल्क मार्केटिंग फेडरेशन' (जीसीएमएमएफ) यांचा समावेश आहे. गेल्या महिन्यात सहकार मंत्री अमित शहा यांनी या क्षेत्रासाठी एक व्यापक सहकारी धोरण जाहीर करताना २०२५ च्या अखेरीस सहकारी टॅक्सी सेवा सुरू करण्याचे संकेत दिले. 'एनसीडीसी'चे उपव्यवस्थापकीय संचालक रोहित गुप्ता म्हणाले, की या सेवेचा मुख्य उद्देश चालकांना चांगले परतावे सुनिश्चित करणे आणि प्रवाशांना दर्जेदार, सुरक्षित आणि परवडणाऱ्या सेवा प्रदान करणे आहे. हा उपक्रम कोणत्याही सरकारी भागभांडवलशिवाय चालतो आणि सहभागी सहकारी संस्थांकडून पूर्णपणे निधी दिला जातो. तिच्या संस्थापक सदस्यांमध्ये कृषक भारती सहकारी लिमिटेड (कृभको), राष्ट्रीय कृषी आणि ग्रामीण विकास बँक (नाबार्ड), राष्ट्रीय दुग्ध विकास मंडळ (एनडीडीबी) आणि राष्ट्रीय सहकारी निर्यात लिमिटेड (एनसीईएल) यांचा समावेश आहे. सुमारे २०० चालक आधीच सहकारी संस्थेत सामील झाले आहेत. त्यापैकी प्रत्येकी पन्नासजण दिल्ली, गुजरात, उत्तर प्रदेश आणि महाराष्ट्रातील आहेत. सहकारी संस्था आपले नेटवर्क वाढवण्यासाठी इतर सहकारी संस्थांशी सक्रियपणे संपर्क साधत आहे. सहकारी संस्थेने 'राइड-हेलिंग ॲप' विकसित करण्यासाठी तंत्रज्ञान भागीदार निवडण्यासाठी निविदा जारी केल्या आहेत.

या सेवेचे ॲप डिसेंबरपर्यंत तयार होण्याची अपेक्षा आहे. संपूर्ण भारतातील प्लॅटफॉर्मसाठी मार्केटिंग धोरण तयार करण्यासाठी एक तंत्रज्ञान सल्लागार आणि 'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट' (आयआयएम) चे सहकार्य घेतले जात आहे. ही सेवा सहकारी किंमत मॉडेल स्वीकारेल. सध्या काम काज वाढवण्यासाठी सदस्यता मोहिमा सुरू आहेत. ही सेवा सहकारी किंमत मॉडेल स्वीकारेल. सध्या तिचे कामकाज वाढवण्यासाठी सदस्यता मोहिमा सुरू आहेत.

**चर्चा आजची**

# पौगंडावस्थेबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन गरजेचे

**सुयोग आंग्रे**

भारतासारख्या उष्ण कटिबंधात मुले-मुली पौगंडावस्था (वयात येण्याचे) वय हळूहळू कमी होत चालले आहे. वयाच्या दहाव्या वर्षी मुलीला मासिक पाळी सुरू झाल्याची उदाहरणे समोर येत आहेत. या वयात मुलीचे शरीर तयार होत असले तरी तिचे मन एका बालिकेचेच असते. तिला तिच्यात होणाऱ्या बदलांची योग्य ती जाणीव करून देणे आवश्यक आहे. आता शालेय वयापासून मुलं-मुली हे स्मार्टफोन, इंटरनेट वापरतात. विशेषतः इंटरनेटवर अक्षरशः लाखोंच्या संख्येने उपलब्ध असणारी पोर्नो ग्राफिक संकेतस्थळे आणि त्यातून दाखवली जाणारी लैंगिक विकृती, भारतात अगदी सहजासहजी उपलब्ध असणारे लैंगिक साहित्य आणि पोर्नोग्राफिक फिल्म्स यांच्या नकारात्मक परिणाम मुलांवर होऊ नये म्हणून त्यांना निकोप कामजीवनाची ओळख, स्वत:च्या शरीराची ओळख शाळेतच करून दिली पाहिजे. तसेच समाजात बलात्कार, लैंगिक आत्याचाराच्या घटना, अल्पवयीन मुलींना वैश्याव्यवसाय करायला लावणं, अशा अनेक घटना घडतात.

यामागे अनेक कारणं आहेत, पण एक महत्त्वाचं कारणं, ते म्हणजे 'लैंगिक शिक्षणा'चा अभाव ! मुलांना शाळेत पचनसंस्था, मज्जासंस्था वगैरेंसोबत मानवी प्रजननासाठी उपयुक्त ठरणारे अवयव, कार्य इत्यादींवरही एक धडा आहे. पण केवळ मुलांच्या वा केवळ मुलींच्या शाळेमध्ये ह्या धड्यातील काही भाग शिक्षक शिकवतात. परंतु, पचनसंस्था वा मज्जासंस्थेवरील धडा जेवढा खोलात जाऊन शिकवला जातो, तेवढाच प्रजनन संस्थेची माहिती देणारा धडा वरवर शिकवला जातो. मुले-मुली एकत्र असलेल्या शाळांत शिक्षक/शिक्षिकांना अत्यंत अवघडल्यासारखे वाटल्यामुळे अनेकदा हा धडा न शिकविण्याकडेच कल दिसून येतो. तसेच ह्या धड्यावर एकही प्रश्न परीक्षेत विचारला जात नाही. हा विषय वगळून इतर धड्यांवर भर देणे सहज शक्य होते. मात्र हा स्वतंत्र विषय म्हणून अभ्यासक्रमामध्ये घेतला तर तो वगळणे शक्य होणार नाही आणि खात्रीपूर्वक शिकवला जाईल. साधारण ६ वी पासून तरी मुलांना लैंगिक शिक्षण आवश्यक आहे.शरीरात अचानक होणारे बदल आणि शारीरिक आकर्षण या वयापासूनच वाढतं, त्यामुळे त्यांच्यात होणारे बदल त्यांना स्वीकारणं अवघड जाणार नाही, बऱ्याच वेळा याबाबतीत पुरेशी माहिती नसल्यामुळे मुलं-मुली केवळ शारीरिक आकर्षणाचे बळी ठरतात आणि त्यांच्यात लहान वयातच लैंगिक संबंध निर्माण होतात. असे शरीरसंबंध ठेवण्याचं योग्य वय कोणतं हे मुलांना लहान वयातच बिंबवलं तर आज निर्माण होणारे अनेक लैंगिक प्रश्न सुटतील. अनेक वेळा कुटुंबात मुलांशी आमचा लैंगिक विषयावर संवाद होत नाही. पालक म्हणून अनेकवेळा या विषयावर मुलांशी कशा प्रकारे संवाद साधायचा यावर आम्हालाही मर्यादा येतात. लैंगिक शिक्षण हे शाळेमध्ये दिले गेले तर आम्हालाही त्या शालेय अभ्यासाच्या निमित्ताने मुलांशी संवाद साधने सोप्पे होईल. त्यामुळे शाळेमध्ये एखादा तास न घेता स्वतंत्र्य पुस्तक आणि अभ्यासक्रम असावा. या अभ्यासामुळे येणारी पिढी ही लैंगिक साक्षर असेल, ही आत्ताच्या काळाची गरज आहे.

शाळेत त्या त्या विषयाच्या तज्ज्ञांकडून अचूकपणावर भर देत हे शिक्षण दिले जावे. जीवशास्त्र, आरोग्यशास्त्र, गृहशास्त्र वगैरे विषयांतील तज्ज्ञ माणसे, त्याचप्रमाणे डॉक्टर व परिचारिका यांचादेखील त्यात सहभाग असावा. लैंगिक शिक्षणाचा जो भाग वर्गातील पाठामध्ये अंतर्भूत करता येत नाही, त्यासाठी तज्ज्ञांची चर्चात्मक व्याख्याने आयोजित करावीत.

कोणत्याही गोष्टीचे दमन केले तर त्याविषयी उत्सुकता वाढते. तसेच मुलांमध्ये होते. त्यामुळे त्यांना योग्य वयात योग्य ज्ञान देणे गरजेचे आहे. लैंगिक शिक्षण शाळेबरोबरच घरातूनही मिळाला हवे. मासिक पाळीविषयी मुलींना सांगण्यापेक्षा मुलांनाही किशोर वयात होणारे बदल सांगितले पाहिजे. संवाद राहिला तर गैरसमज दूर होतात, असा अनुभव आहे. शोषण फक्त मुलींचेच होते असे नाही तर मुलांवरही अत्याचार होतात. त्यामुळे शिक्षण आणि संवाद आवश्यक आहे. आताचा विद्यार्थी अधिक शार्प आहे.

चुप्पी तोडा बोलायला शिका आणि नाही म्हणायला शिका हेदेखील सांगण्याची गरज आहे. म्हणून लैंगिक शिक्षण देणे गरजेचं आहे. किशोरवयीन मुलांमध्ये होणारे बदल असो वा लैंगिक शिक्षण, याविषयी आपल्याकडे मोकळेपणे बोलले जात नाही. बऱ्याच वेळा घरातही पालक लाज वाटते, असे विषय कसे बोलायचे म्हणून बोलत नाहीत. संवाद आणि विषयांबद्दल माहिती देताना खुलेपणा असेल तर गैरसमज दूर होतील. त्यामुळे जसे शैक्षणिक आणि करिअर विषयावर मार्गदर्शन करतात. तसेच जीवनोपयोगी विषयांवरही मार्गदर्शन हवेच.

**लोकसंसद**

# सण आयलाय गो...नारळी पुनवेचा!

नारळी पौर्णिमा हा श्रावणात येणारा दुसरा मोठा सण आहे. समुद्र किनारी राहणारेलोकहेबहुतांशीकोळीअसतात.त्यांचाआणिसमुद्राचाखूपचजवळचा असा संबंध आहे. त्यांचे पोट हे मासेमारीवर अवलंबून असते. त्यातूनच ते कमाई करतात. पण पावसाच्या काळात समुद्र हा उसळलेला असतो. याकाळात मासेमारी बंद असते. पण कालांतराने त्याचे रौद्र रुप हे कमी होऊ लागते. बंद केलेली मासेमारी पुन्हा सुरु करण्यासाठी आणि समुद्राला शांत करण्यासाठी त्याला नारळ अर्पण केला जातो. म्हणूनच या सणाला 'नारळी पौर्णिमा' असे म्हटले जाते. कोळी बांधवांचा महत्त्वाचा सण नारळी पौर्णिमा. ज्याची ते आतुरतेने वाट पाहत असतात. समुद्र आणि कोळी बांधव यांचे नाते अतूट आहे. समुद्रात मिळालेल्या माशांची विक्री करून आपला उदरनिर्वाह हे कोळीबांधव करत असतात. पावसाच्या तोंडावर मासेमारी बंद झाल्यानंतर त्यांचे लक्ष लागून राहते ते नारळी पौर्णिमा या सणाकडे. या दिवशी समुद्राला नारळ अर्पण करून मच्छीमार आपल्या व्यवसायाला सुरुवात करतात. नारळी पौर्णिमा सणादिवशी कोळीबांधवांचा आनंद ओसंडून वाहत असतो. नारळ अर्पण करण्याची पद्धत हिंदू धर्मात आहे. कोणतेही शुभकार्य असेल तर आपल्याकडे अगदी हमखास नारळ अर्पण करण्याची पद्धत आहे. हा नारळ समुद्राला म्हणजेच जलदेवतेला अर्पण केला जातो. याला मश्रीफळफ असे म्हणतात. यातील श्री म्हणजे लक्ष्मी आणि फळ म्हणजे नारळ. याला आपल्या धर्मात खूपच जास्त मान्यता दिली जाते. नारळ हा अनेक औषधी गुणांनी युक्त असतो. त्यापासून मिळणारे पाणी आणि खोबरे हे चवीला जितके चांगले असते त्याहून अधिक ते आरोग्यास चांगले असते. याशिवाय नारळी पौर्णिमा साजरा करण्याचा उद्देश म्हणजे श्रावणात आलेला बहर . या दिवसात सगळीकडे हिरवाई नटलेली असते.त्यामुळे निर्सगाचेही आभार मानणे फारच जास्त गरजेचे असते. आता नारळी पौर्णिमा हा सण परंपरागत साजरा केला जाणारा असा सण आहे. या दिवशी कोळी बांधव आपला पारंपरिक वेष घेतात. भरपूर दागिने घालतात. सजून धजून हा सण साजरा केला जातो. कोळीबांधव या दिवसासाठी आपल्या बोटी देखील रंगवून स्वच्छ करुन दर्यात जाण्यासाठी तयार करुन ठेवतात. इतकेच नाही तर संध्याकाळी समुद्राची पूजा करताना नारळाला सोनेरी रंगाचा कागद लावला जातो. सोन्याचा नारळ अर्पण करण्याची ही पद्धत आहे. पण आताच्या काळात सोन्याचा नारळ वाहणे हे अजिबात शक्य नाही.त्यामुळे त्याचे प्रतिकात्मक रुप म्हणून सोन्याचा कागद गुंडाळून नारळ वाहिला जातो. गोडाचा नैवेद्य दाखवला जातो आणि आनंद साजरा केला जातो.

**– एक वाचक**

**दिनविशेष**

# विनोद सम्राट शाहीर दादा कोंडके

आज ८ ऑगस्ट, आपल्या इरसाल आणि गावरान भाषेतील विनोदाने महाराष्ट्राला खळखळून हसवणारे विनोद सम्राट शाहीर दादा कोंडके यांची जयंती. जवळपास तीन दशकांहून अधिक काळ मराठी चित्रपट सृष्टीवर एकहाती अधिराज्य गाजवून मराठी सिनेमाला सुवर्णकाळ दाखवणाऱ्या विनोद सम्राट दादा कोंडके यांचा जन्म ८ ऑगस्ट १९३२ रोजी मुंबईतील नायगाव येथे झाला. त्यांचा जन्म झाला तो दिवस गोकुळ अष्टमीच्या होता, आपल्या पोटी बाळकृष्ण जन्माला आला म्हणून आई वडिलांनी त्यांचे नाव कृष्णा ठेवले. पण लहानपणापासूनच सर्व जन त्यांना दादा म्हणत पुढे त्यांचे नाव रूढ झाले. त्यांच्या मोठ्या बंधूचे निधन झाल्याने त्यांच्यावर घराची जबाबदारी पडली त्यामुळे दादा दरमहा साठ रुपये पगारावर सेवादलाच्या बँड पथकात काम करू लागले. लहानपणापासून दादांना कलेची आवड होती. सेवादलाच्या बँड पथकात त्यांच्या कला आणखी बहरून आल्या. फावल्या वेळात प्रसिद्ध गाण्यांचे विडंबन करणे, गाण्यांना चाली लावणे, विचित्र गाणी रचणे असे उद्योग दादा करू लागले. निळू फुले, राम नगरकर यासारखे जेष्ठ कलाकारही त्या काळात सेवादलात होते. तिथेच दादांची या महान कलाकारांशी मैत्री झाली आणि ही मैत्री पुढे आयुष्यभर टिकून राहिली. दादा सेवादलाच्या बँड पथकात काम करत असल्याने त्या काळात त्यांना बँड वाले दादा म्हणूनच लोक ओळखत असे. पुढे दादांनी स्वतःचा फड काढला. गावोगावी जाऊन दादा स्वतःची कला सादर करू लागले. वसंत सबनिसांच्या विच्छा माझी पुरी करा या वगनाट्याने त्यांच्या जीवनाला कलाटणी मिळाली. विच्छा माझी पुरी करा या वगनाट्याने दीडशे प्रयोग पूर्ण केले. त्या काळी हा विक्रम होता. या वगनाट्यामुळे दादा भलतेच लोकप्रिय झाले. गावागावांतील रसिक प्रेक्षक दादांना ओळखू लागले. याच वगनाट्यातील त्यांचे काम पाहून महान दिग्दर्शक भालजी पेंढारकर यांनी त्यांना थेट चित्रपटात काम करण्याची संधी दिली. भालजी पेंढारकर यांनी त्यांना त्यांच्या तांबडी माती या चित्रपटात मुख्य भूमिका दिली. दादांनी या भूमिकेचे सोने केले. हा चित्रपट तिकीटबारीवर हिट झाला. या चित्रपटातील गाणीही लोकप्रिय झाली. या चित्रपटानंतर दादांनी मागे वळून पाहिले नाही. मराठी चित्रपट सृष्टीत दादा कोंडके हे सर्वत्र नाव घुमू लागले. १९७१ साली दादा कोंडके यांनी दिग्दर्शित केलेला सोंगाड्या हा चित्रपट प्रदर्शित झाला मात्र मुंबईतील चित्रपटगृह चालकांनी आपल्या चित्रपटगृहात सोंगाड्या न लावता तीन देविया हा हिंदी चित्रपट लावला. आपल्या पहिल्याच चित्रपटाला चित्रपटगृह मिळत नसल्याचे पाहून दादा उद्विग्न झाले आणि त्यांनी थेट बाळासाहेब ठाकरेंची भेट घेतली मग काय बाळासाहेबांचा आदेश आणि शिवसैनिकांचा चित्रपटगृहात राडा. शिवसैनिकांनी चित्रपटगृहात घातलेल्या राड्याने आणि बाळासाहेबांच्या आदेशाने सोंगाड्या चित्रपटगृहात प्रदर्शित झाला. नुसताच प्रदर्शित झाला नाही तर सुपर डूपर हिट झाला. सोंगाड्या पाहायला प्रेक्षकांच्या रांगा लागल्या. सोंगाड्या हा त्या काळातील सर्वाधिक हिट मराठी चित्रपट ठरला. सोंगाड्यामुळे मरगळलेल्या मराठी चित्रपट सृष्टीला ऊर्जितावस्था मिळाली. १४ मार्च १९९८ रोजी हृदय विकाराच्या झटक्याने त्यांचे निधन झाले. दादांच्या निधनाने मराठी मनोरंजन विश्वावर दुःखाचा डोंगर कोसळला. प्रेक्षकांना खळखळून हसवणाऱ्या विनोदाच्या या सम्राटाने अशी अकाली एक्झीट घेतल्याने प्रेक्षकांना मोठा धक्का बसला. त्यांच्या निधनाने मराठी मनोरंजन विश्वाला सुवर्णकाळ दाखवणारा विनोदाचा सम्राट काळाच्या पडद्याआड गेला. मराठी चित्रपट सृष्टीत त्यांच्यासारखा विनोद सम्राट पूर्वी झाला नाही आणि पुढेही होणार नाही. विनोद सम्राट दादा कोंडके यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

**– श्याम ठाणेदार, पुणे**

# नाशिक जिल्हा रुग्णालयात घोटाळा

## • बनावट कंपनीच्या माध्यमातून सरकारची कोट्यवधींची फसवणूक

**। नाशिक । प्रतिनिधी ।**

**कोराना काळातील आपत्तींचा फायदा घेत नाशिकच्या जिल्हा रुग्णालयात मोठा घोटाळा झाल्याचे समोर आले आहे. नाशिक जिल्हा रुग्णालय आणि मालेगाव सामन्य रुग्णालयातील मॉड्युलर आयसीयू उभारणीचे काम एका बनावट परवानाधारक कंपनीला देऊन सरकारची ११ कोटी रुपयांची फसवणूक केल्याचे उघड झाले आहे. नाशिकच्या जिल्हा रुग्णालयातील कोवीड काळातील हा मोठा घोटाळा समोर आल्याने आरोग्य विभागात खळबळ उडाली आहे.**




कोविड काळात २०२१-२२ मध्ये ईसीआरपी-२ योजनेंतर्गत नाशिक जिल्हा रुग्णालयात ३० खाटांचे आणि मालेगाव सामान्य रुग्णालयात १० खाटांचे मॉड्युलर आयसीयू उभारण्याचा निर्णय घेण्यात आला होता. ठाणे येथील क्रेनोव्हेटिव्ह पॉवरटेक प्रा. लि. या कंपनीकडे हे काम सोपवण्यात आले. मात्र, ही कंपनी बनावट परवाना वापरत असल्याचे चौकशीत स्पष्ट झाले आहे.

आरोग्य अभियान संचालकांच्या कार्यालयाने निविदा प्रक्रियेत अनियमितता आणि अवाजवी खर्चाबाबत आक्षेप घेतला होता. राज्यस्तरावर मान्यता न घेता काम सुरू केल्यामुळे त्यावर स्थगिती आणत खुलासाही मागवण्यात आला होता. यानंतरही जिल्हा शल्यचिकित्सकांनी ६.७४ कोटींचा सुधारित प्रस्ताव सादर केला, तोही मूळ खर्च न बदलता, केवळ क्युबिकल पार्टिशन कमी करून करण्यात आला. या प्रक्रियेची तपासणी परिमंडळ व राज्यस्तरावर एकूण तीन वेळा करण्यात आली. ठाणे येथील अन्न व औषध प्रशासनाच्या सहआयुक्तांनी केलेल्या पडताळणीत कंपनीचा औषध परवाना आणि टाळेबंद प्रमाणपत्र हे दोन्ही बनावट असल्याचे निष्पन्न झाले.

धक्कादायक म्हणजे नाशिक जिल्हा रुग्णालयातील एका कर्मचाऱ्याची पत्नी आणि वडील या बनावट कंपनीचे समभागधारक असल्याचेही चौकशीत उघड झाले आहे.

तर संबंधित कंपनीने राज्यात अनेक शासकीय रुग्णालयांचे टेंडर मिळविल्याने या घोटाळ्याची व्याप्ती ५० कोटींवर पोहोचण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. फक्त मॉड्युलर आयसीयू प्रकल्पासाठी मंजूर ६.७४ कोटींपैकी निम्मी म्हणजेच ३.३७ कोटी रुपये रक्कम या संशयित बनावट कंपनीला अदा करण्यात आली. त्याशिवाय, इतर १० निविदा प्रक्रियांच्या माध्यमातून व्हेंटिलेटर, होल्टर मॉनिटर आणि वैद्यकीय उपकरणांच्या खरेदीसाठीही एकूण ७.६५ कोटी रुपयांची देयके रुग्णालयाने या कंपनीला अदा केली. परिणामी, सुमारे ११.०२ कोटी रुपयांचा शासकीय निधी परवानाधारक नसलेल्या या संशयित कंपनीच्या खात्यावर वर्ग झाल्याची माहिती पुढे आली आहे.

### फौजदारी गुन्हा दाखल करण्याचे निर्देश

याप्रकरणी संबंधित कंपनीला काळ्या यादीत टाकण्यासह कोराना काळातील तत्कालीन नाशिक जिल्हा शल्यचिकित्सक, मुख्य प्रशासकीय अधिकाऱ्यासह संबंधित अन्य अधिकारी, कर्मचाऱ्यांवर फौजदारी गुन्हा दाखल करण्याचे निर्देश नाशिक जिल्हा परिषदेच्या मावळत्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी जिल्हा शल्यचिकित्सकांना दिले आहेत.

## सेवानिवृत्त शिक्षिकेची राहत्या घरी हत्या

**। चिपळूण । प्रतिनिधी ।**

चिपळूण येथे सेवानिवृत्त शिक्षिकेची राहत्या घरीच हत्या झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. वर्षा जोशी (६३) असे या सेवानिवृत्त शिक्षिकेचे नाव आहे. चिपळूण शहरातील रावतळे परिसरातील घरात सेवानिवृत्त वृद्ध शिक्षिकेचा मृतदेह विवस्त्र अवस्थेत आढळून आला. महिलेच्या अंगावर अनेक जखमा असून पोलसांनी मृतदेह शवविच्छदेनासाठी सरकारी रुग्णालयात पाठविला आहे. विशेष म्हणजे घरातील सीसीटीव्ही कॅमेराची हार्ड डिस्कदेखील गायब करण्यात आली आहे. त्यामुळे, मारेकऱ्यांनी कट रचून पद्धतशीरपणे पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न केल्याचे उघड होत आहे. त्यामुळे आरोपींना पकडण्याचे आव्हान आता चिपळूण पोलिसांसमोर आहे.

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

८ ऑगस्ट

१) श्री.चंद्रकांत शांताराम घरत मु.नावेदार, अलिबाग, ०८-०८-१९४४

२)श्री.प्रभाकर तुकाराम घरत मु.लोणारे, अलिबाग ०८-०८-१९५०

३)श्रीम.मंगला मोतीराम सावंत अलिबाग, ०८-०८-१९५०

४)श्री.यशवंत परशुराम बंदरी अलिबाग-कोळीवाडा, ०८-०८-१९४९

५)पुष्पा भवरलाल जैन श्रीबाग, अलिबाग ०८-०८-१९५०

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

आजचे अन्नदाते

**दुर्वेश नितीन म्हात्रे स्मरणार्थ अलिबाग**



**कै सौ सुरेखा नीलकंठ मुळ्ये, ९ वा स्मृतीदिन, अलिबाग**

## ट्रक कलंडला

**रत्नागिरी :** रत्नागिरी तालुक्यातील हातखंबा येथे वाहनांच्या अपघाताचे सत्र सुरूच आहे. बुधवारी (दि. ६) सायंकाळीसाडेसहावाजण्याच्या सुमारास हातखंबा-गुरववाडी रस्त्यावर ट्रकवरील चालकाचा ताबा सुटून सोळाचाकी ट्रक रस्त्याच्या बाजूला जाऊन कलंडला. सुदैवाने या अपघातात कोणतीही जीवितहानी झाली नाही. अपघातग्रस्त ट्रक संबंधित स्वतःहून काढून नेणार असल्याची माहिती मिळत आहे. या घटनेनंतर पोलीस घटनास्थळी दाखल झाले होते. या अपघाताची नोंद ग्रामीण पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## विद्यार्थी मराठी पुस्तकांच्या प्रतीक्षेत

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**




जिल्हा परिषदेच्या समग्र शिक्षा अभियानांतर्गत शासकीय जिल्हा परिषद, अनुदानित शाळेतील विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तकांचे वितरण केले जाते. यावर्षी विषयनिहाय पुस्तके विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिली आहेत. उर्दू माध्यमाच्या पहिलीत शिकणाऱ्या एक हजार १० विद्यार्थ्यांना मजेत शिकू या मराठी विषयाची पुस्तके अद्याप उपलब्ध झालेली नाहीत.

नवीन शैक्षणिक वर्ष २०२५-२६ सुरू होऊन दोन महिने लोटले. पहिली घटक चाचणी काही शाळेत सुरू झाली आहे, तरीही विद्यार्थ्यांना पुस्तके उपलब्ध झालेली नाहीत. छपाईसाठी विलंब झाला असल्याचे कारण सांगण्यात येत आहे; परंतु येत्या दोन दिवसांत पुस्तके उपलब्ध होतील, असे शिक्षण विभागाकडून सांगण्यात आले. पुस्तके उपलब्ध नसल्याने शिक्षक गतवर्षीच्या पुस्तकाचा आधार घेत विद्यार्थ्यांना शिकवत आहेत. त्यामुळे नवे वर्ष; परंतु, पुस्तके जुनी असे म्हटले तरी चुकीचे ठरणार नाही. पहिलीच्या वर्गाची पुस्तके असल्यामुळे या विषयांकडे फारसे गांभीर्याने पहिले जात नाही. जिल्ह्यातील पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी एकूण ६ लाख दोन हजार ५१२ पुस्तकांची मागणी करण्यात आली होती. त्यापैकी सहा लाख एक हजार ५०२ पुस्तके प्राप्त झाली आहेत. त्यामुळे पहिलीच्या वर्गातील उर्दू माध्यमाच्या विद्यार्थ्यांसाठी मजेत शिकू या मराठी या विषयाची एक हजार १० पुस्तके छपाई कामाच्या विलंबामुळे उपलब्ध होण्यास दिरंगाई झाली आहे.

## पोलिसाची फसवणूक करणारे अटकेत

**मुंबई :** बँकेचे ॲप हॅक करून एका पोलीस हवालदाराची ऑनलाइन फसवणूक करण्यात आली होती. तक्रारदार हे बोरिवली पोलीस ठाण्यात कार्यरत आहेत. गेल्या महिन्यात त्यांना मोबाईलवर दोन मेसेज आले. खात्यातून ७६ हजार रुपये काढल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यानी बँकेचे ॲप्स उघडण्याचा प्रयत्न केला, मात्र ते ॲप्स उघडले नाही. तसेच त्यांचा मोबाईल देखील हॅक झाला होता. याबाबत त्यांनी बोरिवली पोलीस ठाण्यात तक्रार केली असता तांत्रिक माहितीवरून पोलिसांनी दोघांना अटक केली. अरुण राणा आणि भोला राणा अशी दोघा आरोपींची नावे आहेत.

## घोडबंदर रोडवर अवजड वाहनांना बंदी


**। ठाणे । प्रतिनिधी ।**

ठाणे ते घोडबंदर मार्गावरील गायमुख घाटात रस्त्याच्या दुरुस्तीचे काम सुरू करण्यात आले आहे. त्यामुळे ८ ते ११ ऑगस्ट या चार दिवसांच्या कालावधीत घोडबंदर मार्गावर मोठ्या वाहनांना बंदी केली आहे.

ठाणे ते घोडबंदर मार्गावर पावसामुळे मोठ्या प्रमाणात खड्डे पडले असून रस्त्याची दुर्दशा झाली आहे. यामुळे महामार्ग क्रमांक ८४ या रस्त्यावरील गायमुख घाटातील ठाणे ते घोडबंदर या मार्गाच्या दुरुस्तीचे काम सुरू करण्यात आले आहे. ८ ऑगस्ट रोजी पहाटे ३ वाजतापासून ते ११ ऑगस्ट रोजी पहाटे ५ वाजेदरम्यान दुरुस्तीचे काम होणार आहे. यादरम्यान वाहनांची कोंडी होऊ नये, यासाठी या मार्गावर मोठ्या वाहनांना प्रवेश बंद केला आहे.

मुंबई, ठाण्याकडून घोडबंदरकडे जाणाऱ्या अवजड वाहनांना माजिवडा येथील वाय जंक्शन, कापूरबावडी जंक्शन, मुंब्रा-कळवा येथून येणाऱ्या अवजड वाहनांना खारेगाव टोल नाका, नाशिक येथून येणाऱ्या वाहनांना माणकोली नाका येथे प्रवेश बंद करण्यात आला आहे. त्यामुळे सर्व मोठी वाहने अंजूरफाटामार्गे जात आहेत. तसेच, गुजरात, चिंचोटी नाका, मुंबई-वसई-विरार येथून येणाऱ्या अवजड वाहनांना फाऊंटन हॉटेल येथे प्रवेश बंद करण्यात आला आहे. या सर्व वाहनांनी चिंचोटी नाकामार्गे इच्छितस्थळी जाण्याचे आवाहन वाहतूक शाखेने केले आहे.

## सुवर्णकण



देवावर प्रेम करताना तुम्ही कोणतेही नाते देवा सोबत लावा पण जे नाते लावाल त्यात तुम्ही एकनिष्ठ राहून देवावर प्रेम करा.

**श्रीज्ञानेश्वरभावहृदय आबामहाराज परांजपे साधना आश्रम, दातार आळी, पेण.**

## ट्रकने सहा मुलांना चिरडले | चार जणांचा मृत्यू; दोघे गंभीर

**। गडचिरोली । प्रतिनिधी ।**

गडचिरोली - आरमोरी मार्गांवरील काटली गावाजवळ एका अज्ञात ट्रकने मॉर्निंग वॉकसाठी गेलेल्या सहा तरुणांना चिरडले. ही घटना गुरुवारी पहाटे घडली असून या अपघातात चार मुलांचा मृत्यू झाला. तर दोन जण गंभीर जखमी झाले असून त्यांना नागपुरला उपचारांसाठी रुग्णालयात हलवण्यात आले आहे. या घटनेमुळे काटली गावावर शोककळा पसरली असून, संतप्त गावकऱ्यांनी रास्ता रोको सुरू केला आहे.

टिंकू नामदेव भोयर (१४), तन्मय बालाजी मानकर (१६), दुषण दुर्योधन मेश्राम (१४), तुषार राजेंद्र मारभते (१४) सर्व राहणार काटली अशी मृतांची नावे आहेत.

गडचिरोली शहरापासून सात किलोमीटर अंतरावरील काटली गावातील सहा तरुण मुले नेहमीप्रमाणे सकाळी मॉर्निंग वॉक आणि व्यायाम करण्यासाठी गेले होते. काटलीच्या नाल्याजवळ हे तरुण रस्त्याच्या कडेला बसले असताना भरधाव वेगाने आलेल्या एका अज्ञात ट्रकने त्यांना जोरदार धडक दिली. या धडकेत दोन तरुणांचा जागीच मृत्यू झाला. इतर चार तरुणांना तातडीने गडचिरोली येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, उपचार सुरू असताना त्यापैकी आणखी दोन तरुणांचा मृत्यू झाला असून दोन जण गंभीर जखमी झाले आहेत. त्यांना नागपूर येथे उपचारांसाठी हलवण्यात आले आहे.

अपघाताचे वृत्त कळताच गावकऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. संतप्त गावकऱ्यांनी संताप व्यक्त करत मार्ग रोखण्याचा प्रयत्न केला. यामुळे वाहतूक कोंडी झाली होती. गडचिरोली पोलीस घटनास्थळी दाखल झाले आहेत.

दरम्यान, धडक दिल्यानंतर ट्रकचालक पसार झाला. पोलीस वाहन व चालकाचा शोध घेत आहेत.

## निवारा शेडवर प्लास्टिक टाकून तात्पुरती सोय

### ठेकेदाराचे दुर्लक्ष; ग्रामस्थांनीच केली दुरुस्ती

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

मिऱ्या- नागपूर महामार्गाचे काम सुरू झाल्यानंतर त्याचा फटका सलग दुसऱ्या वर्षी एसटी प्रवाशांना बसत आहे. ऐन उन्हाळ्यात प्रवाशांना उन्हात उभे राहून बसची प्रतीक्षा करावी लागली होती. आता पावसाळ्यात प्रवाशांची गैरसोय होऊ नये यासाठी निवाराशेडवर ग्रामस्थांनीच प्लास्टिकचे छप्पर घातले. ठेकेदाराने दुर्लक्ष केल्यामुळे ग्रामस्थांनी स्वतःहून दुरुस्ती केली आहे.



महामार्गावर दाभोळे ते साखरपादरम्यान एसटीच्या थांब्यावर निवाराशेडची कोणतीही व्यवस्था केलेली नाही. पावसातच उभे राहून प्रवाशांना एसटीची वाट पाहावी लागत आहे. या परिसरात काही ठिकाणी एसटी निवाराशेड उभारण्यासाठी लोखंडी सांगाडे उभारण्यात आले आहेत. ते सांगाडे उभारूनही आता पाच महिने झाले. पाली ते देवळे फाटादरम्यान निवाराशेडचे बांधकाम पूर्ण झाले असून, तिथे प्रवाशांची चांगली सोय होत आहे; पण दाभोळे ते साखरपादरम्यान असलेल्या शेड मात्र अर्धवट अवस्थेत आहेत. त्यांच्यावर ना छप्पर आहे, ना बाजूने आडोसा. त्यामुळे अशा शेडखाली प्रवाशांना छत्री उघडूनच एसटीची वाट पाहावी लागते. कोंडगाव येथे उभारण्यात आलेल्या एका सांगाड्यावर अखेर ग्रामस्थांनीच प्लास्टिकचा कागद टाकून तात्पुरता आडोसा तयार केला आहे.

## लेझर लाईटच्या वापरावर प्रतिबंध

**। कोल्हापूर । प्रतिनिधी ।**

जिल्ह्यात २७ ऑगस्ट ते ६ सप्टेंबर या कालावधीत गणेश उत्सव मोठ्या उत्साहाने साजरा केला जाणार आहे. या कालावधीत गणेशमूर्ती आगमन, घरगुती गणेशमूर्ती विसर्जन मिरवणूक तसेच इतर कार्यक्रमादरम्यान लेझर लाईट डोळ्यावर पडल्याने डोळ्याचा पडदा तसेच बुबळाला इजा होण्याची शक्यता नाकारता येत नाही. यासाठी जिल्ह्यात सार्वजनिक गणेश उत्सव मंडळांकडून आयोजित मिरवणुकीमध्ये लेझर लाईटचा शो किंवा वापर करण्यास जिल्हादंडाधिकारी अमोल येडगे यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३/१अन्वये २७ ऑगस्ट ते ६ सप्टेंबर या कालावधीत लेझर लाईट वापरास प्रतिबंध केला आहे. या आदेशाचे उल्लंघन करणारा व्यक्ती फौजदारी कारवाईस पात्र राहतील, असेही या अधिसूचनेत नमूद करण्यात आले आहे.

## कापरे देऊळवाडा शाळेत वृक्षारोपण

**। चिपळूण । प्रतिनिधी ।**

'एक पेड़ माँ के नाम' या प्रेरणादायी उपक्रमाअंतर्गत कापरे देऊळवाडा येथील जिल्हा परिषद शाळेत वृक्षारोपण कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. या उपक्रमाचा मुख्य उद्देश म्हणजे आईप्रती कृतज्ञता व्यक्त करताना निसर्गाचेही रक्षण करणे. या कार्यक्रमात प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्या आईच्या नावाने एक झाड लावले. विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण प्रेम व आईप्रती आदर जागविणारा हा कार्यक्रम खूपच भावनिक आणि प्रेरणादायी ठरला.

या उपक्रमाअंतर्गत शाळेच्या परिसरात लिंब, गुलमोहोर, अशोक, सीताफळ, वड, पिंपळ अशा विविध जातींच्या रोपांची लागवड करण्यात आली. या उपक्रमाचे विशेष मार्गदर्शन मुख्याध्यापिका मा. मानसी महाडीक मॅडम यांनी केले. त्यांनी विद्यार्थ्यांना झाडांची महत्त्व, आईचं स्थान आणि आपली जबाबदारी याविषयी मार्मिक मार्गदर्शन केले. तर पदवीधर शिक्षक संतोष तांबे यांनी झाडांची निगा कशी राखावी, त्यांची वाढ कशी होईल याविषयी माहिती दिली. अशाप्रकारे हा उपक्रम पर्यावरण रक्षणासोबतच संस्कारक्षम पिढी घडविण्याकडे एक मोलाची पाऊलवाट ठरला.

## विद्युतवाहिनीवर झाडाच्या फांद्या

**संगमेश्वर :** संगमेश्वर तालुक्यातील कोंडगाव येथील दत्तदर्शन पथ ते भडकंबा रोडवर आणि बाजारपेठ परिसरात महावितरणच्या वाहिन्यांना झाडांच्या फांद्यांचा स्पर्श होत असल्याने वीजपुरवठा खंडित होतो. याकडे महावितरणचे दुर्लक्ष होत असून दुर्घटना घडण्याची शक्यता आहे. या परिसरातील काही विद्युतवाहिनी झाडाझुडपांच्या अगदी जवळ आलेल्या आहे. काही ठिकाणी विद्युतखांबावरही वेलींचे साम्राज्य पसरलेले आहे. अनेक ठिकाणी रोड ओलांडण्याच्या ठिकाणी गार्डिंग केलेले नाही. याकडे महावितरण विभागाने दुर्लक्ष करू नये, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

## पुणे विमानतळावर कोट्यवधींचा गांजा जप्त

**। पुणे । प्रतिनिधी ।**

बँकॉकहून विमानाने पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळावर उतरलेल्या प्रवाशाकडून सहा कोटी रुपयांचा सहा किलो १४४ ग्रॅम गांजा पुणे सीमाशुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांनी जप्त केला आहे. याप्रकरणी पिंपरी-चिंचवड येथे राहणाऱ्या या प्रवाशाला अटक करण्यात आली असून, त्याला न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली. अतुल सुशील हिवाळे (४३) असे अटक करण्यात आलेल्या प्रवाशाचे नाव आहे.




नामांकित खासगी कंपनीच्या बँकॉक-पुणे विमानाने हा प्रवासी मंगळवारी पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळावर दाखल झाला. त्याच्या संशयास्पद वर्णनावरून सीमाशुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांनी त्याची कसून झडती घेतली. त्यावेळी त्याच्या बॅगेत बारा सीलबंद पाकिटात हिरव्या रंगाचा तीव्र गंधयुक्त सुकलेला पदार्थ सापडला. प्राथमिक चाचणीत तो 'हायड्रोपोनिक वीड' म्हणजे उच्च प्रतीचा गांजा असल्याचे स्पष्ट झाले. आरोपीविरोधात अमली पदार्थ प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीला न्यायालयात हजर करण्यात आले असता त्याला न्यायालयीन कोठडी सुनावली.

### प्रवाशाला अटक

दरम्यान, बँकॉकहून पुण्यात विमानाने आलेल्या प्रवाशाकडून गांजा पकडण्यात आल्याची ही गेल्या पंधरवड्यातील दुसरी घटना आहे. गेल्या महिन्यात एका प्रवाशाकडे १०.४७ किलो वजनाचा 'हायड्रोपोनिक वीड' हा उच्च प्रतीचा गांजा सापडला. काळ्या बाजारात या गांजाची किंमत अंदाजे साडेदहा कोटी रुपये आहे. त्यामुळे विमान प्रवाशांच्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय टोळी अमली पदार्थांची तस्करी करत आहे का, यामागचा सूत्रधार कोण आहे, याबाबत तपास सुरू आहे.

## हातभट्टीची दारू जप्त

**रत्नागिरी :** रत्नागिरी शहरातील धनजी नाका बेलबाग परिसरात एका घरातून पोलिसांनी १९ लीटर गावठी हातभट्टीची दारू जप्त केली आहे. ही कारवाई बुधवारी (दि. ०६) दुपारच्या सुमारास करण्यात आली. स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेत कार्यरत असलेले पोलीस हवालदार बाळ रमेश पालकर (४५) यांना मिळालेल्या माहितीनुसार, त्यांनी धनजी नाका बेलबाग येथील एका घराच्या पाठीमागील बाजूस छापा टाकला. या कारवाईत सचिन सुरेश गुरव (वय ५०, रा. झारणी रोड, रत्नागिरी) याच्याकडे बेकायदेशीर आणि विनापरवाना बाळगलेली हातभट्टीची दारू आढळून आली. पोलिसांनी एकूण २,१०० रुपये किमतीची १९ लीटर गावठी हातभट्टीची दारू जप्त केली आहे. याप्रकरणी स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेच्या तक्रारीवरून एका व्यक्तीवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### कुडूक येथे उभारला द्रोण पत्रावळीचा कारखाना | उमेदच्या माध्यमातून रोजगाराला नवी दिशा

# महिलांची व्यवसाय क्षेत्रात भरारी

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

**मंडणगड तालुक्यातील अतिदुर्गम भागातील कुडूक खुर्द हुनमानवाडी येथील जननी स्वयंसहाय्यता आणि रुक्मिणी स्वयंसहाय्यता समूहातील महिलांनी उमेद अभियानाच्या माध्यमातून व्यवसाय क्षेत्रात भरारी घेतली आहे. या अंतर्गत पत्रावळी कारखान्याचे उद्घाटन तालुका व्यवस्थापक आर्थिक समावेशन अमित सरमळकर यांच्या शुभहस्ते कुडूक खुर्द हुनमानवाडी येथे नुकतेच पार पडले. व्यवसाय उभा करून समाजापुढे आदर्श ठेवत महिलांनी कर्तृत्व सिद्ध केले आहे.**



याप्रसंगी प्रभाग संघ व्यवस्थापक शुभ्रा कदम, कुडुक खुर्द हनुमानवाडी येथील जननी स्वयंसहाय्यता आणि रुक्मिणी स्वयंसहाय्यता समूहातील महिला पदाधिकारी सदस्य, पंचक्रोशीतील स्थानिक ग्रामस्थ मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

तालुका व्यवस्थापक आर्थिक समावेशन अमित सरमळकर यांनी मार्गदर्शन करतांना सांगितले की, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या उमेद तालुका अभियान व्यवस्थापन कक्ष पंचायत समिती मंडणगड अंतर्गत महिलांसाठी त्यांच्या आर्थिक उन्नतीचे व अन्य क्षेत्रातील प्रगतीचे माध्यम झाले आहे. शासनाकडून मिळालेल्या समुदाय गुंतवणूक निधी व बँकेकडून मिळालेले अर्थसहाय्य यांच्या जोडीने पत्रावळी मशीन खरेदी करून, शाश्वत उपजीविकेचा या महिलांनी पुरेपूर अवलंब केला आहे. महिलांना आर्थिक हातभार लागावा यासाठी नेहमी उमेद अभियानाकडून पाठपुरावा केला जात आहे. त्याचबरोबर राष्ट्रीयकृत बँकाचा देखील मोठ्या प्रमाणात वाटा असल्याचे सरमळकरानीं सांगितले.

कुडूक खुर्द हुनमानवाडी येथील जननी स्वयंसहाय्यता आणि रुक्मिणी स्वयंसहाय्यता समूहाच्या महिलांनी आपल्या खेडेगावातून पत्रावळी, द्रोण बनवण्याचा कारखाना सुरू करण्यात आला. या दोन्ही समूहांची स्थापना २०१७ साली झाली, यामध्ये वीस महिला सदस्यांची संख्या असून, या व्यवसायात वय वर्षे ४५ पेक्षा अधिक वयोगटातील स्थानिक महिलांचा समावेश आहे.

या ठिकाणी एकाच दिवशी प्रशिक्षण घेत, येथील महिलांनी कारखान्यामध्ये एका तासात एक हजार पत्रावळ्या बनविल्या असून यामध्ये पत्रावळ्या, द्रोण, नाष्टा डिश अशा प्रकारे बनविल्या जात आहेत. एका संचमध्ये २५ डिशचा समावेश असून कमी दरात विक्री करणार असून चांगल्या पद्धतीचे साम्रगी वापरण्यात येत असल्याची माहिती त्यांनी दिली. स्वयंचलित मशीन असल्यामुळे जास्त मेहनत घ्यावी लागत नाही. विविध समारंभात, कागदी पत्रावळ्यांचा वापर जास्त प्रमाणात आढळतो. त्यामुळे याचा फायदा आम्हाला प्रामुख्याने मिळेल असेही लाभार्थी महिलांनी सांगितले.

महाराष्ट्रातील सर्व ग्रामीण महिलांच्या आयुष्यात सुख, समाधान आणि नवचैतन्य असण्यामागचे मुख्य कारण उमेद अभियान बनले आहे.

> ग्रामीण भागात दिवसेंदिवस ओसाड होत चाललेल्या शेतीसह रोजंदारीचा प्रश्न उद्भवत असल्यामुळे येथील अनेक महिला शहराकडे धाव घेतात. म्हणून ग्रामीण भागातील महिला ना गावातच राहून रोजगार देताना त्यांच्याकडून वस्तू बनवून घेत असल्याने वेळ व पैशांची बचत होते. गाव टिकवण्यासाठी आणि तेथील लोकांचे जीवनमान सुधारण्यासाठी लघु उद्योगाची निर्मिती नुकतीच झाली असून व्यवसाय आणि रोजगाराच्या संधींमुळे लोकांना शहरांमध्ये स्थलांतर करण्याची गरज भासणार नाही.
>
> – स्वप्नाली पवार, समुदाय संसाधन व्यक्ती

## निवडक



### वाहतुकीच्या नियमांचे मार्गदर्शन

**म्हसळा** : न्यू इंग्लिश स्कूल अ‍ॅण्ड ज्युनियर कॉलेज म्हसळा येथे वाहतूक शाखा माणगाव पोलीस स्टेशन व म्हसळा पोलीस स्टेशनच्या वतीने वाहतूक शाखेच्या सहाय्यक पोलीस निरीक्षक मिरा लाड यांनी विद्यार्थ्यांनी वाहतुकीचे नियमांचे मार्गदर्शन केले. तसेच विद्यार्थ्यांना गुड टच बॅड टच विषयी मार्गदर्शन करताना त्यांनी रोजच्या व्यवहारांत घडणारे काही प्रसंग सांगितले. तसेच सध्या वाढत असणाऱ्या सायबर क्राईम बाबत त्यांनी विद्यार्थ्यांना जागृत केले. म्हसळा पोलीस स्टेशनचे वाहतूक पोलीस चांदोरकर यांनी विद्यार्थ्यांनी गाडी वापरा बाबत आपले वय १८ वर्षे पूर्ण झाल्याशिवाय वापरू नये तसेच वापरल्यास होणाऱ्या दुष्परिणामांची माहिती दिली. याप्रसंगी सहाय्यक पोलीस निरीक्षक लाडण, प्राचार्य डी. आर. पाटील, इ. सी. पाटील, एच बी मोरे उपस्थित होते. यावेळी विद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षिका तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### खारगाव खुर्द गावात श्रमदानातून स्वच्छता

**म्हसळा** : खारगाव खुर्द येथील ग्रामस्थानी आगामी काळातील सण उत्सवानिमित्त सर्वांचे आरोग्य चांगले राहावे यासाठी ‘स्वच्छ गाव’ हा उपक्रम हाती घेतला. यावेळी स्वच्छता मोहिमेत गाव अंतर्गत जोड रस्ते, स्मशानभूमी परिसर, देऊळ व शेती रस्ते, शाळा परिसर आदी ठिकाणी वाढलेली झाडे-झुडपे, गवत व अन्य कचरा गोळा करून त्याची योग्य ठिकाणी विल्हेवाट लावण्यात आली. स्वच्छता मोहिमेत महादेव पाटील, बाळकृष्ण म्हात्रे, रामभाऊ लोणशीकर, लक्ष्मण पाटील, मिलिंद खोत, विश्वास खोत, कृष्णा म्हात्रे, नरेश मेंदाडकर, चंद्रकांत कांबळे, मनोहर पाटील, शेखर खोत, मंगेश म्हात्रे, विजय लोणशीकर, महादेव म्हात्रे, काशिनाथ पाटील, नथुराम खोत, रामचंद्र लोणशीकर आणि आजी माजी महिला व पुरुष पदाधिकारी, कार्यकर्ते यांनी सहभाग घेतला होता.

### दिनानाथ पाटील यांचे निधन

**वाघ्रण** : वाघ्रण गावचे ज्येष्ठ नागरीक दिनानाथ शंकर पाटील यांचे वृद्धपकाळाने सोमवार (दि. ४) ऑगस्ट रोजी वयाच्या ८१ व्या वर्षी



निधन झाले. त्यावर मंगळवार (दि. ५) ऑगस्ट रोजी अंत्यसंस्कार करण्यात आले. दिनानाथ पाटील हे शेकापचे जुने निष्ठावंत कार्यकर्ते होते. त्यांचे दिवंगत अ‍ॅड. दत्ता पाटील-दादा आणि प्रभाकर पाटील- भाऊंशी संबंध होते. यांचे दिवसकार्य गुरुवार (दि. १४) ऑगस्ट रोजी होणार आहेत. त्यांच्या पश्चात पत्नी व दोन मुलगे सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे.

# नशामुक्तीसाठी पोलिसांचा पुढाकार

## कारवाईबरोबरच जनजागृती करण्याचा प्रयत्न

। प्रमोद जाधव ।
। अलिबाग ।

अंमली पदार्थाच्या आहारी जाऊन तरुणाई बिघडण्याचा धोका वाढला आहे. हे संकट मुक्त करण्यासाठी रायगड पोलिसांनी पुढाकार घेतला आहे. कारवाई करण्याबरोबरच जनजागृती जिल्ह्यात केली जाणार आहे. अंमली पदार्थ तस्करी, विक्री, व्यापार व उत्पादनावर आळा बसविण्यासाठी हा प्रयत्न केला जाणार आहे. त्यासाठी जिल्ह्यात वेगवेगळे उपक्रम राबविण्यात येणार आहेत.



रायगड जिल्हा पर्यटनाबरोबच औद्योगिकीकरणाच्या दृष्टीने महत्वाचा ठरत आहे. वेगवेगळ्या भागातून जिल्ह्यातून व राज्य, देशभरातून पर्यटक रायगड जिल्हयात येत आहेत. जिल्ह्यात फिरण्यासाठी येत असताना काही पर्यटक गांजा, चरस सारख्या अंमली पदार्थांचा वापर करीत असल्याचे चित्र आहे. काही बंद कारखाने व दुकान व अन्य ठिकाणी चरस, गांजाची विक्री वाहतूक केली जाते. अंमली पदार्थाच्या आहारी जाऊन तरुणाई बघडण्याची भिती निर्माण झाली आहे.

रायगड पोलिसांनी आतापर्यंत रोहा, खालापूर, मुरूड अशा अनेक ठिकाणी कारवाई करून अंमली पदार्थ विक्री, वाहतूक करणाऱ्यांना दणका दिला आहे. तरीदेखील काही महाभाग गांजाची विक्री करीत आहेत. नशा येणाऱ्या या अंमली पदार्थापासून तरुण पिढी दुर राहवी, यासाठी रायगड पोलिसांनी पावले उचलली आहेत. नशामुक्त रायगडसाठी कारवाई आणि जनजागृतीची मोहिम पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु केली जाणार आहे. रायगड पोलीस आणि जिल्हा सामान्य रुग्णालयातील जिल्हा मानसिक आरोग्य कार्यक्रमाच्या माध्यमातून वेगवेगळे उपक्रम घेण्यात येणार आहेत. यामध्ये मनोरुग्ण तज्ञ डॉ. अर्चना सिंग यांची मदत घेतली जाणार आहे. अंमली पदार्थांपासून तरुणाईला दुर ठेवण्यासाठी पोलिसांकडून कारवाईचे पाऊल उचलले जाणार आहे. अंमली पदार्थांची अनाधिकृतपणे तस्करी, साठा, विक्री करणाऱ्यांवर कारवाई करण्यात येणार आहे. त्यासाठी १९३३ हा मानस हेल्पलाईन क्रमांक कार्यान्वीत केला आहे.

**घोषवाक्याद्वारे आवाहन**

रायगड जिल्हयामध्ये रक्षाबंधन हा सण मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. भाऊ आणि बहिणीच्या प्रेमाचे प्रतिक म्हणून हा सण ओळखला जातो. रक्षाबंधन सणाच्या निमित्ताने बहिणीने भावाला नशा सोडून दिर्घ आयुष्य लाभावे यासाठी बहिण मागते ओवाळणी, नको करू नशेने शरीराची हानी या स्लोगनद्वारे तरुण पिढीला विशेष करून भावांना आवाहन करण्यात येत आहे.

**मानसिक स्वास्थ समस्यांबाबत हेल्पलाईन**

नशा येणाऱ्या अंमली पदार्थाच्या आहारी गेल्याने तरुण पिढी मानसिक दृष्ट्या खचून जाण्याचा धोका कायमच राहिला आहे. अंमली पदार्थाच्या आहारी गेल्याने काही तरुण आत्महत्या करतात. मानसिक स्वास्थ बिघडण्याची भिती असते. अंमली पदार्थाच्या आहारी गेलेल्या तरुण पिढीचे मानसिक स्वास्थ समस्या सोडविण्यासाठी १४४१६ हा हेल्पलाईन नंबर कार्यान्वीत केला आहे.

> “केंद्र व राज्य शासनाने भारत देश नशा मुक्त करण्याचे धोरण अवलंबले आहे. अंमली पदार्थ तस्करी, व्यापार, उत्पादनावर आळा बसावा, यासाठी कोकण परिक्षेत्र विशेष पोलीस महानिरीक्षकांनी जिल्हा स्तरावर अंमली पदार्थ विरोधी मोहिम राबविण्याबाबत आदेश दिले आहेत. त्यानुसार जिल्हयात वेगवेगळे उपक्रम राबवून नशामुक्त जिल्हा करण्याचा प्रयत्न राहणार आहे. रायगड पोलीसांसह जिल्हा रुग्णालय यांच्या संयुक्त विद्यमाने जनजागृती केली जाणार आहे. शाळा, महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसोबत संवाद साधला जाणार आहे. तसेच अंमली पदार्थांची विक्री, वाहतूक करणाऱ्यांविरोधात कारवाई केली जाणार आहे. त्यासाठी हेल्पलाईन क्रमांक देण्यात आला आहे.
> –आंचल दलाल
> पोलीस अधीक्षक, रायगड”

### चलचित्राद्वारे होणार जनजागृती

येत्या २७ ऑगस्टला गणरायाच आगमन घरोघरी होणार आहे. जिल्ह्यात सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या वतीने हा उत्सव मोठया प्रमाणात साजरा केला जातो. दहा दिवसाच्या कालावधीत बेटी पढाव, प्लास्टीक मुक्ती असे समाजप्रबोधानाचे काम चिलचित्रामार्फत केले जातात. त्यामुळे यावर्षी गणेशोत्सवात गणेशोत्सव मंडळामार्फत अंमली पदार्थ विरोधी जनजागृती, व्यसनमुक्तीचे देखावे तयार करून जनजागृती करावी असे आवाहन पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांनी केले आहेत. त्यामुळे गणेशोत्सवात चलचित्राद्वारे जनजागृती केली जाणार आहे. रायगड जिल्ह्यामध्ये तीन हजारहून अधिक शाळा महाविद्यालये आहेत. या शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती करण्यासाठी रायगड पोलिसांकडून प्रयत्न केले जाणार आहेत. जिल्हा रुग्णालयातील टीम, पोलीस दलातील निर्भया पथक, पोलीस ठाण्यातील पोलीस काका, दीदींच्या मदतीने शाळा व महाविद्यालयांमध्ये वेगवेगळे उपक्रम राबविले जाणार आहे. अंमली पदार्थाचे दुष्पपरिणाची माहिती विद्यार्थ्यांना मार्गदर्शनातून दिली जाणार आहे.

## पोयनाड पोलिसांचे बाजारपेठेत संचलन

। भाकरवड । प्रतिनिधी ।

गोकुळाष्टमी व गणेश उत्सव सण काही दिवसांवर आल्याने पोयनाड पोलीस ठाण्याचे वतीने बुधवार (दि. ६) ऑगस्ट रोजी पोयनाड पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस अधिकारी विजयकुमार देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस संचलन करण्यात आले. दरम्यान हे संचलन पोयनाड बाजारपेठेत व नाका येथे राबविण्यात आले. कायदा आणि सुव्यवस्थेच्या पार्श्वभूमीवर पोलीस प्रशासन अधिकाधिक सतर्क झाले आहेत. गोपाळकाला व गणेश उत्सव साजरा करत असताना कोणत्याही प्रकारचा गालबोट लागणार नाही याची सर्व नागरिकांनी काळजी घेतली पाहिजे याबाबत कुठेही अनुचित प्रकार घडला तर लगेचच पोलीस ठाण्याची संपर्क करण्याचे आवाहन पोयनाड पोलीस ठाण्याचे नंदकुमार देशमुख यांनी केले. या संचलनामध्ये पोलीस अधिकारी, पोलीस अंमलदार, राईट पोलीस कंट्रोल वडखळ यांचा समावेश होता.



## चौक येथे आरोग्य तपासणी

**रसायनी:** सार्वजनिक आरोग्य विभाग, जिल्हा सामान्य रुणालय रायगड अलिबाग व मुख्यमंत्री सहाय्यता निधी धर्मदाय रुणालय मदत कक्ष जिल्हाधिकारी कार्यालय रायगड अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने दिव्यांग तपासणी व प्रमाणपत्र वाटप तसेच आरोग्य तपासणी शिबीर चौक येथील ग्रामीण रुणालयात आयोजन करण्यात आले. शिबिरात अस्थिव्यंग, नेत्र विकार व मानसिक आजाराची ऑनलाईन नोंदणी करण्यात आली.

## सिद्धेश्वर बु. शाळेचा शतकोत्तर सोहळा

। पाली/गोमाशी । प्रतिनिधी ।

सुधागड तालुक्यातील राजिप शाळा सिद्धेश्वर बुद्रुक शाळेला ६ ऑगस्ट रोजी १५० वर्ष पूर्ण झाल्याने शतकोत्तर सुवर्ण महोत्सव सोहळा करण्यात आला होता. हा सोहळा माजी विद्यार्थी विष्णू मंचेकर यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आला. यावेळी गटविकास अधिकारी लता मोहिते, गट शिक्षणाधिकारी सादुराम बांगारे, चंद्रशेखर दुर्वे, परमानंद राईलकर, दत्ताराम पोंगडे उपस्थित होते. यावेळी सुधागड तहसीलदार उत्तम कुंभार यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. शतकोत्तर सोहळ्यासाठी आजी-माजी विद्यार्थ्यांनी मुंबई, ठाणे, पुणे, काळाचौकी, अंबरनाथ, पनवेल, बांद्रा, सिद्धेश्वर,अडुळसे, खांडसई, पुई, येथील विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी सर्वांनी शाळेतील आठवणींना उजाळा दिला. यावेळी अनेकांनी शाळेसाठी देणगी दिली. वर्धापन दिन सोहळा साजरा करण्यासाठी आजी माजी विद्यार्थी, ग्रामस्थ मंडळ, शालेय शिक्षण कमिटी, शालेय वर्धापन दिन कमिटी, शिक्षकांनी मेहनत घेतली.

## शैक्षणिक साहित्य वाटप

। खोपोली । प्रतिनिधी ।

कै. अनंत श्रीधर ओक वनौषधी संशोधन व संवर्धन प्रतिष्ठान कर्जत यांच्या वतीने कर्जत आणि खालापूर तालुक्यातील ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. कर्जत आणि खालापूर तालुक्यातील ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळा वावर्ले ठाकुरवाडी, शाळा बुरुंजवाडी, निंबारवाडी शाळा टेपाचीवाडी शाळा, गावंडवाडी, शाळा बांगरवाडी येथील सहा शाळेतील एकूण १९५ विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले.

याकामी अशोक शेडगे, विष्णू गावंडा, दत्ता हिंडोला, आदींनी विशेष मेहनत घेतली.

## पोलादपूर जागतिक आदिवासी दिनासाठी सज्ज

### ९ ऑगस्टला शहरात रॅलीसह विविध कार्यक्रम

। पोलादपूर । प्रतिनिधी ।

तालुक्यातील आदिवासी कातकरी विकास मंडळातर्फे दरवर्षीप्रमाणे शनिवार (दि.९) ऑगस्ट रोजी जागतिक आदिवासी दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. याप्रसंगी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळयाला पुष्पहार अर्पण करून आदिवासी बांधव पारंपरिक वाद्यांच्या गजरात बाजारपेठेतून भव्य रॅली काढून कॅप्टन विक्रमराव मोरे सभागृहात होणार आहेत, अशी माहिती मंडळाचे अध्यक्ष पांडूरंग वाघे, संजय वाघमारे, शंकर पवार आणि विनायक वाघे यांनी दिली आहे.

याप्रसंगी पोलादपूर तहसिलदार कपिल घोरपडे, गटविकास अधिकारी दिप्ती गाट, तालुका कृषी अधिकारी वैशाली फडतरे, विठ्ठल कोळेकर, आनंद रावडे तसेच अन्य सेवाभावी व्यक्तींचे मार्गदर्शन होणार असून एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प पेण आणि पशुवैद्यकीय अधिकारी पोलादपूर उपस्थित राहणार आहेत असे आयोजकांनी सांगितले आहे.



## सुधागडात कृषी अधिकाऱ्यांचा पाहणी दौरा

। पाली । प्रतिनिधी ।

सुधागड तालुक्यात जिल्हा अधिक्षक कृषी अधिकाऱ्यांचा विविध प्रात्यक्षिक व प्रक्रिया उद्योग पाहणी दौर बुधवार (दि.६) रोजी झाला. यावेळी कृषी उप संचालक प्रवीण थीगळे, उप विभागीय कृषी अधिकारी शुभम बोराडे, रवीशंकर कावळे, दयावंती कदम, उदय भोसले, या दौऱ्यात सहभागी झाले होते.

जिल्हा संसाधन व्यक्ती अभिजित जाधव यांनी आत्मा अंतर्गत वाटप करण्यात आलेल्या राबगाव येथील शेतकरी लक्ष्मण जानू भोईर यांच्या रत्नागिरी-८ भात प्रात्यक्षिकास भेट दिली. याप्रसंगी जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी शिंदे यांनी भात पीकामध्ये खतांचा वापर कसा करायचा या बद्दल मार्गदर्शन केले. त्यानंतर उप विभागीय कृषी अधिकारी माणगाव शुभम बोऱ्हाडे यांनी भात पिकावरील कीड व रोग या विषयी मार्गदर्शन केले. त्यानंतर मौजे बलाप येथे संजय केदारी यांच्या महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत नारळ लागवड क्षेत्रात भेट देऊन मार्गदर्शन केले.

उन्हेरे खुर्द येथील प्रधान मंत्री सूक्ष्म अन्नप्रक्रिया युनिट महिला शेतकरी अक्षता अधिकारी यांच्या आंबा पल्प, जाम, जेली युनिटला भेट देऊन उपस्थित शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले.

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- ड्रायव्हर पाहिजे. ऑटोमॅटीक कार ड्रायव्हिंग येणारा ड्रायव्हर पाहिजे, ठिकाण : बामणसुरे, चोंढी. रविवारी सुट्टी. संपर्क :९०४९६५५५२३
- ऑफीसमध्ये कामाला मुलगी पाहिजे. पात्रता Bsc, आणि कॉम्प्यूटरची माहिती, वेळ : सकाळी ९ ते सायं. ६-३०, ठिकाण बामणसुरे, चोंढी, पगार : १०,००० महिना, रविवारी सुट्टी. संपर्क :९८२३५८५३२१
- घर भाड्याने/विकणे आहे. भाडे १८,०००/- डिपॉजिट ५०,०००/- चेंढरे संपर्क - ९१७५८००४३०
- ‘जन्नावार हॉस्पिटल’ बायपास रोड चेंढरे-अलिबाग मध्ये नर्सची जागा (vacancy) आहे. Contact No 7798034509
- आमच्या येथे J.S.W. (जिंदाल) कंपनीचे जुने नवीन कलर कोटेड पत्र्याचे पत्रे मिळतील. संपर्क : बाबू सैय्यद, कोळीवाडा कस्टम ऑफिसच्या बाजूला. मो. ७७४४९२५१६६
- अलिबाग शहरामध्ये रूम भाड्याने पाहिजे. ९२२६७५८४१५

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

## महाविद्यालयाच्या भूमिपूजनाचे आयोजन

। चिरनेर । प्रतिनिधी ।

पी. पी. खारपाटील यांच्या ७० व्या वाढदिवसाचे औचित्य साधून, पी. पी. खारपाटील एज्युकेशन सोसायटीच्या परशुराम धाकू खारपाटील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाचा भूमिपूजन सोहळा आयोजित करण्यात आला आहे. सदर भूमिपूजन सोहळा शुक्रवारी (दि. ८) ऑगस्ट रोजी सकाळी १०:३० वाजता चिरनेर येथे होणार आहे. या निमित्ताने पी. पी. खारपाटील यांचा जीवन प्रवास उलगडणाऱ्या पांडुरंग वारी या पुस्तकाचे प्रकाशन होणार आहे.

## सूर्यदत्त ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्स: एकात्मिक शिक्षणदृष्टीकोनातून २१व्या शतकातील उद्योजकांचे घडवणार प्रेरणास्थान

सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशन अंतर्गत ७ फेब्रुवारी १९९९ रोजी स्थापन झालेल्या सूर्यदत्त ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्स, पुणे ही संस्था यंदा अभिमानाने २७ वर्षांचा यशस्वी शैक्षणिक प्रवास साजरा करत आहे. गेल्या दोन दशकांहून अधिक काळात गुणवत्ता, नवकल्पना आणि सामाजिक बांधिलकीची प्रतीक बनली आहे, जी विद्यार्थ्यांना २१व्या शतकातील गरजांसाठी सक्षम बनवते. विद्यार्थ्यांचे करिअर समृद्ध करणे, समग्र, बौद्धिक आणि शाश्वत विकासासाठी जीवन वाढवणे’ हे संस्थेचे ब्रीदवाक्य म्हणजेच मूल्याधिष्ठित, व्यावसायिक आणि समग्र शिक्षणाच्या व्रताची साक्ष आहे. संस्कार, संस्कृतीची जोपासना करीत डिजिटली व प्रॅक्टिकली विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा हेच सूर्यदत्तचे उद्दिष्ट आहे. भारतीय शिक्षण क्षेत्रात यशस्वीरीत्या आमूलाग्र बदल घडवून आणणाऱ्या व्यक्तींपैकी प्रो. डॉ. संजय चोरडियांचे नाव अग्रणी आहे.




**प्रो. डॉ. संजय बी. चोरडिया**
संस्थापक अध्यक्ष : सूर्यदत्त एज्युकेशन फाऊंडेशन

> “सूर्यदत्तमध्ये आम्ही केवळ नोकरीसाठी नव्हे, तर सर्वांगीण विकासासाठी विद्यार्थ्यांना तयार करतो.”

### शाळेपासून पदव्युत्तर शिक्षणापर्यंतचा व्यापक विस्तार

■ सूर्यदत्त अंतर्गत ३० हून अधिक संस्थांचा समावेश असून यामध्ये शाळा, महाविद्यालये, प्रशिक्षण केंद्रे आणि व्यावसायिक शिक्षण संस्थांचा समावेश आहे. ही संपूर्ण साखळी ‘KG ते PG’ आणि त्याहीपलीकडे शिक्षण देते. यापैकी सुमारे २० संस्थांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ (SPPU), महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ (MUHS), कुलगुरू कवी कालिदास संस्कृत विद्यापीठ (KKSU), डॉ. बाबासाहेब आंबेडकर टेक्नीकल युनिव्हर्सिटी (DBATU), यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ (YCMOU) यांच्याकडून मान्यता प्राप्त आहे. तसेच CBSE, MSBTE, MSBSVET इत्यादींचा समावेश होतो. याशिवाय, AICTE, PCI, BCI, विविध स्किल डेव्हलपमेंट कौन्सिल्सच्याकडूनही मान्यता प्राप्त आहे.

### भविष्यासाठी सक्षम शिक्षण केंद्र

■ सूर्यदत्त मध्ये आर्टिफिशियल इंटेलिजन्स, ब्लॉकचेन, फिनटेक, टेक्नॉलॉजी, सायबरसुरक्षा, एव्हिएशन इ. क्षेत्रातील कौशल्याधारित आणि तंत्रज्ञानसंपन्न अभ्यासक्रम सुरू करण्यात आले आहेत. ८० हून अधिक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय सामंजस्य करार, तसेच सिंगापूरमधील A I साठीचे Centre of Excellence यांसोबत सामंजस्य करार आहेत. यामुळे विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावरचा अभ्यास आणि नोकरी संधी उपलब्ध होतात. दुबई, सिंगापूर, मलेशिया, यूके, यूएस, कॅनडा, ऑस्ट्रेलिया यांसारख्या देशांतील पर्यायी अभ्यास सहली विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय दृष्टिकोन देतात.

**विविध विक्रम, पुरस्कार व मान्यतांमधून सन्मान :**
**८० हून अधिक स्वयंसेवी संस्थांद्वारे जनजागृती, करिअर मार्गदर्शन व समाजोन्नती कार्यक्रम राबवले जातात. सूर्यदत्त राष्ट्रीय पुरस्कार कार्यक्रमात पं. भीमसेन जोशी, डॉ. बीकेएस अय्यंगार यांच्यासारख्या महान व्यक्तींना गौरवण्यात आले आहे.**

**सूर्यदत्त ने ७००० किलो महा मिसळ, २४ तासांचे शांत वाचन (रीडाथॉन), योग व हास्य उपचार अशा अनोख्या उपक्रमांतून 12 + वर्ल्ड रेकॉर्ड्स नोंदवले आहेत.**


ग्लोबल कॉन्क्लेव्ह ऑन चॅलेंजेस’ला प्रख्यात उद्योगपती टोनीनो लँबोर्गिनी यांची उपस्थिती

**स्टार्टअप उभारणीत पुढाकार :** संस्थेमार्फत इनोव्हेशन आणि इनक्युबेशन सेंटरची निर्मिती करण्यात आली असून, विद्यार्थ्यांच्या संशोधन वृत्तीस बळ मिळण्यासाठी संस्थेच्या वतीने प्रयोगशाळा स्थापण्यात आल्या आहेत.

**विश्वासार्ह प्लेसमेंट मधील सातत्य :** उमेदवारांच्या शाश्वत वाढीसाठी आवश्यक असणाऱ्या कौशल्य विकासावर भर देणारी ही c विद्यार्थ्यांना आघाडीच्या राष्ट्रीय -आंतरराष्ट्रीय क्षेत्रात करिअरचे पर्याय उपलब्ध करून देते.


राष्ट्रीय सायबर संसाधन केंद्राचे डॉ. शशिकांत महावर व डॉ. इ. नायडू यांच्या हस्ते सूर्यदत्तमध्ये उद्घाटन

■ **स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन आणि व्यक्तिमत्त्व विकास**
सूर्यदत्तमधून UPSC, MPSC, NEET, MBBS, NDA, न्यायसेवा इत्यादी स्पर्धा परीक्षांसाठी मार्गदर्शन दिले जाते. याशिवाय फ्रेंच, जर्मन यांसारख्या परदेशी भाषा, सॉफ्ट स्किल्स व व्यक्तिमत्त्व विकास प्रशिक्षण दिले जाते.

■ **नवीन राष्ट्रीय शैक्षणिक NEP धोरणाचे चार स्तंभ प्रवेश, समता, गुणवत्ता आणि जबाबदारी;** हे तत्त्वज्ञान सूर्यदत्त संस्थेच्या स्थापनेपासूनच त्याच्या कार्यामध्ये प्रतिबिंबित झाले आहे. सामाजिक, आर्थिक पार्श्वभूमी कोणतीही असो, प्रत्येक विद्यार्थ्याला गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याचा संस्थेचा कटाक्ष आहे.

■ **सामाजिक बांधिलकीतून नेतृत्व**
सूर्यदत्त Edu-Socio Connect द्वारे सामाजिक बांधिलकीचे उपक्रम राबविले जाते. दिवंगत रतनबाई आणि बन्सीलालजी चोरडिया यांच्या प्रेरणेतून शेतकऱ्यांसाठी, दिव्यांग, सार्वजनिक कर्मचारी, लष्कर अधिकारी, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक, निष्ठावान कर्मचाऱ्यांसाठी मोफत कौशल्य शिक्षण व प्रशिक्षणही दिले जाते.

> “आज १ लाखांहून अधिक विद्यार्थी आणि माजी विद्यार्थी, म्हणजेच “सूर्यन्स” भारतात व परदेशात कार्यरत आहेत. हे सूर्यन विविध क्षेत्रांत प्रोफेशनल्स, उद्योजक, कलाकार, आणि सामाजिक नेते म्हणून आपले योगदान देत आहेत.”

### पुढचा प्रवास...

२७ वर्षांच्या यशस्वी वाटचालीनंतर सूर्यदत्त संस्था शैक्षणिक, सामाजिक आणि जागतिक स्तरावर आपले कार्यक्षेत्र विस्तारत आहे. नाविन्य, सर्वसमावेशकता आणि मूल्याधिष्ठित शिक्षण यांची बांधिलकी ठेवत सूर्यदत्त खऱ्या अर्थाने २१व्या शतकातील अब्जाधीश घडवत आहे — केवळ संपत्तीत नव्हे तर ज्ञान, प्रामाणिकपणा आणि ध्येयधोरणांतही...

# परशुराम माळी संत तुकाराम महाराज पुरस्काराने सन्मानित

**उरण :** पनवेल तालुक्यातील आजीवली येथील परशुराम नथुराम माळी यांना नुकताच आण्णा भाऊ साठे कला मोहोत्सव २०२५ यांच्या तर्फे जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराज राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. माळी यांनी गेली १५ वर्षे धार्मिक कार्यात आजीवली येथे श्री संत ज्ञानेश्वर महाराज मंडळ आजीवली पनवेल यांच्या मार्फत विशेष संकल्पना राबवून एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. सोशल मीडियाच्या माध्यमातून सर्व महाराष्ट्र भर वारकरी संप्रादयातील आजीवली येथील हरिनाम सप्ताहाचे नाव महाराष्ट्र भर पसरविले आहे. १५ वर्ष सतत वारकारी सांप्रदयात काम करताना मोलाचा वाटा उचलला आहे. आज या कामाची पोच पावती म्हणून या पुरस्काराने मिळाली आहे.

# महाविद्यालय परिसरात आंबा लागवड

**उरण :** मैत्री ग्रुप वीर वाजेकर महाविद्यालय २००४-२००७ च्या माजी विद्यार्थ्यांनी महाविद्यालय परिसरात माझं महाविद्यालय, 'माझी भेट- माझं झाड' या संकल्पनेतून वृक्षारोपण केले. हा उपक्रम राबवताना ज्या सहकाऱ्यांचा वाढदिवस असेल त्याने किमान एक झाड लावावे असे नियोजन केले होते.त्यानुसार महाविद्यालयाच्या परवानगीने मैत्री ग्रुपने हापूस, केशर, निलम, राजापुरी, रत्ना अशा विविध जातीची ३० आंबा कलमे लावण्यात आली.

याप्रसंगी प्रभारी प्राचार्य डॉ. आमोद ठक्कर यांनी मैत्री ग्रुपच्या या उपक्रमाचे कौतुक केले. यावेळी प्रा. गजानन चव्हाण, प्रा. राम गोसावी, प्रा. डॉ अनिल पालवे, प्रा. डॉ गुरमीत वाधवा, निलेश ठाकूर, हेमांगी पाटील, संदीप पाटील, चेतन ठाकूर, कमलाकर घरत, प्राजक्ता ठाकूर, निशा तांडेल, तन्वी घरत, जुलेखा ठाकूर, दीपिका ठाकूर, कामिनी ठाकूर, वंदना कडू, सुषमा पाटील, करुणा कोळी, दीपाली पाटील, वैजयंती कडू - तरल, दर्शन घरत, निलेश म्हात्रे, जगन पाटील, निता म्हात्रे, आशा पाटील, रजनी पाटील, समीर जोशी, समाधान जोशी, मनोहर डाकी, गणेश कोळी, मनमोहन कोळी, एड. योगेश म्हात्रे, सारिका पाटील आदीनी विशेष मेहनत घेतली. पर्यावरण संवर्धनाच्या या उपक्रमासाठी झाडे दिली आणि लागवडीसाठी सहभाग घेतला.

## कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
(भारत सरकारचा उपक्रम)
सादर सेवा

### निविदा अधिसूचना

कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड तर्फे वरिष्ठ प्रादेशिक अभियंता, रत्नागिरी यांनी खालील कामासाठी खुल्या ई-टेंडर आमंत्रित केले आहेत. **कामाचे नाव:** एसएसई/चिपळूण विभागांतर्गत भोस्ते बोगद्यातील स्लीपर बदलण्याचे काम. **टेंडर क्र.: केआर-आरएन-डब्ल्यू-2025-31, दिनांक: 08.08.2025 अंदाजे किंमत:** ₹35,57,043/ **ईएमडी:** ₹ 71,200/- ऑनलाईन टेंडर सादर करण्याची अंतिम तारीख व वेळ: 01.09.2025 दुपारी 15.00 वाजेपर्यंत. अधिक माहितीसाठी संपर्क साधा: प्रादेशिक रेल्वे व्यवस्थापक कार्यालय, एमआयडीसी क्षेत्र, मिरजोळे, रत्नागिरी. (वेबसाईट: https://www.ireps.gov.in)

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

## तहसील कार्यालय सुधागड यांचे न्यायालयात

क्र.फौजदारी/कात-९/आवक क्र.४५२/२०२५

श्री. दिपक कृष्णा कदम
मुळगाव-मु.अडुळसे, पो. नाडसूर,
ता.सुधागड, जि.रायगड — वादी
सदरचा पत्ता :-मु.श्रींजी अपार्टमेंट, देऊळवाडा,
पाली, पो.पाली, ता. सुधागड, जि. रायगड ४१०२०५
मुख्याधिकारी, पाली नगरपंचायत, — प्रतिवादी
ता.सुधागड, जि. रायगड

जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ मधील कलम १३(३)प्रमाणे जन्म मृत्युबाबत

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविणेंत येते की, श्री. दिपक कृष्णा कदम रा. पाली, ता.सुधागड, जि. रायगड यांनी त्यांचा मुलगा कु. देवराज दिपक कदम यांचा जन्म दि. ३१-०३-२०१८ रोजी मौजे पाली, ता.सुधागड, जि. रायगड येथे झाला आहे. परंतु त्यांची नोंद अद्यापपर्यंत ग्रामपंचायत/नगरपंचायत कार्यालयात केली नाही असे प्रतिज्ञापत्रात नमुद करुन त्यांच्या जन्म नोंदीचा आदेश मिळणेबाबत अर्ज तहसील कार्यालय सुधागड येथे सादर केला आहे.

सदर देवराज दिपक कदम यांच्या जन्म नोंदीच्या तारखेबाबत कोणाची हरकत असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेल्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत तहसील कार्यालय, सुधागड पाली येथे स्वत: अथवा आपल्या प्रतिनिधीमार्फत लेखी स्वरुपात हरकत दाखल करावी. जर सदर मुदतीत हरकत न आल्यास अर्जदार यांनी सादर केलेल्या पुराव्याच्या आधारे जन्म नोंद करण्याचे आदेश पारीत करणेत येईल असे या जाहीर नोटीसद्वारे प्रसिद्ध करणेत येत आहे.

ठिकाण :- सुधागड
दिनांक :- ०६-०८-२०२५

सही/-
**उत्तम कुंभार**
तहसीलदार तथा
कार्यकारी दंडाधिकारी सुधागड

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेल्या जमिन मिळकती तीचे विद्यमान मालकांकडून कायमच्या खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तरी नमुद मिळकतींचे वर्णन पुढील प्रमाणे:-

**मौजे-पाथरज, तालुका-कर्जत, जि. रायगड येथील जमिन मिळकती**

| मालकाचे नाव | सर्वे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|---|
| श्री. कमलाकर वामन ठाकुर | २० | १/अ | ०.२५.०० | ०.८७ |
| श्री. रमेश गणपत तांडेल | १९ | ४ | ०.५४.०० | ३.८१ |

सदरच्या जमीन मिळकती या वरील मालकांच्या निर्वेध मालकी हक्काच्या व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीच्या असून त्या विकत देण्याचा त्यांना हक्क अधिकार असल्याने त्यांनी सदरील मिळकती या तद्ंगभुत हक्क हितसंबंधासह आमचे अशिलांना विकत देण्याचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेल्या मिळकतीं संदर्भात इतर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्रांकीत दान, कुळवहिवाट, बोजा, चार्ज लिन वगैरे कोणतेही प्रकारचा हक्कहित संबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाले पासून १४ दिवसांचे आत खाली सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती नोंदवाव्यात. मात्र दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील व मुदती नंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर कोणतेही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : कर्जत
दि. ०८/०८/२०२५

खरेदीदारा तर्फे वकील
**ॲड. अशोक रामदास ताम्हाणे**
पत्ता मु. सावळे, पो. मांडवणे,
ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१
मो.९०२२३७८४५६

## जाहीर सूचना

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे पवेळे, ता.अलिबाग, जि. रायगड येथील खालील परिशिष्टात नमूद केलेली शेतजमिन मिळकत श्री. राजकौर विष्णू बच्चाजीराव शिंदे उर्फ राजकौर सतेंद्रपाल सिंग, राहणार मालाड, मुंबई, यांच्या निर्वेध मालकी हक्काची असून, सदरील जमिन मिळकत पूर्णत: निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी दिला आहे. खालील परिशिष्टामध्ये नमूद केलेल्या मिळकतीवरील श्री. राजकौर विष्णू बच्चाजीराव शिंदे उर्फ राजकौर सतेंद्रपाल सिंग, यांच्या मालकी हक्काचा तपास करुन, मालकी हक्क निर्वेध असलेबाबतचा दाखला त्यांस देणेचा आहे. तरी ज्या व्यक्ती/संस्था यांचा परिशिष्टात नमूद मिळकतीमध्ये गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लीनय, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे समजून तसा दाखला त्यांस देण्यात येईल व मागाहून येणारी कोणतीही हरकत बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी, हे सर्वांस कळावे.

**वर नमूद केलेल्या मिळकतीचे परिशिष्ट**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| पवेळे, ता.अलिबाग | ५१/४ | ०-८३-८०<br>०-०१-३० पो.ख.<br>०-८५-१० एकूण | ७.५० |

सदर मिळकतीपैकी ०-३०-२० (हे.आर.)या शेतजमिन मिळकतीचे.

अलिबाग,
दिनांक :-७-०८-२०२५

सही/-
**(ॲड.प्रमोद मधुकर पांडव)**
हिराबाग सोसायटी,
अे विंग, टिळक रोड, अलिबाग
रायगड.

## तहसिल कार्यालय सुधागड यांचे न्यायालयात

क्र.फौजदारी/कात-९/आवक क्र.-४४८/२०२५

श्रीम. मनिषा सुन्या वाघमारे
रा.- आपटवणे आदिवासीवाडी पो. सिद्धेश्वर — वादी
ता. सुधागड, जि. रायगड
ग्रामपंचायत अधिकारी-आपटवणे — प्रतिवादी
ता. सुधागड, जि. रायगड
जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ मधील कलम १३ (३)
प्रमाणे जन्म-मृत्युबाबत

तमाम जनतेस या जाहिर नोटीसव्दारे कळविणेत येते की, श्रीम. मनिषा सुन्या वाघमारे, रा. आपटवणे आदिवासीवाडी पो. सिद्धेश्वर ता. सुधागड, जि. रायगड यांनी माझी मुलगी कु. सोनाली सुन्या वाघमारे हिची जन्म दि. २२/०३/२०२० रोजी मौजे-आपटवणे ता. सुधागड, रायगड येथे झाला आहे. परंतु तिची नोंद अद्यापपर्यत ग्रामपंचायत कार्यालयात केली नाही असे प्रतिज्ञापत्रात नमुद करुन तिची जन्म नोंदीचा आदेश मिळणेबाबत अर्ज तहसिल कार्यालय सुधागड येथे सादर केला आहे.

सदर कु. सोनाली सुन्या वाघमारे तिच्या जन्म नोंदीच्या तारखेबाबत कोणाची हरकत असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेच्या दिनांकापासून पंधरा दिवसाच्या आत तहसिल कार्यालय, सुधागड पाली येथे स्वतः अथवा आपल्या प्रतिनिधीमार्फत लेखी स्वरुपात हरकत दाखल करावी. जर सदर मुदतीत हरकत न आल्यास अर्जदार यांनी सादर केलेल्या पुराव्याच्या आधारे जन्म नोंद करण्याचे आदेश पारीत करणेत येईल. असे या जाहीर नोटीसद्वारे प्रसिध्द करणेत येत आहे.

ठिकाण :- सुधागड
दिनांक :- ०६/०८/२०२५

सही/-
**उत्तम कुंभार**
तहसिलदार तथा कार्यकारी
दंडाधिकारी सुधागड

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री. बबन अमृता ऐनकर, रा. कडाव, पो. कडाव, ता. कर्जत, जि. रायगड, ४१०२०१ व श्री. कैलास बुधाजी भोपी, रा. रूम नं.२३, फातिमा शाळे जवळ, सुभाष नगर, बदलापुर, कुळगाव, ता. अंबरनाथ, जि. ठाणे, ४२१५०३, यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमिन मिळकत, त्या मिळकतीचे विदयमान मालकांकडुन कायम खरेदी घेण्याचे ठरविलेले आहे.

**मिळकतीचे वर्णन : मौजे खांडस, ता. कर्जत, जि. रायगड, येथील जमिन मिळकत.**

| स.नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ) | आकार (रू.पै.) | भोगवटाधारकाचे नाव |
|---|---|---|---|---|
| ६४ | ६ | ०.४३.०० | ०.३४ | श्री. प्रदिपकुमार दत्तात्रय अदाटे |

वरील वर्णनाच्या शेतजमिन मिळकतीच्या संदर्भात अन्य कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा गहाण, दान, साठेकरार, करारनामा, विकसन करारनामा, मुखत्यारपत्र, विसारपावती, खरेदीखत, कुळ, सहभागीदार, वहिवाटदार, भाडेकरार, जागा वापर परवाना, पोटगी, लीज, लीन आदी कोणत्याही प्रकारे हक्क, हितसंबंध असल्यास व त्यांची हरकत असल्यास त्यांनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानीशी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन होणाऱ्या १४ (चौदा) दिवसांच्या मुदतीत खालील सही करणार यांजकडे लेखी स्वरूपात कळवावी. येणे प्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीच्या खरेदी विक्रीचा व कायदेशीर हस्तांतराचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

कर्जत
दिनांक :- ०८/०८/२०२५.

सही/-
**ॲड. उषा जे. कांबळे.**
कर्जत, ''पुष्प विमल'' निवास, नानामास्तर नगर, मुद्रे .
मो.नं.७३८५००४८०६.


# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**


## जाहिर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसने कळविण्यात येते की, आमचे आशिलांनी पुढे नमूद केलेली मिळकत तिचे विद्यमान मालकांकडून कायम खरेदी करण्याचे ठरवले असून त्याबाबत विद्यमान मालक व आमचे आशिलांमध्ये बोलणी चालू आहेत.

'मौजे वाडगांव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील भूमापन क्रमांक व उपविभाग २४९, एकूण क्षेत्र ०-३४-०० हे.आर.चौ.मी., आकार रु.८.१९/- मात्र पैकी रसिका रविंद्र ठाकूर व वैशाली मोहन ठाकूर यांचे मालकीचे ०.१७.०० हे.आर.चौ.मी. इतके क्षेत्र असलेली भातशेती'

सदरहु मिळकतीमध्ये कोणाही व्यक्तींचा अथवा व्यक्तीचा, कोणत्याही संस्थेचा, बँकेचा गहाण, दान, लिज, लिन, बक्षिस, खरेदी, साठेकरार, कोणताही करार, कुळ हक्क, वहिवाटीचा हक्क, पोटगी, मृत्युपत्र, अखत्यारपत्र, ताबा, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध, दिवाणीदावा, महसुलवाद असल्यास त्याच्या लेखी हरकतीसह व कागदोपत्री प्रथमदर्शनी पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०५ दिवसांचे आत प्रत्यक्ष येवून अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. वर नमूद मिळकत पूर्णत:निर्वेध व बिनजोखमी आहे असा भरवसा जमिन मालकांनी आमचे आशिलांना दिलेला आहे. सबब विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासहीत न आल्यास सदरहु मिळकतीबाबत आमचे आशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

अलिबाग
दि. ०७-०८-२०२५

सही/-
**श्री. अमित महेश्वर देशमुख**
ॲडव्होकेट आणि नोटरी
सृष्टी बिल्डींग, वेधशाळेसमोर,
अलिबाग, ता.अलिबाग,जि.रायगड

मालकांची सही
रसिका रविंद्र ठाकूर,
वैशाली मोहन ठाकूर

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यात येते की, मौजे झुगरेवाडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील सविस्तरपणे नमूद केलेली जमीन मिळकत आमचे अशिल सौ. कविता मिलिंद रणनवरे यांनी सदरहू मिळकतीचे विद्यमान मालक श्री. गजानन कान्हु ठोंबरे यांच्याकडून कायमस्वरुपी खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| गावाचे नाव | सर्व्हे नं./ हि.नं. | क्षेत्रफळ (हे.आर.पॉ.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| झुगरेवाडी | ३७/६/अ/२ | ०-२२-००<br>पोट खराबा ०-०४-००<br>एकूण ०-२६-०० | ०.१५ |

वरील वर्णन केलेली जमिन मिळकतीचे बाबतीत कोणाचाही दान, गहाण, फरोक्त, अगर अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, कायदेशीर हितसंबंध, करार, असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांच्या आत योग्य त्या कायदेशीर लेखी पुराव्यासह खालील नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे.

वरील मुदतीत कोणाचीही काहीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असल्याचे समजून, आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता. ०८-०८-२०२५

सही/-
**ॲड. पुजा गणेश म्हसे**
ऑफिस नं.४, रिजेन्सी प्लाझा, निर्माण नगरी,
नेरळ (पू) ता.कर्जत, जि.रायगड
मो.८०८७४३०४४७

## तहसिल कार्यालय सुधागड यांचे न्यायालयात

क्र.फौजदारी/कात-९/आवक क्र.-४४९/२०२५

श्रीम. मनिषा सुन्या वाघमारे
रा.- आपटवणे आदिवासीवाडी पो. सिद्धेश्वर — वादी
ता. सुधागड, जि. रायगड
ग्रामपंचायत अधिकारी-आपटवणे — प्रतिवादी
ता. सुधागड, जि. रायगड
जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ मधील कलम १३ (३)
प्रमाणे जन्म-मृत्युबाबत

तमाम जनतेस या जाहिर नोटीसव्दारे कळविणेत येते की, श्रीम. मनिषा सुन्या वाघमारे, रा. आपटवणे आदिवासीवाडी पो. सिद्धेश्वर ता. सुधागड, जि. रायगड यांनी माझी मुलगी कु. श्वेता सुन्या वाघमारे हिची जन्म दि. ३१/०८/२०१७ रोजी मौजे-आपटवणे ता. सुधागड, रायगड येथे झाला आहे. परंतु तिची नोंद अद्यापपर्यत ग्रामपंचायत कार्यालयात केली नाही असे प्रतिज्ञापत्रात नमुद करुन तिची जन्म नोंदीचा आदेश मिळणेबाबत अर्ज तहसिल कार्यालय सुधागड येथे सादर केला आहे.

सदर कु.श्वेता सुन्या वाघमारे तिच्या जन्म नोंदीच्या तारखेबाबत कोणाची हरकत असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेच्या दिनांकापासून पंधरा दिवसाच्या आत तहसिल कार्यालय, सुधागड पाली येथे स्वतः अथवा आपल्या प्रतिनिधीमार्फत लेखी स्वरुपात हरकत दाखल करावी. जर सदर मुदतीत हरकत न आल्यास अर्जदार यांनी सादर केलेल्या पुराव्याच्या आधारे जन्म नोंद करण्याचे आदेश पारीत करणेत येईल. असे या जाहीर नोटीसद्वारे प्रसिध्द करणेत येत आहे.

ठिकाण :- सुधागड
दिनांक :- ०६/०८/२०२५

सही/-
**उत्तम कुंभार**
तहसिलदार तथा कार्यकारी
दंडाधिकारी सुधागड

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, मौजे महाळुंगे बुद्रुक, ता. मुरुड, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या गवत व घर मिळकतीचे विद्यमान मालक श्री. विशाल केशव म्हात्रे, रा.५९३, हिमत नगरी, जासई, ता.पनवेल, जि.रायगड यांच्या नावे असलेली गवती लागवडी मिळकत व त्यामध्ये असलेली घर मिळकत माझे अशिल यांनी कायम स्वरुपी विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याबाबत तशा आशयाचा करार विद्यमान मालकांबरोबर झालेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र. व उपविभाग क्र. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| महाळुंगे बुद्रुक ता.मुरुड | ३५/१/३ | १-२८-२०<br>पो.ख. ०-०७-००<br>एकूण १-३५-०० | १.७६ |

वर नमूद गवत मिळकतीपैकी श्री. विशाल केशव म्हात्रे यांचे मालकी हक्कातील व ताबेकब्जा वहिवाटीतील ०-२०-०० हे.आर., आकार रु.०.२८ पैसे ही गवती लागवडी मिळकत व त्या मिळकतीमध्ये असणारी ग्रुप ग्रामपंचायत काकळघर घर क्र.८९५ व ८९९

सबब सदरहू मिळकत निर्वेध असल्याचा निर्वाळा विद्यमान मालकांनी दिलेला आहे. तरी याउपरही सदरहू सदर मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ, वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासून सात दिवसांचे आत प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. अन्यथा सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहीत आहेत असे गृहीत धरुन माझे अशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पूर्ण करतील व विहीत मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती माझ्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक : ०५-०८-२०२५

सही/-
**ॲड. धीरज जयवंत म्हात्रे**
दुय्यम निबंधक कार्यालयासमोर, अलिबाग,
ता.अलिबाग, जि. रायगड

## तहसिल कार्यालय सुधागड यांचे न्यायालयात

क्र.फौजदारी/कात-९/आवक क्र.-४५४/२०२५

श्री. लक्ष्मण राजा वाघमारे
रा.- घोडपापड आदिवासीवाडी पो. जांभुळपाडा — वादी
ता. सुधागड, जि. रायगड
ग्रामपंचायत अधिकारी-वऱ्हाड जांभुळपाडा — प्रतिवादी
ता. सुधागड, जि. रायगड
जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ मधील कलम १३ (३)
प्रमाणे जन्म - मृत्युबाबत

तमाम जनतेस या जाहिर नोटीसव्दारे कळविणेत येते की, श्री. लक्ष्मण राजा वाघमारे रा. घोडपापड आदिवासीवाडी पो. जांभुळपाडा ता. सुधागड, जि. रायगड यांनी त्यांचा जन्म दि. ०१/०१/१९६१ रोजी मौजे-घोडपापड आदिवासीवाडी ता. सुधागड, जि. रायगड येथे झाला आहे. परंतु त्याची नोंद अद्यापपर्यत ग्रामपंचायत कार्यालयात केली नाही असे प्रतिज्ञापत्रात नमुद करुन त्यांच्या जन्म नोंदीचा आदेश मिळणेबाबत अर्ज तहसिल कार्यालय सुधागड येथे सादर केला आहे.

सदर लक्ष्मण राजा वाघमारे यांच्या जन्म नोंदीच्या तारखेबाबत कोणाची हरकत असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेच्या दिनांकापासून पंधरा दिवसाच्या आत तहसिल कार्यालय, सुधागड पाली येथे स्वतः अथवा आपल्या प्रतिनिधीमार्फत लेखी स्वरुपात हरकत दाखल करावी. जर सदर मुदतीत हरकत न आल्यास अर्जदार यांनी सादर केलेल्या पुराव्याच्या आधारे जन्म नोंद करण्याचे आदेश पारीत करणेत येईल. असे या जाहीर नोटीसद्वारे प्रसिध्द करणेत येत आहे.

ठिकाण :- सुधागड
दिनांक :- ०६/०८/२०२५

सही/-
**उत्तम कुंभार**
तहसिलदार तथा कार्यकारी
दंडाधिकारी

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली बिनशेती जमिन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांकडून कायमची खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. त्यामुळे ७/१२ उताऱ्यावर नमूद असलेल्या मालकांनी कोणत्याही व्यक्तीबरोबर तोंडी अथवा लेखी करार केलेला असल्यास तसेच या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहाण, दान, लिज,बक्षिसपत्र,चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरुपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदीव्यवहार पूर्ण करतील. मुदतबाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**
**मिळकतीचे वर्णन :-**
**मौजे लाडीवली, ता. कर्जत, जि. रायगड येथील बिनशेती जमिन मिळकत :**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं./ प्लॉट नं. | क्षेत्र आर.चौ.मी. | आकारणी रुपये | आकारणी पैसे |
|---|---|---|---|---|
| रमेश विठ्ठल विधाते व इतर | ६१/२ | ६-२०-०० | १२ | ४४ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता :- ए विंग, फ्लॅट नं.४,पहिला मजला, गणेश अपार्टमेंट, कर्जत नगरपालिका कार्यालयाशेजारी, ता.कर्जत, जि. रायगड ४१०२०१

सही/-
ॲड. जयेश संभाजी म्हसे
दिनांक :-०८-०८-२०२५
मो.नं.९०२८९८२२७७
ईमेल-adv.jayeshmhase@gmail.com

## PUBLIC NOTICE

**NOTICE IS HEREBY GIVEN** to all concerned that, we, on behalf of our client, are investigating the ownership right, title and interest of the landowners (more particularly listed in the **Schedule** hereunder written), to all the piece and parcel of land comprised in various gat numbers and admeasuring in the aggregate 00-80-80 (Hectare-Ares-Square Meters) equivalent to 8,080 square meters), all situate, lying and being at Village Pedhambe, Taluka Alibaug and District Raigad and more particularly described in the **Schedule** hereunder written (hereinafter collectively referred to as the **"Property"**).

Any person entities having or claiming to have any share, right, title, interest, claim, objection and/ or demand (directly or indirectly) whether by way of sale, memorandum of understanding, transfer, assignment, exchange, allotment, charge, encumbrance, tenancy, sub-tenancy, lease, sub-lease, license, mortgage (equitable or otherwise), inheritance, occupation, possession, partition, share, gift, devise, lien, charge, outgoings, development rights, maintenance, easement, trust, covenant or condition, easement, release, relinquishment or any other method through any agreement, contract, deed, document, writing, conveyance deed, devise, bequest, succession, family arrangement/ settlement, litigation, decree or order or award of any court of law or tribunal or revenue or statutory authority or arbitration or otherwise howsoever of any nature whatsoever, in to, out of or upon the Property or any part thereof are hereby required to give notice thereof in writing along with complete and certified true copies of documentary evidence/ proof thereof, to the undersigned, at One World Centre, 7th Floor, Tower 2A, Senapati Bapat Marg, Lower Parel (West), Mumbai - 400 013 and also by e-mail to **monika.bhonsale@trilegal.com** and **uday.shah@trilegal.com,** within **14 (fourteen) days** from the date hereof, failing which, claim/s, if any, of such person, shall be deemed to have been waived and/or abandoned and not binding in any manner whatsoever.

**SCHEDULE**
**(Description of the Property and names of the owners)**

All those pieces and parcels of the land admeasuring in the aggregate 00-80-80 (Hectare-Ares-Square Meters) equivalent to 8,080 square meters, all situate, lying and being at Village Pedhambe, Taluka Alibaug and District Raigad and more particularly described and bearing gat numbers and corresponding area as under:

| Gat No. | Tenure | Area (in square meters) | Name of the Owners |
|---|---|---|---|
| 134 (Part) | Occupancy Class - I | 1,890 out of 3,890 | Shailaja Atmaram Patil |
| 233 | Occupancy Class - I | 1,100 | Pradeep Prabhakar Gavand |
| 232 | Occupancy Class - II | 5,090 | Ratnaprabha Laxman Patil, Maalti Madhukar Patil and Lata Mahadev Mhatre |
| | Total Area | | 8,080 square meters |

Dated this 8th day of August, 2025

Monika Bhonsale
Partner Trilegal
Advocates and Solicitors One World Centre, 7th Floor,
Tower 2A, Senapati Bapat Marg,
Lower parel (west)
Mumbai-400013

## तहसील कार्यालय सुधागड यांचे न्यायालयात

क्र.फौजदारी/कात-९/आवक क्र.४५१/२०२५

श्री. दिपक कृष्णा कदम
मुळगाव-मु.अडुळसे, पो. नाडसूर,
ता.सुधागड, जि. रायगड — वादी
सदरचा पत्ता :-मु.श्रींजी अपार्टमेंट, देऊळवाडा,
पाली, पो.पाली, ता. सुधागड, जि. रायगड ४१०२०५
मुख्याधिकारी, पाली नगरपंचायत, — प्रतिवादी
ता.सुधागड, जि. रायगड

जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ मधील कलम १३(३)प्रमाणे जन्म मृत्युबाबत

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते की, श्री. दिपक कृष्णा कदम रा. पाली, ता.सुधागड, जि. रायगड यांनी त्यांचा मुलगा कु. रुद्र दिपक कदम यांचा जन्म दि. १२-०९-२०१६ रोजी मौजे पाली, ता.सुधागड, जि. रायगड येथे झाला आहे. परंतु त्यांची नोंद अद्यापपर्यंत ग्रामपंचायत/नगरपंचायत कार्यालयात केली नाही असे प्रतिज्ञापत्रात नमुद करुन त्यांच्या जन्म नोंदीचा आदेश मिळणेबाबत अर्ज तहसील कार्यालय सुधागड येथे सादर केला आहे.

सदर देवराज दिपक कदम यांच्या जन्म नोंदीच्या तारखेबाबत कोणाची हरकत असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेल्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत तहसील कार्यालय, सुधागड पाली येथे स्वत: अथवा आपल्या प्रतिनिधीमार्फत लेखी स्वरुपात हरकत दाखल करावी. जर सदर मुदतीत हरकत न आल्यास अर्जदार यांनी सादर केलेल्या पुराव्याच्या आधारे जन्म नोंद करण्याचे आदेश पारीत करणेत येईल असे या जाहीर नोटीसद्वारे प्रसिद्ध करणेत येत आहे.

ठिकाण :- सुधागड
दिनांक :- ०६-०८-२०२५

सही/-
**उत्तम कुंभार**
तहसीलदार तथा
कार्यकारी दंडाधिकारी सुधागड

## जाहीर नोटीस

**दि.०६-०८-२०२५**

सर्व नागरिकांना कळविण्यात येते की, माझे क्लायंट खाली नमूद केलेली जमिन खरेदी करण्याचा विचार करत आहेत. सदर जमीन पुढील मालकांकडून खरेदी केली जाणार आहे. श्री. ऋषीराम भाटिया, २. श्रीमती अपर्णा ऋषीराम भाटिया, मालमत्तेचे वर्णन :- सदर मालमत्ता गट क्रमांक १६१, खाता नो.२८५, गाव भोईघर, तालुका-मुरुड, जिल्हा-रायगड, क्षेत्रफळ ०.३०.६० जिरायत क्षेत्र +वरकस ०.०४.०० एकूण जमीन ०.३४.६० हेक्टर्स इतकी आहे. सीमा :पूर्वेस -सुर्वे नो.२ हिस्सा नो.३,पश्चिमेस-सुर्वे नो.२ हिस्सा नो.२, दक्षिणेस-सुर्वे ना.२ हिस्सा नो.२, उत्तरास-गाव टेंभोडे वेष, वरील नमूद व्यक्तींच्या मालकीतील ही जमीन माझे क्लायंट हे कायदेशीर मार्गाने खरेदी करणार आहेत. अतएव कोणीही व्यक्ती, संस्था किंवा पक्ष यांचा सदर जमीन किंवा तिच्या कोणत्याही भागावर कोणताही हक्क, मालकी हक्क, स्वामित्व, ताबा, हिस्सा, भाडेकरार, दावे, कोर्टाचा आदेश, गहाण, अडचण, लायसन्स, उपभोग, कायमस्वरुपी भाडेपट्टा, दान, करार,वारसा हक्क किंवा अन्य कोणताही कायदेशीर अथवा बेकायदेशीर दावा असेल तर त्यांनी या नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत खाली दिलेल्या पत्त्यावर लेखी स्वरुपात व आवश्यक पुराव्यांसह आमच्याशी संपर्क साधावा. विनिश्चित कालावधीत कोणताही दावा प्राप्त न झाल्यास, सदर जमीन कोणत्याही अडथळ्याशिवाय, कोणत्याही हक्क अथवा दाव्यांशिवाय असल्याचे गृहीत धरुन माझे क्लायंट जमीन खरेदीचा व्यवहार पुढे चालू ठेवतील. यानंतर प्राप्त होणारे कोणतेही दावे ग्राह्य धरले जाणार नाहीत.

सही/-
**प्रताप राजेंद्र विटणकर**
ॲडव्होकेट्स
रा.ए.जे.वृंदावन, फ्लॅट नं.
१०२, राजाराम पुलाजवळ
कर्वेनगर, पुणे-४११ ०५२

# बीसीसीआयला मोठा दिलासा

■ नव्या क्रीडा विधेयकात महत्वपूर्ण दुरुस्ती

■ माहिती अधिकाराच्या अटीतून मुक्तता

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

नव्या क्रीडा विधेयकात कळीचा मुद्दा असलेल्या माहिती अधिकाराच्या अटीतून बीसीसीआयला मुक्तता मिळाली आहे. केवळ सरकारी अनुदान किंवा मदतीवर अवलंबून असलेल्या संस्थांचाच माहिती अधिकाराच्या नियमात समावेश असेल, अशी सुधारणा क्रीडा विधेयकात करण्यात आली आहे.

बहुचर्चित सुधारित क्रीडा विधेयकात मंजुरीपूर्वीच नव्याने सुधारणा करण्यात आली आहे. या नव्या सुधारणेनुसार, आता केवळ सरकारी निधी घेणाऱ्याच संघटना माहिती अधिकाराखाली (आरटीआय) येतील. विधेयकातील या बदलाचा सर्वांत मोठा दिलासा भारतीय क्रिकेट नियामक मंडळाला (बीसीसीआय) मिळाला आहे. हे सुधारित विधेयक क्रीडामंत्री मनसुख मांडविया यांनी २३ जुलै रौजी लोकसभेत मांडले होते. यातील कलम १५ (२) नुसार क्रीडा संघटनांना त्यांच्या कार्य, कर्तव्य आणि अधिकारांच्या वापरासंदर्भात माहिती अधिकार (आरटीआय) कायदा २००५ लागू होईल असे स्पष्ट करण्यात आले होते. तेव्हापासूनच 'बीसीसीआय'ने या विधेयकाला विरोध केला होता. कधीही सरकारी अनुदान किंवा निधी घेत नसल्यामुळे आम्हाला हा कायदा लागू होत नाही, अशी 'बीसीसीआय'ची ठाम भूमिका होती.

'बीसीसीआय'च्या या भूमिकेनंतर काही दिवसांतच म्हणजे विधेयक लोकसभेत मंजूर होण्यापूर्वीच त्यात सुधारणा करण्यात आली असून, त्यात केवळ सरकारी निधी घेणाऱ्या क्रीडा संघटनाच माहिती अधिकारात येतील असे नमूद करण्यात आले आहे. सुधारित कलमात सार्वजनिक प्राधिकरणाची व्याख्या सरकारी निधी किंवा मदतीवर अवलंबून असलेली संस्था अशी करण्यात आली आहे. त्यामुळे सार्वजनिक प्राधिकरण म्हणजे काय हे स्पष्ट होते, असे एका वरिष्ठ सूत्राने सांगितले. ही सुधारणा झाली नसती, तर विधेयक प्रलंबित राहण्याची किंवा त्याला न्यायालयात आव्हान मिळण्याची शक्यता होती. त्यामुळेच आता सार्वजनिक निधीशी संबंधित कुठलीही गोष्ट माहितीच्या अधिकारात येईल, असेही या सूत्राने सांगितले.

विधेयक मंजूर झाल्यानंतर 'बीसीसीआय'ला राष्ट्रीय क्रीडा संस्था (एनएसएफ) म्हणून नोंदणी करावी लागणार आहे. कारण, २०२८च्या लॉस एंजलिस ऑलिम्पिक स्पर्धेपासून क्रिकेट हा एक ऑलिम्पिक क्रीडा प्रकार म्हणून गणला जाणार आहे. मात्र, या संदर्भात सरकार किंवा 'बीसीसीआय'कडून स्पष्ट भूमिका मांडण्यात आलेली नाही. दरम्यान, सुधारित राष्ट्रीय क्रीडा प्रशासन विधेयकाचा उद्देश भारतातील क्रीडा संस्थांच्या कार्यपद्धतीत सुधारणा करणे आहे.

### सरकारी मदतीसंदर्भात प्रश्नचिन्हच

**राष्ट्रीय क्रीडा संस्थांना सरकारकडून वेळोवेळी क्रीडा निधीच्या पलीकडे जाऊन मदत मिळत असते. विविध स्पर्धांचे आयोजन हे सरकारच्या मदतीनेच केले जाते. अनेक स्पर्धा सरकारच्यावतीने पुरस्कृत केल्या जातात. या मदतीला निधी मानायचे का? हा नवा प्रश्न आता उपस्थित होऊ शकतो. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे देशातील पायाभूत सुविधा या केवळ निधीवर उभारल्या जाऊ शकत नाहीत. त्याला सरकारची मदत आवश्यकच असते.**

### एनएसबी स्थापन करण्याचा प्रस्ताव

**क्रिकेट आता ऑलिंपिकचा भाग असल्याने (२०२८ मध्ये टी-२० स्वरूप), बीसीसीआयला अजूनही राष्ट्रीय क्रीडा महासंघ (एनएसएफ) म्हणून नोंदणी करावी लागेल. कठोर नियम आणि जबाबदारी लागू करण्यासाठी राष्ट्रीय क्रीडा मंडळ (एनएसबी) स्थापन करण्याचा प्रस्ताव या विधेयकात आहे. केंद्रीय निधी मिळविण्यासाठी सर्व एनएसएफना राष्ट्रीय क्रीडा मंडळाची मान्यता असणे आवश्यक आहे. निवड किंवा निवडणुकांशी संबंधित वाद मिटविण्यासाठी राष्ट्रीय क्रीडा न्यायाधिकरण देखील सादर केले आहे, ज्याचे निर्णय केवळ सर्वोच्च न्यायालयात अपील करता येतील.**

## पाकिस्तान संघाची माघार

**नवी दिल्ली:** आशिया चषक क्रिकेट स्पर्धेतील भारत-पाक यांच्यातील तिढा सुटला असताना दुसऱ्या बाजूला आशिया चषक हॉकी स्पर्धेतून पाकिस्तान संघाने माघार घेतली आहे. सुरक्षिततेच्या कारणास्तव पाक संघाने भारतात येण्यास नकार दिल्याचे वृत्त समोर येत आहे. २७ ऑगस्ट ते ७ सप्टेंबर या कालावधीत हॉकीतील आशिया चषक स्पर्धा नियोजित आहे. बिहारमधील राजगीर येथे होणारी ही स्पर्धा नेदरलंड आणि बेल्जियम यांच्या संयुक्त यजमानपदाखाली होणाऱ्या २०२६ च्या हॉकी विश्वचषकाच्या दृष्टिने महत्त्वपूर्ण आहे. ही स्पर्धा जिंकणारा संघ हॉकी विश्वचषक स्पर्धेसाठी पात्र ठरणार आहे. हॉकी इंडियाच्या अधिकाऱ्याच्या हवाले दिलेल्या वृत्तानुसार, भारत सरकारने पाकिस्तानी खेळाडूंना या स्पर्धेसाठी व्हिसा देण्याची तयारी दर्शवली होती. पण पाकिस्तान हॉकी महासंघाने सुरक्षिततेच्या कारणास्तव भारतात येण्यास नकार दिला आहे. त्यानंतर भारतीय हॉकी महासंघाने पाकिस्तानच्या जागी बांगलादेशच्या हॉकी संघाला या स्पर्धेत सहभागी होण्याचे निमंत्रण दिले आहे.

# निवडक

## बुमराह, सिराजची अग्नीपरीक्षा



**नवी दिल्ली :** जो फिट असेल तोच संघात बसेल, हे धोरण बीसीसीआय आगामी स्पर्धांसाठी आजमवणार असून, जसप्रीत बुमरा आणि मोहम्मद सिराजच्या फिटनेसवर बीसीसीआयने विशेष लक्ष केंद्रित केले आहे. त्यामुळे आशिया चषकापूर्वी या दोन्ही गोलंदाजांना फिटनेसची अग्निपरीक्षा द्यावी लागणार आहे. त्यानंतर त्यांच्या सहभागाबाबत बीसीसीआय घोषणा करणार आहे. तसेच, संघातील अन्य खेळाडूंनाही याच परीक्षेला सामोरे जावे लागणार आहे. नुकत्याच झालेल्या पाच कसोटी सामन्यांच्या मालिकेत बुमरा केवळ तीन कसोटी खेळला होता, तर सिराजने पाचही कसोटीत स्वतःचा वेगवान मारा इंग्लिश फलंदाजांना दाखवला होता. मिळालेल्या माहितीनुसार, ९ सप्टेंबरपासून सुरू होत असलेल्या आशिया कपपूर्वी निवड समितीची बैठक होणार आहे. त्याआधी या दोघांच्या फिटनेसचे परीक्षण केले जाणार आहे. या एक महिन्याच्या विश्रांती कालावधीत दोघांची पूर्णपणे फिटनेस पाहिल्यानंतर त्यांच्याबद्दल निर्णय घेतला जाईल. हे दोघेही संघासाठी म हत्त्वाचे असून दोघांनाही फिट करण्याचा बीसीसीआयचा मानस आहे. त्यामुळे खेळाडूंच्या फिटनेसबाबत कोणताही धोका न पत्करता वर्कलोड मॅनेजमेंटची बीसीसीआय अंमलबजावणी करणार आहे.

## रोहित शर्मामुळे यशस्वीची घरवापसी



**मुंबई :** भारतीय संघाचा सलामीवीर फलंदाज यशस्वी जयस्वालने मुंबई संघासाठी देशांतर्गत क्रिकेट खेळणार नाही, असे पूर्णपणे मनाशी ठरवले होते. त्याने मुंबई क्रिकेट असोसिएशनकडून ना हरकत प्रमाणपत्र देखील मागितले होते. एमसीएने त्याला एनओसी देखील प्रदान केले होते; परंतु, रोहित शर्माच्या आग्रहामुळेच यशस्वी जयस्वाल मुंबईकडून खेळण्यास राजी झाला आहे, असा खुलासा एमसीएच्या अध्यक्षांनी केला आहे. मिळालेल्या माहितीनुसार एका अहवालात एमसीएचे अध्यक्ष अजिंक्य नाईक म्हणतात की, रोहित शर्माने यशस्वी जयस्वालला त्याच्या कारकिर्दीच्या या टप्प्यावर मुंबई संघासोबत राहण्यास सांगितले. त्याने स्पष्ट केले की मुंबईसाठी खेळणे ही खूप सन्मानाची गोष्ट आहे, कारण या संघाने ४२ रणजी जेतेपदे जिंकली आहेत. रोहितने यशस्वीला असेही सांगितले की, मुंबईने तुला व्यासपीठ दिले आहे हे विसरू नको, त्यानंतर तु इतक्या लहान वयात आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये नाव कमवत आहेस. आता तो पुन्हा मुंबईसाठी देशांतर्गत क्रिकेट खेळण्यास तयार आहे.

## रिषभ पंतचे स्थान धोक्यात?



**नवी दिल्ली :** भारतीय क्रिकेट संघासाठी अगामी आशिया चषक खूप महत्त्वाचा ठरणार आहे. पुढील वर्षी खेळविला जाणाऱ्या टी-२० विश्वचषकाच्या पार्श्वभूमीवर यंदाचा आशिया चषक देखील टी-२० फॉरमॅटमध्ये खेळवला जाणार असून, ९ सप्टेंबर ते २८ सप्टेंबरदरम्यान संयुक्त अरब अमिरातीच्या मैदानावर रंगणार आहे. या स्पर्धेसाठी यष्टीरक्षक म्हणून रिषभ पंतचे स्थान कायम राहील का, हा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. कारण सध्या ३ यष्टीरक्षक फलंदाजांनी जोरदार कामगिरी केली आहे, जे पंतची जागा खेचून घेण्याची ताकद ठेवतात. भारतीय संघाचा विस्फोटक यष्टीरक्षक-फलंदाज संजू सॅमसन अनेक वेळा पंतच्या उपस्थितीमुळे संघात ये-जा करत राहिला. मात्र, यावेळी त्याची कामगिरी बोलकी आहे. आशिया चषकात तो यष्टीरक्षणासोबत सलामीवीराची भूमिका निभावू शकतो. केएल राहुलसारखा तगडा पर्याय भारताकडे आधीपासूनच आहे. तो केवळ यष्टिरक्षकच नाही, तर टॉप ऑर्डरपासून लोअर मिडल ऑर्डरपर्यंत कुठेही फलंदाजी करू शकतो. जितेश शर्माचे नाव सध्या चांगलेच चर्चेत आहे. आयपीएल २०२५ मध्ये आरसीबीसाठी खेळताना त्याने २६१ धावा ठोकल्या आणि संघाला चषक मिळवून दिले. त्यामुळे रिषभ पंतसाठी अगामी आशिया चषक हा 'करो या मरो' क्षण ठरू शकतो.

# शांताबाई जोग मराठी एकांकिका स्पर्धा

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्र ऐक्यवर्धक मंडळाच्या वतीने स्व. शांताबाई जोग मराठी एकांकिका स्पर्धा २०२५ चे आयोजन करण्यात आले आहे. सोनल प्रोडक्शन प्रस्तुत ही स्पर्धा १६ निवडक एकांकिकांसाठी खुली असून मुंबईतील गणेश नाट्य मंदिर चेंबूर येथे २९ ऑगस्ट ते १ सप्टेंबर या कालावधीत रंगणार आहे.

या एकांकिकेचा कालावधी कमाल ४५ मिनिटे निश्चित करण्यात आला आहे. तसेच, स्पर्धेसाठी ५०० रुपये प्रवेश शुल्क असून १० ऑगस्ट ही अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख असल्याचे आयोजकांकडून सांगण्यात आले आहे. या स्पर्धेत एक कलाकार केवळ एका एकांकिकेतच सहभाग घेऊ शकतो. निवड झालेल्या १६ संघांनाच प्रवेश मिळणार असून मंडळाचा निर्णय अंतिम असणार आहे. अंतिम निकालानंतर कोणत्याही प्रकारची चर्चा ग्राह्य धरली जाणार नाही. या स्पर्धेतील सर्व विजेत्यांना रोख रक्कम, चषक आणि प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. तसेच दिग्दर्शन, अभिनय (पुरुष/महिला), नेपथ्य, प्रकाशयोजना, पार्श्वसंगीत, सुविचार, तंत्रज्ञान आदी क्षेत्रांमध्ये देखील रोख रकमेची बक्षिसे जाहीर करण्यात आली आहेत. या स्पर्धेमुळे नवोदित व नामवंत रंगकर्मींसाठी हक्काचे व्यासपीठ उपलब्ध होत आहे.

### तायक्कांडो स्पर्धेत मंडणगडची नेत्रदीपक कामगिरी

# १५ पदकांची कमाई



**। मंडणगड । प्रतिनिधी ।**

रत्नागिरी जिल्हा तायक्कांडो स्पोर्ट्स असोसिएशन अंतर्गत शहानुर-चिपळूण तालुका तायकंदो अकॅडमी यांच्या सहकार्याने चिपळूण येथे जिल्हा अजिंक्यपद तायक्कांडो स्पर्धा पार पडली. या स्पर्धेत मंडणगड तालुका तायक्कांडो अकॅडमीतील खेळाडूंनी १५ पदके मिळवून नेत्रदीपक कामगिरी केली आहे. ही स्पर्धा तायक्कांडो असोसिएशन ऑफ महाराष्ट्रचे कोषाध्यक्ष व रत्नागिरी जिल्हा तायक्कांडो स्पोर्टस असो. चे अध्यक्ष व्यंकटेशराव कररा, उपाध्यक्ष विश्वदास लोखंडे, लक्ष्मण कररा, शशांक घडशी, संजय सुर्वे यांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजित करण्यात आली होती.


या स्पर्धेत तायक्कांडो सेंटर क्लब मंडणगडच्या खेळाडूंनी मुलींच्या ७ वर्षाखालील गटात आराध्या पवार हिने सुवर्ण, प्रांजल पाटील हिने रौप्य तर श्रीशा कदम हिने कांस्यपदक पटकावले आहे. मुलांच्या गटात जय मोरे याने सुवर्ण, स्वस्तिक पवार याने रौप्य, तर रियांश आयरे याने कांस्यपदक मिळवले. उप-कनिष्ठ गटात आराध्या कोळंबेकर हिने सुवर्ण, अर्णव जाधव आणि प्रशिक मर्चंडे याने कांस्यपदक पटकावले. कॅडेट गट मुलींमध्ये वेदिका वाळुंज हिने रौप्य, मुलांमध्ये वेदांत दुर्गवले याने कांस्यपदक संपादित केले. वरिष्ठ महिला गटात सृष्टी लोखंडे हिने सुवर्ण व संस्कार साळवी हिने कांस्यपदक मिळवले. वरिष्ठ तायक्कांदो पुमसे महिला गटात काजल लोखंडे यांनी सुवर्ण, पुरुष गटात विश्वदास लोखंडे यांने सुवर्णपटक मिळवून यश संपादन केले.

# जेम्स अँडरसनचा फ्लॉप शो

**। लंडन । वृत्तसंस्था ।**

सध्या इंग्लंडमध्ये द हंड्रेडच्या पाचव्या हंगामाचे सामने सुरू आहेत. या हंगामातील दुसरा सामना मँचेस्टर ओरिजिनल्स आणि सदर्न ब्रेव्ह यांच्यात खेळला गेला. या सामन्यात इंग्लंडचा ४३ वर्षीय वेगवान गोलंदाज जेम्स अँडरसनने द हंड्रेडमध्ये पदार्पण केले. या हंगामात तो मँचेस्टर ओरिजिनल्स संघाचा भाग आहे. मात्र, पदार्पणाच्या सामन्यात अँडरसनची जादू चालली नाही आणि तो गोलंदाजीत खूप महागडा ठरला. या सामन्यात सदर्न ब्रेव्हने मँचेस्टर ओरिजिनल्सचा एक गडी राखून पराभव केला.

सदर्न ब्रेव्हचा कर्णधार जेम्स विन्सने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करण्यासाठी आलेल्या मँचेस्टर संघाचा मॅथ्यू हर्स्ट धावांवर बाद झाला. त्यानंतर जोस बटलर २२ धावा करून बाद झाला. हेनरिक क्लासेनही १५ धावा काढून बाद झाला.



संघाकडून फिल सॉल्टने सर्वाधिक ६० धावा केल्या. त्याच वेळी, मार्क चॅपमनने २२ धावांचे योगदान दिले. १०० चेंडू खेळल्यानंतर, मँचेस्टर संघ ४ गडी गमावून १३१ धावा करू शकला.

लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी सदर्न ब्रेव्हची सुरुवात चांगली झाली नाही. त्यांच्या फलंदाजीचा अंदाज यावरून लावता येतो की संघाचे फक्त ४ फलंदाजच दुहेरी आकडी धावसंख्या गाठू शकले. जेसन रॉय संघाकडून सर्वाधिक धावा करणारा फलंदाज होता, त्याने ३० धावा केल्या. त्याच्याशिवाय, लिउस डु प्लूयने २५, लॉरी इव्हान्सने १३ आणि क्रेग ओव्हरटनने १८ धावांचे योगदान दिले. सदर्न ब्रेव्हने हे लक्ष्य ९९ चेंडूत गाठले.

जेम्स अँडरसनबद्दल बोलायचे झाले तर, या सामन्यात गोलंदाजी करताना तो खूप महागडा ठरला. त्याने २० चेंडू टाकले, ज्यामध्ये त्याने ३६ धावा दिल्या. त्याच्या चेंडूवर ५ चौकार आणि एक षटकार लागला. या काळात तो एकही बळी घेऊ शकला नाही. त्याची गोलंदाजी पाहिल्यानंतर त्याला आगामी सामन्यांमध्ये संधी मिळते की नाही हे पाहणे मनोरंजक ठरेल.

# अवंतिका देसाईची चमकदार कामगिरी

**। मुंबई । प्रतिनिधी ।**



राष्ट्रीय जलतरण मुंबईतील प्रबोधन गोरेगाव संस्थेतर्फे चालविण्यात येणाऱ्या ओझोन स्विमिंग पूल ॲकॅडमीची खेळाडू अवंतिका देसाई हिने चमकदार कामगिरी केली आहे. बंगळुरू येथे सुरू असलेल्या राष्ट्रीय जलतरण स्पर्धेत महाराष्ट्र राज्याचे प्रतिनिधित्व करताना फ्रीस्टाईल रिले प्रकारात तिने रौप्यपदक पटकावले आहे. प्रबोधन गोरेगाव संस्थेच्या इतिहासात हे प्रथमच घडल्याने संस्थेला राष्ट्रीय जलतरण स्पर्धेच्या विश्वात मानाचे आणि अभिमानास्पद स्थान प्राप्त झाले. अवंतिका देसाई ही माजी आमदार नीला देसाई यांची नात आणि प्रबोधन गोरेगाव संस्थेचे कार्यकारिणी सदस्य अमित देसाई यांची कन्या आहे. हे स्थान प्राप्त करण्यासाठी अवंतिकाची प्रचंड मेहनत, ऑलिम्पिक खेळाडू आणि प्रशिक्षक रॉन डिसोझा यांचे उत्कृष्ट प्रशिक्षण आणि कुटुंबियांनी तिच्यासाठी दिवसरात्र केलेले प्रयत्न यांचा मोलाचा वाटा आहे. अवंतिकाच्या या कामगिरीसाठी प्रबोधन गोरेगाव संस्थेसह समस्त गोरेगावकरांनीही तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव केला आहे.

## खेळाडू असलेल्या हॉटेलला आग

**। चेन्नई । वृत्तसंस्था ।**

भारतामध्ये ग्रँडमास्टर्स बुद्धिबळ स्पर्धा पार पडणार आहे. चेन्नई येथे या स्पर्धेला बुधवारपासून सुरुवात होणार होती; मात्र, खेळाडू वास्तव्यास असलेल्या हयात रेजेंसी या हॉटेलमध्ये आग लागल्यामुळे ही स्पर्धा एक दिवस पुढे ढकलण्यात आली. या स्पर्धेला गुरुवारपासून सुरूवात झाली आहे. चेन्नई ग्रँडमास्टर्स बुद्धिबळ स्पर्धेचे संचालक श्रीनाथ नारायणन यांनी समाजमाध्यमांवर याबाबत माहिती देताना सांगितले, की हयात रेजेंसी या हॉटेलला काल मंगळवारी (दि.५) रात्री आग लागली. ग्रँडमास्टर्स बुद्धिबळ स्पर्धा येथेच होत आहे. या स्पर्धेमध्ये सहभागी असलेल्या खेळाडूंना नजीकच्या हॉटेलमध्ये हलवण्यात आले आहे.

### इंडो-लंका क्रिकेट टूर्नामेंटमध्ये चमकदार खेळी | 'उभरती खेळाडू' म्हणून सन्मान

# रायगडच्या वंशिका मोहितेचा लंकेत डंका

**। वेनगाव । अनिल गवळे ।**

श्रीलंकेत भरवलेल्या इंडो-लंका क्रिकेट टूर्नामेंटमध्ये रायगड जिल्ह्यातील कर्जतची वंशिका मोहिते हिने पुणे संघातून चमकदार खेळी केली आहे. तिने पाच सामन्यांत पाच बळी घेऊन आपली चमकदार कामगिरी सिद्ध केली आहे. ही स्पर्धा कोलंबो, खाटूनायके आणि नुराइलिया या विविध श्रीलंकन शहरांमध्ये पार पडली. बेसिलिका क्रिकेट क्लब, गोल्डन क्रिकेट अकॅडमी आणि आय.पी.एन क्रिकेट अकॅडमी या संघांसोबत हे सामने खेळवण्यात आले. विशेष म्हणजे, नुराइलिया शहरात तब्बल १२ अंश सेल्सिअस तापमानात एच.के.बाउन्सच्या खेळाडूंनी जिद्दीने सामना खेळत आपल्या कौशल्याची चुणूक दाखवली.

आंतरराष्ट्रीय क्रिकेटच्या दिशेने पहिले पाऊल टाकणाऱ्या एच.के.बाउन्स क्रिकेट अकॅडमी पुण्याच्या अंडर-१७ चमूने इंडो-लंका क्रिकेट टूर्नामेंटमध्ये दमदार कामगिरी केली आहे. त्यात रायगड जिल्ह्यातील कर्जतच्या वंशिका मोहिते हिने आपल्या गोलंदाजीत ५ सामन्यांमध्ये ५ बळी घेऊन आपली चमकदार कामगिरी सिद्ध केली आहे. भारतीय पुणे एच के बाऊन्स क्रिकेट संघाने एकूण ८ सामन्यांपैकी ६ विजय, १ सामना बरोबरीत आणि १ पराभव अशी धुवाधार खेळी करून विजय संपादन केले आहे.

एच के बाउन्स अकॅडमीचे प्रशिक्षक हेमंत किणीकर, अमोल माने आणि रोहिणी तबीब यांचे मार्गदर्शन या यशामागचे खरे शिल्पकार ठरले. तर, श्रीलंकेतील बेसिलिका क्रिकेट अकॅडमीचे प्रशिक्षक रोशन सिल्वा यांच्या मार्गदर्शनाखालील खेळाडूंशी सामना देत, भारतीय खेळाडूंनी आपली ताकद सिद्ध केली. या क्रिकेट खेळाडूंमध्ये वंशिका मोहिते, आर्या मोने, ध्रुव कोंढरे, मयूर सासवडे, हर्षवर्धन जगताप, अजिंक्य पुजारी, आदर्श चव्हाण, अरिहंत उदावंत, स्वरा तबीब, ऋषभ वाधावानी, शार्दूल गराडे, अवनीश गौणकर, श्रीराज घोरपडे यांचा समावेश असून त्यांनी प्रेक्षकांच्या मनावर आपल्या क्रिकेट कौशल्याने मने जिंकली आहेत.

वंशिका मोहिते ही पत्रकार संजय मोहिते यांची कन्या असून तिने आपले क्रिकेटचे प्राथमिक प्रशिक्षण कोच राजेंद्र कोंडाळकर यांच्याकडे घेतले. पुढे आपल्या क्रिकेट कारकिर्दीत अधिक प्रगती साधण्यासाठी ती सध्या पुणे येथे कोच शुभेंद्रू भांडारकर, हेमंत किणीकर, अमोल माने, आणि सुदेश लाटे यांच्याकडे प्रशिक्षण घेत आहे. 'उभरता खेळाडू' म्हणून तिची निवड ही कर्जतकरांसाठी अभिमानाची बाब ठरली आहे.

### क्रिकेट कौशल्याने मने जिंकली



**या क्रिकेट खेळाडूंमध्ये वंशिका मोहिते सह आर्या मोने, ध्रुव कोंढरे, मयूर सासवडे, हर्षवर्धन जगताप, अजिंक्य पुजारी, आदर्श चव्हाण, अरिहंत उदावंत, स्वरा तबीब, ऋषभ वाधावानी, शार्दूल गराडे, अवनीश गौणकर, श्रीराज घोरपडे यांचा समावेश असून त्यांनी प्रेक्षकांच्या मनावर आपल्या क्रिकेट कौशल्याने मने जिंकली आहेत. दरम्यान, एच.के. बाउन्स क्रिकेट अकॅडमीचा हा विजय हा केवळ एक स्पर्धा जिंकण्यापुरता मर्यादित नाही, तर हा उद्याच्या भारताच्या क्रिकेट भविष्याचा आत्मविश्वासदायक बाऊन्स म्हणायला हरकत नाही.**

## 'अध्यक्षपदासाठी अर्ज करणार'

**। कोलकाता । वृत्तसंस्था ।**



तीन वर्षांपूर्वी बीसीसीआय अध्यक्षपदाचा राजीनामा दिल्यानंतर, भारताचे माजी कर्णधार सौरव गांगुली बंगाल क्रिकेट असोसिएशन (सीएबी) च्या आगामी निवडणुकीत अध्यक्षपदासाठी उमेदवारी अर्ज दाखल करू शकतात.

भारतीय संघाचा माजी कर्णधार सौरव गांगुली हे २०१९ पर्यंत सीएबी अध्यक्ष होते. त्यांनी २०१४ मध्ये दिवंगत जगमोहन दालमिया यांच्या नेतृत्वाखाली राज्य युनिटचे सचिव म्हणून आपला कार्यकाळ सुरू केला. त्यानंतर २०१९ मध्ये, त्यांची एकमताने बीसीसीआय अध्यक्ष म्हणून निवड झाली आणि जय शाह सचिव झाले. परंतु, एक कार्यकाळ पूर्ण केल्यानंतर, गांगुलीची जागा रॉजर बिन्नीने घेतली.

सीएबीच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले की, सौरव गांगुली व्यवस्थापन व्यवस्थेत परतण्यास उत्सुक आहे. त्याने सीएबी अध्यक्षपदासाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा निर्णय घेतला आहे. बीसीसीआयच्या घटनेनुसार, त्याच्याकडे पाच वर्षे शिल्लक आहेत. तो एकमताने निवडला जाईल की निवडणुका होतील हे अद्याप स्पष्ट नाही. सध्याचे सीएबी अध्यक्ष स्नेहाशिष गांगुली हे सौरवचे मोठे भाऊ आहेत. ते सहा वर्षे पूर्ण करतील, त्यानंतर लोढा समितीने शिफारस केलेल्या घटनेनुसार त्यांना अनिवार्य विश्रांती घ्यावी लागेल.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)